कृषीवल

रायगड, बुधवार, दि. ३ जून २०२६

किंमत ५₹

## आचारसंहितेत अडकली कर्जमाफी

**मुंबई :** राज्यातील शेतकरी कर्जमाफी योजनेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. मात्र, विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू असल्याने या निर्णयाची अंमलबजावणी लांबण्याची शक्यता आहे. 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' अंतर्गत दोन लाखांपर्यंतचे पीककर्ज माफ करण्यात येणार आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहन अनुदान देण्यात येणार आहे. या योजनेसाठी सरकारकडून ३६ हजार ५८५ कोटींची तरतूद करण्यात येणार असून, सुमारे ६५ लाख कर्जखात्यांना आणि ५६ लाख शेतकऱ्यांना थेट लाभ मिळणार आहे.

## सात जणांचा होरपळून मृत्यू

**नवी दिल्ली :** गुजरातमधील बार्डोलीजवळ धुळे-सुरत महामार्गावर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या दोन एसटी बसची मंगळवारी भीषण धडक झाली. अपघातानंतर एक बस पलटी होऊन तिला आग लागल्याने सात प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला, तर अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. उवा-माणेकपूर गावादरम्यान हा अपघात घडला. धुळ्याकडून सुरतच्या दिशेने जाणाऱ्या बसची समोरून येणाऱ्या दुसऱ्या एसटी बसशी जोरदार टक्कर झाली. धडकेनंतर एक बस रस्त्यावर उलटून पेट घेतल्याने मोठी जीवितहानी झाली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, पोलीस आणि रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल होत मतदकार्य सुरू केले.

## ४८ तासांत मान्सून केरळात येणार!

**मुंबई :** नैऋत्य मान्सून येत्या ४ जूनच्या सुमारास केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे. मान्सूनच्या पुढील वाटचालीसाठी वातावरण अनुकूल असून, केरळ, तामिळनाडू, लक्षद्वीप तसेच बंगालच्या उपसागरातील काही भागांत त्याची प्रगती अपेक्षित आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील सहा ते सात दिवसांत केरळमध्ये काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पावसाची शक्यता आहे.

तामिळनाडू आणि कर्नाटकातही मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्रासह देशातील अनेक भागांत मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि ताशी ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. मान्सूनच्या आगमनामुळे उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळणार असून, शेतकरीही पावसाच्या प्रतीक्षेत आहेत.

# खरीप हंगामाची नांदी

**रायगडमध्ये भात बियाणे खरेदीला वेग**

**20 टक्क्यांहून अधिक विक्री पूर्ण**

**शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत**



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

**खरीप हंगामाची चाहूल लागताच रायगड जिल्ह्यातील शेतकरी पेरणीच्या तयारीला लागले आहेत. शेतांवरील मशागतीची कामे बहुतांश पूर्ण झाली असून, आता भात पेरणीसाठी आवश्यक असलेल्या बियाण्यांच्या खरेदीला वेग आला आहे. जिल्ह्यातील विविध विक्री केंद्रांवर गेल्या पंधरा दिवसांपासून भात बियाणे खरेदीसाठी शेतकऱ्यांची गर्दी वाढत असून, आतापर्यंत २० टक्क्यांहून अधिक बियाण्यांची विक्री झाल्याची माहिती कृषी विभागाकडून मिळाली आहे.**

जून महिना सुरू झाला असून मान्सून कोणत्याही क्षणी दाखल होण्याची शक्यता आहे. पाऊस सुरू झाल्यानंतर बियाण्यांसाठी धावपळ होऊ नये, यासाठी शेतकरी आगाऊ नियोजन करत आहेत. जिल्ह्यातील एकूण भात लागवड क्षेत्रापैकी सुमारे १० टक्के क्षेत्रावर बियाणे लागवड केली जाणार आहे.रायगड जिल्ह्यात एकूण ९१ हजार ५२१ हेक्टर भात लागवडीचे क्षेत्र आहे. पान २ वर

### अनुदानातून उपलब्ध होणार रासायनिक खते

खरीप हंगामासाठी (१ एप्रिल ते ३० सप्टेंबर) रायगड जिल्ह्याला १४ हजार मेट्रिक टन रासायनिक खतांचे आवंटन प्राप्त झाले आहे. यामध्ये ११ हजार टन युरिया, ७०० टन डीएपी आणि १ हजार ५०० मेट्रिक टन मिश्र खतांचा समावेश आहे. आतापर्यंत १ हजार ६८७ मेट्रिक टन खतांचा पुरवठा झाला आहे. खतांची टंचाई टाळण्यासाठी १ हजार १२० मेट्रिक टन संरक्षित साठा ठेवण्याचे नियोजन केले असून, त्यापैकी ९३८ मेट्रिक टन खतांचा साठा उपलब्ध केला आहे.

### बियाणे विक्रेत्यांवर भरारी पथकाची करडी नजर

भात बियाणे खरेदी हंगामाला सुरुवात झाल्यानंतर कृषी विभागाने जिल्ह्यातील मान्यताप्राप्त विक्री केंद्रांवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. शेतकऱ्यांनी केवळ अधिकृत विक्रेत्यांकडूनच बियाणे खरेदी करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठी भरारी पथके सक्रिय करण्यात आली असून, पावती न देणे, जादा दर आकारणे किंवा निकृष्ट दर्जाची बियाणे विक्री करणाऱ्या विक्रेत्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे.

## नोकरीच्या मागणीसाठी प्रकल्पग्रस्तांचा एल्गार



- **जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण**
- **आयपीसीएल-रिलायन्स कंपनीत नोकरीची मागणी**
- **३२४ जण रोजगाराच्या प्रतीक्षेत**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

प्रकल्पांमध्ये रोजगार मिळेल या आशेने जमिनी दिलेल्या प्रकल्पग्रस्तांना अद्यापही कायमस्वरूपी नोकरी मिळालेली नसल्याने संतप्त झालेल्या प्रकल्पग्रस्तांनी मंगळवार (दि. २) पासून अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे. नागोठणे येथील आयपीसीएल व रिलायन्स कंपनीत कायमस्वरूपी नोकरी देण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी भूमीपुत्र प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्थेच्यावतीने हा लढा पान २ वर

> **शासनस्तरावर झालेल्या बैठकीत प्रकल्पग्रस्तांना रोजगार देण्याबाबत चर्चा झाली आहे. मात्र, संबंधित प्रकल्पग्रस्तांची कायमस्वरूपी नोकरीची मागणी आहे. कंपनीतील उपलब्ध पदांनुसार आवश्यक शैक्षणिक पात्रता अनेकांकडे नसल्याने त्यांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घेणे शक्य होत नाही.**
>
> **– भारत वाघमारे, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन विभाग)**

## रेवदंडा ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी संतोष मोरे



- **शेकाप-महाविकास आघाडीचा विजय**
- **शिंदे गटाचे सुराराम माळी पराभूत**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रेवदंडा ग्रामपंचायतीच्या रिक्त असलेल्या उपसरपंचपदाची निवडणूक मंगळवारी (दि. २) पार पडली. या निवडणुकीत शेतकरी कामगार पक्ष व महाविकास आघाडीचे उमेदवार संतोष सदाशिव मोरे (बाबू) यांनी बहुमताने विजय मिळवत उपसरपंचपदावर निवड झाली. तर, शिंदे गटाचे उमेदवार सुराराम माळी यांचा पराभव झाला. उपसरपंचपदी संतोष मोरे यांची निवड झाल्यानंतर शेकाप आणि महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा केला. शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील तसेच पक्षाच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी संतोष मोरे यांचे अभिनंदन केले.

रेवदंडा ग्रामपंचायतीतील उपसरपंचपद गेल्या अनेक महिन्यांपासून रिक्त होते. या पदासाठी मंगळवारी निवडणूक घेण्यात आली. शेकाप-महाविकास आघाडीकडून संतोष मोरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता, तर शिंदे गटाकडून सुराराम माळी यांनी उमेदवारी अर्ज सादर केला होता. पान २ वर

### सुप्रिया पाटील यांच्याकडून अभिनंदन

अलिबाग अर्बन बँकेच्या चेअरमन सुप्रिया पाटील, अलिबाग सार्वजनिक वाचनालयाच्या अध्यक्षा शैला पाटील तसेच रायगड बाजारचे उपाध्यक्ष प्रमोद घासे यांनी रेवदंडा येथे जाऊन नवनिर्वाचित उपसरपंच संतोष मोरे यांची भेट घेत पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले. यावेळी त्यांनी संतोष मोरे यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देत रेवदंडा ग्रामपंचायतीच्या विकासकामांना गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

## कोरस कंपनीला ४५ लाखांचा गंडा

**फरार पाच आरोपींमध्ये महिलेचा समावेश**

**। रोहा । प्रतिनिधी ।**

बोगस कंपनी स्थापन करून बनावट कागदपत्रांच्या आधारे धाटाव एमआयडीसीतील कोरस इंडिया लिमिटेड कंपनीची तब्बल ४५ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी रोहा पोलीस ठाण्यात पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपी फरार झाले आहेत. विशेष म्हणजे, या टोळीत एका महिलेचाही समावेश असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

राजेश उन्नीकृष्णन नायर, आशिष जैन, कल्पना चावला, योगेश सकपाळ आणि हीर यादव अशी आरोपींची नावे आहेत. या पाच जणांनी संगनमत करून बोगस कंपनी स्थापन केली आणि खोटी कागदपत्रे तयार करून कोरस इंडिया लिमिटेड कंपनीशी व्यावसायिक व्यवहार केल्याचे तपासात समोर आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी कंपनीकडून सुमारे १५०० किलो 'ॲम्ब्रोक्सॉल एचसीएल आयपी' या औषधी पावडरचा कच्चा माल खरेदी केला होता. व्यवहाराच्या सुरुवातीला एकूण रकमेपैकी ३० टक्के रक्कम अदा करण्यात आली. उर्वरित ७० टक्के रक्कम काही दिवसांत अदा करण्याचे आश्वासन आरोपींनी दिले होते. मात्र, ठरलेल्या मुदतीत जवळपास ३५ लाख रुपयांची थकबाकी कंपनीच्या खात्यात जमा करण्यात आली नाही.

कंपनीकडून वारंवार पाठपुरावा करूनही प्रतिसाद मिळत नसल्याने संशय बळावला. अखेर १२ नोव्हेंबर २०२५ ते २९ मे २०२६ या कालावधीत आपली पान २ वर

## वन कर्मचाऱ्यांची बदली पारदर्शक

**अलिबाग वन विभागांतर्गत ४० वनपाल, वनरक्षकांच्या बदल्या**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग वन विभागांतर्गत कार्यरत असलेल्या वनपाल आणि वनरक्षकांच्या बदल्या समुपदेशनाच्या माध्यमातून पारदर्शक पद्धतीने करण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र वनरक्षक-वनपाल संघटना, अलिबाग शाखेचे अध्यक्ष मौलेश तायडे यांनी दिली. या प्रक्रियेबाबत कर्मचारीवर्गातून समाधान व्यक्त करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

अलिबाग वन विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या सुमारे ४० कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून, त्यामध्ये वनपाल आणि वनरक्षकांचा समावेश आहे. राज्य शासनाने कर्मचारी बदल्या अधिक न्याय्य, पारदर्शक आणि कर्मचारी हित लक्षात घेऊन व्हाव्यात, या उद्देशाने समुपदेशनाधारित बदली प्रक्रियेला प्राधान्य दिले आहे. या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी अलिबागचे उपवनसंरक्षक पान २ वर

> **बदली ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नसून ती कर्मचाऱ्यांच्या कौटुंबिक, सामाजिक आणि व्यावसायिक आयुष्याशी निगडित असते. त्यामुळे प्रत्येक कर्मचाऱ्याचे म्हणणे ऐकून घेत त्यांच्या अडचणी, गरजा आणि परिस्थितीचा विचार करून बदली प्रक्रिया राबविण्यात आली. गंभीर कौटुंबिक अडचणी, आरोग्यविषयक समस्या, मुलांचे शिक्षण आणि अन्य सामाजिक कारणांनाही योग्य प्राधान्य देण्यात आले. यामुळे प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि कर्मचारीहिताची ठरली.**
>
> **– राहुल पाटील, उपवनसंरक्षक, अलिबाग**

> शासनाच्या समुपदेशनाधारित बदली धोरणाची अलिबाग वन विभागाने प्रभावी अंमलबजावणी केली आहे. कर्मचाऱ्यांच्या पसंती, अडचणी आणि वैयक्तिक परिस्थितीचा विचार करून बदल्या झाल्याने कर्मचारी वर्गात समाधानाचे वातावरण आहे. कर्मचारी हित जपणारा हा अलिबाग पॅटर्न राज्यासाठी आदर्श ठरू शकतो.
>
> – मौलेश तायडे, अध्यक्ष, महाराष्ट्र वनरक्षक-वनपाल संघटना, अलिबाग शाखा

## अलिबागमध्ये रिमझिम पाऊस

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांना मंगळवारी सायंकाळी काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. अलिबागसह अनेक भागात ठिकठिकाणी रिमझिम पाऊस पडला. या पावसामध्ये भिजण्याचा आनंद अलिबागकरांनी मनमुरादपणे लुटला. रायगड जिल्ह्यामध्ये गेल्या अनेक दिवसांपासून उष्णतेमुळे नागरिक हैराण झाले होते. कडक उन्हामुळे घरातून बाहेर पडणेदेखील कठीण झाले होते. पाऊस कधी पडणार याकडे नागरिकांचे लक्ष लागून राहिले होते. मंगळवारी सायंकाळी अचानक रिमझिम पावसाने हजेरी लावली. पावसाच्या हलक्या सरी अलिबागचा अनेक भागात कोसळल्या.

**पीएनपी नाट्यगृहात ग्रामीण नाट्यमहोत्सव | कलाकारांच्या कलाविष्काराला रसिकांची दाद**

## 'नाट्यप्रभा'ची दिमाखदार सांगता

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

ग्रामीण भागातील कलावंतांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या 'नाट्यप्रभा' ग्रामीण नाट्य महोत्सव २०२६ ची पीएनपी नाट्यगृहात उत्साहपूर्ण वातावरणात आणि दिमाखदार सोहळ्यात सांगता झाली. पीएनपी कलाविकास मंडळाच्या अध्यक्षा चित्रलेखा नृपाल पाटील पुरस्कृत ग्रामीण रंगभूमीच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवात अलिबाग तालुक्यातील १२ गावांतील १२ नाट्यसंस्थांनी सहभाग घेतला होता. ग्रामीण पान २ वर




> ग्रामीण भागात प्रचंड कलागुण दडलेले आहेत. या कलाकारांना योग्य व्यासपीठ मिळावे, त्यांच्या कलेला प्रोत्साहन मिळावे आणि ग्रामीण रंगभूमी अधिक सक्षम व्हावी, या उद्देशाने 'नाट्यप्रभा' ग्रामीण नाट्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. कलाकार आणि रसिक प्रेक्षकांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद निश्चितच समाधान देणारा आहे. ग्रामीण रंगभूमी ही आपल्या सांस्कृतिक परंपरेचा महत्त्वाचा वारसा आहे. हा वारसा जतन करण्यासाठी आणि नवोदित कलाकारांना संधी उपलब्ध करून देण्यासाठी पीएनपी कलाविकास मंडळ भविष्यातही अशाच उपक्रमांना प्राधान्य देईल. **– चित्रलेखा पाटील अध्यक्षा, पीएनपी कलाविकास मंडळ**

PNP CYRUS POONAWALLA SCHOOL
NAGAON CBSE CURRICULUM (SINCE 2017)

LEARNING, GROWING, THRIVING, TOGETHER,


ADMISSION OPEN
NURSERY TO X


Located in a non-industrial, nature-friendly setting, the school provides a calm and healthy atmosphere that supports focused learning and overall well-being.




HOLISTIC DEVELOPMENT

The institution places clear emphasis on the holistic development of students, ensuring equal importance to academics, physical fitness, and life skills.






SWIMMING FOR ALL

A major highlight is the half Olympic-length swimming pool, where free swimming classes are provided to all students, promoting fitness and confidence from an early age.

Best Sports Facilities in Alibag

In addition, the school boasts extensive sports facilities, including a basketball court, tennis court, and a football ground, giving students opportunities to actively engage in sports and develop teamwork, discipline, and leadership.



9822771540/9272594803/9168137591

pnpedusoc@gmail.com www.cyruspoonawallaschool.com

Opp. Hiranandani Sands, Near Mahendra Colony, Nagaon Khari Rd, Nagaon Village, Taluka, Alibag, District. Raigad - 402204.

# विजेचा खेळखंडोबा, नेरळकर आक्रमक

**रात्री महावितरण कार्यालयात धडक**
**सकाळी मोर्चा काढून निषेध**

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील झपाट्याने नागरीकरण होत असलेल्या नेरळ परिसरात वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांचा संताप अनावर झाला आहे. सोमवारी रात्री वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर संतप्त नागरिकांनी महावितरण कार्यालय गाठून जाब विचारला. त्यानंतर मंगळवारी सकाळी मोर्चा काढत महावितरणच्या कारभाराविरोधात तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.




नेरळ परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून वीजपुरवठ्याचा बोजवारा उडाला आहे. कोणतीही पूर्वसूचना किंवा संदेश न देता तासन्तास वीज गायब होत असल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे आणि वीजभार वाढल्यामुळे परिसरातील अनेक इलेक्ट्रिक डीपी वारंवार जळत असल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे, गेल्या तीन महिन्यांत तब्बल आठ डीपी जळाल्या किंवा निकामी झाल्याची नोंद असूनही कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, नेरळसारख्या मोठ्या क्षेत्रासाठी किमान १२ कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. मात्र सध्या केवळ पाच कर्मचारी कार्यरत असल्याने दुरुस्तीची कामे वेळेत होत नसून त्याचा फटका थेट वीज ग्राहकांना बसत आहे.

यापार्श्वभूमीवर संतप्त नागरिकांनी महावितरणच्या नेरळ कार्यालयावर मोर्चा काढून अधिकाऱ्यांना जाब विचारला. आंदोलनानंतर महावितरण अधिकाऱ्यांनी नागरिकांना लेखी आश्वासन दिले. पुढील दहा दिवसांत आवश्यक मनुष्यबळ वाढविण्याचा प्रयत्न केला जाईल तसेच पुढील तीन महिन्यांत नेरळमधील वीज समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील, असे आश्वासन देण्यात आले.

यावेळी सहाय्यक अभियंता वाघ यांनी उपस्थित नागरिकांच्या प्रश्नांना उत्तरे देत महावितरणच्या वतीने भूमिका स्पष्ट केली. मात्र, दिलेल्या आश्वासनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होते का, याकडे आता नेरळकरांचे लक्ष लागले आहे.

# श्रीवर्धनकरांवर पाणीबाणीचं संकट

- **कोट्यवधींच्या पाणी योजनेचे पितळ उघडे**
- **दर दुसऱ्या दिवशी फुटतेय पाईपलाईन**

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

कोट्यवधी रुपये खर्च करून उभारण्यात आलेली श्रीवर्धन शहर पाणीपुरवठा योजना आणि जलशुद्धीकरण प्रकल्प सध्या नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत असल्याचे चित्र समोर येत आहे. भ्रष्टाचार, निकृष्ट दर्जाचे काम आणि प्रशासकीय अनास्था यामुळे ऐन पावसाळ्याच्या तोंडावर श्रीवर्धनकरांवर पुन्हा एकदा 'पाणीबाणी'चे संकट ओढवले आहे.

२४ कोटींहून अधिक खर्च करून उभारण्यात आलेल्या या योजनेचे उद्घाटन तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते मोठ्या गाजावाजात झाले होते. जाहिराती, आश्वासने आणि विकासाच्या दाव्यांमुळे ही योजना चर्चेत आली होती. मात्र, उद्घाटनानंतर अवघ्या काही दिवसांतच या योजनेच्या कामकाजातील त्रुटी उघड होऊ लागल्या असून, रानवली धरण ते श्रीवर्धन या मुख्य जलवाहिनीवर वारंवार पाईपलाईन फुटत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.

रानवली धरण ते श्रीवर्धन मार्गावरील मुख्य जलवाहिनीवर दर दुसऱ्या दिवशी कुठे ना कुठे गळती किंवा पाईपलाईन फुटल्याच्या घटना घडत आहेत. पाईपलाईन फुटल्यानंतर तातडीच्या दुरुस्तीच्या नावाखाली रस्ते खोदले जातात, पाणीपुरवठा खंडित केला जातो आणि नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागते.

याहून गंभीर बाब म्हणजे, या सततच्या दुरुस्ती आणि 'मेंटेनन्स'च्या नावाखाली नवीन बिलांचा मलिदा लाटला जात असल्याचा आरोप आता नागरिकांकडून केला जात आहे. कोट्यवधींची योजना पूर्ण झाल्याचा दावा होत असताना वारंवार दुरुस्तीची वेळ का येत आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.

सध्याच्या परिस्थितीबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. नियमित आणि स्वच्छ पाणी मिळणे हा नागरिकांचा मूलभूत अधिकार असताना त्यासाठी वारंवार संघर्ष करावा लागत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे.

भ्रष्टाचार आणि गैरव्यवस्थापनाचा चिखल इतका उघडपणे समोर येत आहे की, पावसाळा सुरू झाल्यानंतर नळातून स्वच्छ पाण्याऐवजी थेट चहाच यायला लागला, तरी आश्चर्य वाटायला नको, अशी संतप्त प्रतिक्रिया काही नागरिकांनी व्यक्त केली.

एकीकडे कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांचे दावे केले जात असताना, दुसरीकडे श्रीवर्धनकरांचे घसे कोरडे असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. प्रशासनाने तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना करून दोषी कंत्राटदार आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. अन्यथा पावसाळ्याच्या तोंडावर तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे. आता तरी प्रशासन कुंभकर्णी झोपेतून जागे होणार का, याकडे श्रीवर्धनकरांचे लक्ष लागले आहे.

# स्मार्ट मीटरचा शॉक की महावितरणचा धक्का?

**वाढीव वीजबिलांमुळे ग्राहक संतप्त; चौकशीची मागणी**

। रेवदंडा । विशेष प्रतिनिधी ।

स्मार्ट मीटर बसविल्यानंतर वीजबिलांमध्ये अचानक वाढ झाल्याच्या तक्रारी रायगडसह राज्यभरातून मोठ्या प्रमाणात समोर येत आहेत. घरातील वीज वापर पूर्वीइतकाच असतानाही दुप्पट-तिप्पट बिले येत असल्याचा आरोप ग्राहकांकडून केला जात असून, त्यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

रेवदंडा, अलिबाग, मुरुड, रोहा, पेण, पनवेलसह अनेक भागांतील ग्राहकांनी वाढीव वीजबिलांविरोधात नाराजी व्यक्त केली आहे. मीटर बदलला आणि बिल वाढलं हा अनुभव अनेक ग्राहक मांडत असल्याने स्मार्ट मीटरच्या अचूकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

महावितरणकडून स्मार्ट मीटर अधिक अचूक असून प्रत्यक्ष वीज वापराची नोंद घेत असल्याचा दावा केला जात असला, तरी ग्राहकांना हा युक्तिवाद पटत नसल्याचे दिसून येत आहे. जुन्या मीटरमध्ये त्रुटी असतील तर त्याचा आर्थिक भार ग्राहकांनी का सहन करावा, असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे.

दरम्यान, सौर ऊर्जा प्रकल्प उभारलेल्या ग्राहकांनाही अपेक्षित दिलासा मिळत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. नेट मीटरिंग धोरणातील बदल, स्थिर आकार आणि विविध शुल्कांमुळे



सोलर प्रणाली बसवूनही मोठी बिले येत असल्याचे ग्राहकांचे म्हणणे आहे.

वीजबिलात स्थिर आकार, इंधन समायोजन शुल्क, वहन खर्च, कर आणि इतर आकारांचा समावेश असल्याने प्रत्यक्ष वीज वापर कमी असतानाही बिलाचा आकडा वाढत असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे बिलातील प्रत्येक आकाराची स्पष्ट माहिती ग्राहकांना देण्याची मागणी होत आहे.

स्मार्ट मीटरची स्वतंत्र तांत्रिक तपासणी, वाढीव वीजबिलांची चौकशी आणि ग्राहकांना तातडीने दिलासा देण्याची मागणी आता रायगडसह राज्यभरातून जोर धरू लागली आहे. स्मार्ट मीटरच्या नावाखाली नागरिकांना आर्थिक शॉक दिला जात आहे का? हा प्रश्न आता सर्वसामान्यांच्या चर्चेचा विषय बनला आहे.

# राणेची वाडीतील तरुणांचा आदर्श उपक्रम

**संगम नदी स्वच्छता मोहिमेत युवकांचा उत्स्फूर्त सहभाग**

। तळा । प्रतिनिधी ।

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत तळा शहरातील राणेची वाडी येथील तरुणांनी संगम नदीच्या राणेची वाडी ते खैराट परिसरातील नदीपात्राची स्वच्छता करून आदर्श उपक्रम राबविला. या मोहिमेत मोठ्या प्रमाणावर युवकांनी सहभाग घेत नदीतील कचरा हटवून परिसर स्वच्छ केला.

या उपक्रमाची सुरुवात ध्रुव राऊत या युवकाच्या पुढाकारातून झाली. नदी स्वच्छता मोहिमेचे आवाहन करणारी त्याने तयार केलेली रील सोशल मीडियावर




मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली. त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यानंतर राणेची वाडीतील तसेच उन्हाळी सुट्टीसाठी गावी आलेल्या तरुणांनी स्वच्छता मोहिमेत उत्साहाने सहभाग नोंदविला.

सदर नदीपात्राचा वापर राणेची वाडी गावातील गौरी-गणपती विसर्जनासाठी केला जातो. तसेच कपडे धुणे, गुरांना पाणी पाजणे यासाठीही या नदीचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होतो. मात्र, काही नागरिकांकडून नदीत विविध प्रकारचा कचरा टाकला जात असल्याने नदीपात्र दूषित होत होते. याची दखल घेत युवकांनी स्वच्छता मोहीम हाती घेतली.

यावेळी नदीपात्रातून प्लास्टिक, टाकाऊ वस्तूंसह विविध प्रकारचा कचरा संकलित करण्यात आला. तसेच नागरिकांनी नदीत कचरा टाकू नये, पर्यावरणाची काळजी घ्यावी आणि जलस्रोत स्वच्छ ठेवावेत, असे आवाहन करण्यात आले.

युवकांनी तालुक्यातील इतर गावांतील तरुणांनाही पुढाकार घेऊन आपल्या गावातील नदी, तलाव आणि सार्वजनिक परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी अशाच मोहिमा राबविण्याचे आवाहन केले. या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

# नळपट्टी कमी करण्याची मागणी

। रोहा । प्रतिनिधी ।



रोहा-अष्टमीकरांवर लादण्यात आलेली अव्वाच्या सव्वा नळपट्टी कमी करावी, या संदर्भात नगरपरिषद प्रशासनाला निवेदन देण्यात आले होते. शिवसेना (ठाकरे गट) पक्षाने दिलेल्या निवेदनाचा गांभीर्यपूर्वक विचार न केल्यास दि.२० जून रोजी बेमुदत उपोषण पुकारण्यात येईल, असा इशारा नगरपरिषद प्रशाससनाला स्मरणपत्र देत देण्यात आला.शिवसेना रोहा शहरप्रमुख राजेश काफरे यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी (दि.२) मुख्याधिकारी अजय कुमार एडके यांची भेट घेऊन चर्चा करण्यात आली. यावेळी शहर प्रमुख राजेश काफरे, तालुकाप्रमुख नितीन वारंगे, उप तालुकाप्रमुख सचिन फुलारे, युवासेना शहर अधिकारी ओंकार गुरव, उप शहरप्रमुख प्रीतम देशमुख, मनोज लांजेकर, बाबू कडू, भारत वाकचौरे, नंदू भादेकर, रमेश विचारे यांच्यासह अनेक शिवसैनिक उपस्थित होते. शिवसेनेच्या वतीने यापूर्वी दि.१० मार्च रोजी वाढीव नळपट्टी कमी करण्याबाबत लेखी निवेदन देण्यात आले होते. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. नगरपरिषद प्रशासनाने नागरिकांच्या हिताचा विचार करून नळपट्टी तात्काळ कमी करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# एआयच्या 'तिसऱ्या डोळ्या'खाली परीक्षा!

**कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करणारे राज्यातील पहिले मुक्त विद्यापीठ**

। नाशिक । प्रतिनिधी ।

परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता, सुरक्षितता आणि गैरप्रकारांवर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित सीसीटीव्ही देखरेख प्रणालीचा वापर करणारे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ राज्यातील पहिले विद्यापीठ ठरले आहे. मुक्त शिक्षण प्रणाली, ब्लॉकचेन तंत्रज्ञान, क्यूआर कोड यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरात नेहमीच आघाडीवर राहिलेल्या मुक्त विद्यापीठाने आता परीक्षा व्यवस्थापनातही आणखी एक



महत्त्वाचा टप्पा गाठला आहे.

विशेष म्हणजे, विद्यापीठाच्या या नावीन्यपूर्ण आणि धाडसी निर्णयाचे विद्यार्थीवर्गाकडूनही उत्स्फूर्त स्वागत होत आहे. सीसीटीव्ही आणि एआयच्या निगराणीखाली परीक्षा देऊन गुणवत्ता प्राप्त केली, हे आम्ही अभिमानाने सांगू शकतो, अशी प्रतिक्रिया अनेक विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

बुधवार, २७ मे २०२६ पासून विद्यापीठाच्या मे-जून २०२६ मुख्य (उन्हाळी) परीक्षांना सुरुवात झाली आहे. या परीक्षांसाठी प्रायोगिक तत्त्वावर एआय आधारित सीसीटीव्ही देखरेख प्रणालीचा अवलंब करण्यात आला आहे. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या नियोजनानुसार ही अत्याधुनिक यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील एकूण ५५८ परीक्षा केंद्रांवर प्रश्नपत्रिका डाउनलोडिंग कक्ष आणि उत्तरपत्रिका सीलिंग कक्ष येथे एआय-आधारित सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. याशिवाय पहिल्या टप्प्यात निवडक ८४ परीक्षा केंद्रांमधील प्रत्येक परीक्षा कक्षातही एआय प्रणालीचे कॅमेरे कार्यरत करण्यात आले आहेत.

विद्यापीठाच्या नाशिक मुख्यालयात यासाठी स्वतंत्र मुख्य नियंत्रण कक्ष उभारण्यात आला आहे. या कक्षातून २० एलईडी स्क्रीन आणि एक एआय अलर्ट स्क्रीन अशा एकूण २१ स्क्रीनद्वारे राज्यभरातील परीक्षा केंद्रांवर लक्ष ठेवले जात आहे. तसेच मुंबई, पुणे, नागपूर, नांदेड, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर आणि नाशिक या आठही विभागीय केंद्रांमधून त्यांच्या कार्यक्षेत्रातील परीक्षा केंद्रांचे निरीक्षण केले जात आहे.

भविष्यात राज्यातील सर्व परीक्षा केंद्रांवर पूर्ण क्षमतेने एआय आधारित सीसीटीव्ही देखरेख प्रणाली कार्यान्वित करण्याचे नियोजन असल्याची माहिती विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे आणि परीक्षा नियंत्रक भटूप्रसाद पाटील यांनी दिली.

## पान १ वरून

### खरीप हंगामाची नांदी

यंदाच्या खरीप हंगामात ७३ हजार हेक्टर क्षेत्रावर भात लागवड करण्याचे उद्दिष्ट कृषी विभागाने निश्चित केले आहे. यासाठी जिल्ह्यासाठी १६ हजार ९५० क्विंटल भात बियाण्यांची मागणी करण्यात आली आहे. यामध्ये १६ हजार क्विंटल सुधारित वाणांची तर ६० क्विंटल संकरीत भात बियाण्यांचा समावेश आहे.

महाबीजसह विविध खासगी कंपन्यांकडूनही बियाण्यांचा पुरवठा करण्यात येत आहे. आतापर्यंत १० हजार १४१ क्विंटल बियाणे जिल्ह्यात उपलब्ध झाली असून आवश्यकतेनुसार आणखी बियाण्यांचा पुरवठा सुरू आहे. जिल्ह्यातील १८८ परवानाधारक विक्रेत्यांमार्फत शेतकऱ्यांना बियाणे उपलब्ध करून दिली जात आहेत.

यंदा शेतकऱ्यांचा कल विशेषतः सुवर्णा, कर्जत आणि अधिक उत्पादन देणाऱ्या तसेच लवकर परिपक्व होणाऱ्या भात वाणांकडे असल्याचे दिसून येत आहे. आतापर्यंत २० टक्क्यांहून अधिक बियाण्यांची विक्री झाली असून पुढील आठ दिवसांत हा आकडा ५० टक्क्यांच्या पुढे जाण्याची शक्यता कृषी विभागाने व्यक्त केली आहे. त्यामुळे आता शेतकरी पावसाच्या आगमनाकडे आशेने पाहात आहेत.

**पावसाचा अंदाज घेऊनच पेरणी करा**

हवामान विभागाच्या अंदाजानुसार मान्सूनचे आगमन काहीसे लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीसाठी घाईगडबड न करता हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन योग्य वेळ साधावी, असे आवाहन जिल्हा परिषद कृषी विभागाने केले आहे.

**जिल्ह्यात धुळवाफे पेरणीची लगबग**

रायगड जिल्ह्यातील काही भागांमध्ये शेतकऱ्यांनी धुळवाफे पेरणीला सुरुवात केली आहे. पावसाळ्यापूर्वी केलेली धुळवाफे पेरणी फायदेशीर ठरत असल्याचा अनुभव शेतकरी व्यक्त करत आहेत. पावसापूर्वी धुळवाफे पेरणी केल्यास पहिल्या पावसाबरोबर बियाण्यांची उगवण चांगली होते आणि पिकांची वाढही समाधानकारक राहते, असे शेतकरी सतीश म्हात्रे यांनी सांगितले.

### रेवदंडा ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी संतोष मोरे

एकाच पदासाठी दोन उमेदवार रिंगणात असल्याने गुप्त मतदानाद्वारे निवडणूक घेण्यात आली. मतमोजणीत संतोष मोरे यांना नऊ मते मिळाली, तर सुराराम माळी यांना सात मतांवर समाधान मानावे लागले. त्यामुळे संतोष मोरे यांची उपसरपंच म्हणून निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी जाहीर केले.निवड जाहीर होताच शेकाप आणि महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष करत मोरे यांचे स्वागत केले.

यावेळी शेकापचे ज्येष्ठ कार्यकर्ते सुरेश खोत, शरद वरसोलकर, दादा मोरे, निलेश खोत, रेवदंड्याच्या माजी सरपंच सोनाली मोरे, निलेश गाडे, जनार्दन कोंडे, आशिष गोंधळी, ॲड. परेश देशमुख, मिलिंद चुनेकर, प्रमोद नवखारकर, विजय चौलकर, संदीप खोत, अरुण भगत, अंजू मोरे, अशोक नाईक, बाळू नवखारकर, प्रकाश भिसे, शुभम आंबुकर, रघुनाथ कोंडे यांच्यासह सदस्य मनीषा चुनेकर, खलील तांडेल, शुभांगी कोंडे, स्नेहल बळी, प्रीती गोंधळी, सुदेश भोपू आदींसह शेकाप व महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी संतोष मोरे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला.

दरम्यान, अतिक्रमण प्रकरणात शिंदे गटाच्या सदस्य मंदा बळी यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले होते. या प्रकरणात ॲड. परेश देशमुख यांनी न्यायालयात युक्तिवाद करत पुरावे सादर केले होते. त्यानंतर बळी यांचे सदस्यत्व रद्द झाल्याने उपसरपंचपद रिक्त झाले होते. गेल्या अनेक महिन्यांपासून रिक्त असलेल्या या पदासाठी अखेर मंगळवारी निवडणूक पार पडली. उपसरपंचपदी निवड झाल्यानंतर संतोष मोरे यांनी सर्व सदस्यांचे तसेच ॲड. परेश देशमुख यांचे विशेष आभार मानले.

### वन कर्मचाऱ्यांची बदली पारदर्शक

राहुल पाटील यांनी केल्याचे सांगण्यात आले.

बदली प्रक्रियेदरम्यान प्रत्येक कर्मचाऱ्याला स्वतंत्रपणे बोलावून त्यांची मते जाणून घेण्यात आली. कौटुंबिक परिस्थिती, आरोग्यविषयक बाबी, मुलांचे शिक्षण, महिला कर्मचाऱ्यांच्या गरजा तसेच प्रवासाचे अंतर आदी बाबींचा विचार करून बदल्या करण्यात आल्या. त्यामुळे कर्मचारी वर्गाला मोठा दिलासा मिळाला असून, विशेषतः महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या प्रक्रियेबाबत समाधान व्यक्त केले आहे.अलिबाग वन विभागात सलग तिसऱ्या वर्षी राबविण्यात आलेल्या समुपदेशनाधारित आणि पारदर्शक बदली प्रक्रियेचे स्वागत होत असून, कर्मचारी हिताला प्राधान्य देण्यात आल्याची भावना कर्मचारी वर्गातून व्यक्त होत आहे.

### 'नाट्यप्रभा'ची दिमाखदार सांगता

कलाकारांनी आपल्या उत्कृष्ट अभिनय आणि दर्जेदार सादरीकरणाने रसिकांची मने जिंकली.दि. १८ ते ३१ मे या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या नाट्य महोत्सवाच्या सांगता सोहळ्याची सुरुवात विक्रांत वार्डे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या विशेष नाट्याविष्काराने झाली. 'ग्रामीण रंगभूमी' हा विषय प्रत्यक्ष रंगमंचावर जिवंत करत महोत्सवाचा प्रवास रसिकांसमोर उलगडण्यात आला. महोत्सवात सादर झालेल्या १२ नाटकांतील प्रमुख कलाकारांनीही या विशेष कलाकृतीत सहभाग घेतला. ग्रामीण रंगभूमीची भूमिका तन्वी पाटील यांनी प्रभावी अभिनयातून साकारली. या भावस्पर्शी सादरीकरणाने उपस्थित रसिक भारावून गेले आणि सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेले.

या महोत्सवात नाट्य हनुमान नाट्य मंडळ, भोनंगचे 'गजा आला रे', श्री शिवाई देवी कलामंच, बांधणचे 'स्वप्न सुखाचे पाहताना', भुवनेश्वर नाट्य कलामंच, मानकुळेचे 'वेड्या भावाची वेडी माया', हनुमान नाट्य मंडळ, मेढेखारचे 'दीप तुझ्या वंशाचा', अनंत सांस्कृतिक कलामंच, पेझारी-अलिबागचे 'अजून अंधार दाटून आहे', द मिरर थिएटर, थळ-वायशेतचे 'करमरकर हाऊस', धावीर नाट्य मंडळ, नागरवाडीचे 'माझा काय गुन्हा', युगांतर सांस्कृतिक नाट्य मंडळ, बोरघरचे 'विठ्ठल विठ्ठल', लोकसेवा खिडकीचे 'विदूषक', सु-सागर सांस्कृतिक कलामंच, पेझारीचे 'वेडा वृंदावन', नवज्योत नाट्य मंडळ, नवखार तसेच कला विश्व नाट्य मंडळ, हाशिवरे यांनी सहभाग नोंदवत विविधांगी विषयांवरील नाटकांचे सादरीकरण केले.सांगता सोहळ्यास चित्रपट निर्माते जितेंद्र म्हात्रे, मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीतील कला दिग्दर्शक केशव ठाकूर, डॉ. वाझे, नाट्य दिग्दर्शक किशोर म्हात्रे, साहित्यिक कैलास पिंगळे, विलास नाईक, शरद कोरडे, संदीप गोठीवडेकर, नागेश कुलकर्णी, प्रकाश म्हात्रे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी पीएनपी कलाविकास मंडळाचे उपाध्यक्ष विक्रांत वार्डे, ग्रामीण रंगभूमीचे अध्यक्ष राजन पांचाळ, महोत्सवाचे कार्याध्यक्ष प्रतिक पानकर, देवेंद्र केळूसकर, सागर नार्वेकर, संकल्प केळकर, जितेंद्र पाटील, दिनेश पाटील, ऋषी पडवळ, के.डी. पाटील, अमोल मिठाग्री, प्रमोद पाटील, दीपक काळेळ, अश्रिता बारसे, आरती पाठक, उपासना घोसाळकर, अनिष मिठाग्री, पप्पू पवनार, यश बनसोडे, अंश म्हात्रे, वरद ठाकूर, लक्ष्मण ढेरे, यज्ञेश थळे, उर्वव पाटील यांच्यासह ग्रामीण रंगभूमीच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले. तसेच संदेश मयेकर यांचेही आयोजनात मोलाचे योगदान राहिले. यावेळी शेकाप सरचिटणीस जयंत पाटील आणि पीएनपी कलाविकास मंडळाच्या अध्यक्षा चित्रलेखा नृपाल पाटील यांनी सहभागी सर्व नाट्यसंस्था, कलाकार आणि आयोजकांचे अभिनंदन करत ग्रामीण रंगभूमी जपण्यासाठी सुरू असलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले. ग्रामीण कलावंतांना व्यासपीठ देणारा हा महोत्सव आगामी काळात अधिक व्यापक स्वरूपात आयोजित करण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

### नोकरीच्या मागणीसाठी प्रकल्पग्रस्तांचा एल्गार

उभारण्यात आला असून, गंगाराम मिनमिने आणि सुरेश कोकाटे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरू आहे.प्रकल्पग्रस्तांच्या म्हणण्यानुसार, २४ जून २०२५ रोजी मंत्रालयात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत प्रकल्पग्रस्तांना रोजगारामध्ये सामावून घेण्याबाबत निर्णय झाला होता. यासंदर्भातील पुढील कार्यवाहीची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आली होती. त्यानंतर १७ फेब्रुवारी २०२६ रोजी उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतही जिल्हाधिकाऱ्यांना पाच दिवसांत कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप प्रकल्पग्रस्तांनी केला आहे. प्रकल्पासाठी जमिनी देऊनही ३२४ प्रकल्पग्रस्त रोजगारापासून वंचित असल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला आहे. जिल्हा प्रशासनाच्या दिरंगाईच्या भूमिकेविरोधात नाराजी व्यक्त करत त्यांनी उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे.या उपोषणात गंगाराम मिनमिने, सुरेश कोकाटे, राकेश जवके, रोशन जांबेकर, बबन शिंदे यांच्यासह मोठ्या संख्येने प्रकल्पग्रस्त व महिला सहभागी झाल्या आहेत.

**चर्चा ठरली निष्फळ**

अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेल्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर पुनर्वसन विभागाचे उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे यांनी आंदोलनकर्त्यांच्या शिष्टमंडळासोबत दुपारी बैठक घेतली. त्यांच्या दालनात झालेल्या बैठकीत प्रकल्पग्रस्तांनी आपल्या मागण्या आणि अडचणी सविस्तर मांडल्या. मात्र, चर्चेत कोणताही तोडगा न निघाल्याने बैठक निष्फळ ठरली. त्यानंतर न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त करत प्रकल्पग्रस्तांनी उपोषण कायम ठेवण्याचा निर्णय घेतला.

### कोरस कंपनीला ४५ लाखांचा गंडा

फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर कंपनी व्यवस्थापनाने पोलिसांत धाव घेतली.याप्रकरणी कोरस इंडिया लिमिटेडचे व्यवस्थापक राजेंद्र शिवदास पाटील (रा. पारसीवाडी, कोपरी, जि. ठाणे) यांनी दिलेल्या तक्रारीवरून २९ मे रोजी रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.दरम्यान, गुन्हा दाखल झाल्याची माहिती मिळताच सर्व आरोपी फरार झाले असून, त्यांचा शोध सुरू आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सूर्यकांत पवार करीत आहेत. एमआयडीसी परिसरातील औद्योगिक व्यवहारांमध्ये अशा प्रकारची फसवणूक उघड झाल्याने उद्योग क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

# तिसऱ्या मुंबईविरोधातील लढ्याला शेकापचा पाठिंबा

**७ जूनच्या चिरनेर सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन**

। चिरनेर । प्रतिनिधी ।

सेझनंतर नैना आणि एमएमआरडीएसारखे प्रकल्प शेतकऱ्यांच्या जमिनींवर डोळा ठेवत असून, शेतकऱ्यांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी शेतकरी कामगार पक्ष तिसऱ्या मुंबईविरोधातील लढ्यात ठामपणे उभा असल्याची भूमिका उरण पंचायत समितीचे सभापती महेश म्हात्रे यांनी व्यक्त केली.

उरण तालुक्यातील आवरे येथे शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी मार्गदर्शन करताना महेश म्हात्रे म्हणाले की, सेझविरोधातील लढ्यात उरण, पेण आणि पनवेलमधील शेतकऱ्यांनी एकजुटीच्या बळावर विजय मिळवला. मात्र, आता एमएमआरडीएच्या माध्यमातून नव्या स्वरूपात शेतकऱ्यांवर संकट आणण्याचा प्रयत्न होत आहे. या विरोधात शेकापचे कार्यकर्ते पेटून उठले पाहिजेत. पक्षाचे दिवंगत नेतेही हाच संदेश देऊन गेले असून, ७ जून रोजी चिरनेर येथे होणाऱ्या तिसऱ्या मुंबईविरोधातील सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी शेकापचे चिटणीस तथा कामगार नेते रवी घरत यांनी सरकारच्या हुकूमशाही आणि दडपशाहीच्या विरोधात शेकाप संघर्ष करत राहील, असे सांगितले. माजी न्यायमूर्ती बी. जी. कोळसे-पाटील यांच्या उपस्थितीत होणाऱ्या सभेला कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहनही त्यांनी केले. बैठकीस चिरनेर विभाग प्रमुख सुरेश पाटील, माजी सरपंच रमाकांत जोशी, हरेंद्र गावंड, चंद्रशेखर पाटील, पंचायत समिती सदस्य प्रारंभी गावंड, आवरे गावाध्यक्ष संजय गावंड, संदीप गावंड, युवा नेते विजय कडू आदींसह गावांतील शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# कोकणात 'एल निनो'चे महाकाय संकट!

## आंबा-काजूनंतर आता खरीप हंगामही धोक्यात?; कृषी विभागाने दिला इशारा

**। रायगड । प्रतिनिधी ।**

बदलत्या वातावरणाचा मोठा फटका बसलेल्या कोकणातील शेतकऱ्यांससमोर आता 'एल निनो' चे महाकाय संकट उभे राहत आहे. या नव्या संकटामुळे पावसात खंड पडल्यास, पावसावर अवलंबून असलेल्या जिल्ह्यातील खरीप हंगामावर विपरित परिणाम होणार आहे. शासन, प्रशासन आणि कृषी विभाग या संभाव्य संकटाबाबत सतर्क झाले आहेत.

संकटाचा प्रभाव कमी करून शेतकऱ्यांचे नुकसान कसे टाळता येईल, यादृष्टीने आखणी केली जात आहे; परंतु ती पुरेशी आहे का? गावपातळीवर सभा घेऊन त्याची अंमलबजावणी होईल का? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. याशिवाय 'एल निनो'चा प्रभाव खरिपासह रब्बी आणि पुढील वर्षीच्या आंबा-काजू हंगामावर कितपत होईल, याचा सखघेल अभ्यास केला जात आहे.

कडाक्याची थंडी, धुके आणि ढगाळ वातावरण यामुळे आंबा, काजू, जांभूळ, कोकम यांसारख्या प्रमुख फळपिकांना प्रचंड मोहोर आला. परंतु, थंडी आणि धुक्यामुळे २० ते ३० टक्केदेखील फळधारणा झाली नाही. झालेल्या फळधारणेवर अवकाळी पावसाचा मारा झाला. काही ठिकाणी गारपीट, तर काही भागात वादळाचा तडाखा बसला. उरलेसुरले पीक तापमानवाढीने होरपळले. त्यामुळे हंगाम संपल्यानंतर शेतकऱ्यांच्या हातात 'जमाबाकी शून्य' असेच चित्र कोकणात आहे. या पार्श्वभूमीवर येत्या खरीप हंगामाकडून शेतकऱ्यांना मोठ्या अपेक्षा होत्या. मात्र, त्यावर आता 'एल निनो'चे संकट घोंघावू लागले आहे.

रायगड जिल्ह्याच्या दृष्टीने खरीप हंगाम अत्यंत महत्त्वाचा आहे. खरिपात भात, नाचणी, भाजीपाला अशी अनेक पिके घेतली जातात. येथील शेतकरी वर्षभरासाठी लागणारे भात उत्पादित करतो. स्वतःच्या कुटुंबाला पुरेसे धान्य ठेवून उर्वरित भाताची विक्री केली जाते. त्यामुळे भात हे केवळ उपजीविकेचे साधन नसून, आर्थिक उलाढालीचेही माध्यम आहे. सध्या भाताला प्रतिक्विंटल २,३६९ रुपये दर मिळत आहे. जिल्ह्याच्या भात खरेदीतून कोट्यवधी रुपयांची उलाढाल होते.

यंत्रणा सतर्क 'एल निनो'च्या संभाव्य धोक्यामुळे शेती व बागायतीवर होणारा परिणाम टाळण्यासाठी शासन आणि कृषी विभाग सतर्क झाला आहे. जनजागृतीसाठी ग्रामपंचायतींमध्ये गावसभा घेण्यात आल्या. यामध्ये शेतकऱ्यांनी कोणत्या वाणांची निवड करावी आणि पाण्याचे नियोजन कसे करावे, याची माहिती देण्यात आली.

हवामानावर आधारित कृषी सल्ला आता 'व्हॉईस' स्वरुपात दिला जातो. किमान किती पाऊस पडेल आणि वातावरण कसे राहील, याची माहिती असते. शेतकऱ्यांनी या सल्ल्याचे अवलोकन करूनच निर्णय घेणे आवश्यक आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी याची दखल घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. अलीकडील काळात वरकस जमिनीत लागवडीचे प्रमाण वाढल्याने नदी-नाल्यांनजीकच्या जमिनी पडिक राहिल्या आहेत. जलस्रोत टिकून राहणाऱ्या जमिनींमध्ये पीक लागवड करण्याची गरज आहे, जेणेकरून गरज भासल्यास पाणी देता येईल.

### शेतात पाणी टिकवण्यावर भर

पावसाचे पाणी शेतात न थांबता थेट नदी-नाल्यांमधून समुद्राला जाऊन मिळते. यावर्षी शेतकऱ्यांनी पाणी शेतातच मुरवण्यावर भर दिला पाहिजे. यासाठी नांगरणी करताना आडवी नांगरणी करावी. समतल पातळीवर पेरणी करावी. बाष्पीभवन रोखण्यासाठी पालापाचोळ्याच्या जैविक आच्छादनाचा वापर करावा. डोंगराळ भागात समपातळीवर चर खोदावेत.



### खरीप हंगामावर सावट

यंदाचे हे 'एल निनो'चे वर्ष असल्याचे हवामान विभागाने जाहीर केले आहे. ज्यावर्षी 'एल निनो'चे सावट असते, त्यावर्षी पावसाचे प्रमाण कमी राहते. रायगड हा भातपिकाचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यात एक लाख हेक्टर क्षेत्रावर भातपिकाची लागवड केली जाते. पैकी ५० टक्के लागवड ही वरकस जमिनीत, अर्थात पूर्णतः पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. काही क्षेत्रावर भातरोप पुनर्लागवड करण्यासाठी मोठ्या पावसाची गरज असते. जर तसा पाऊस झाला नाही, तर भात लागवड अडचणीत येण्याचा धोका असतो. यावर्षी 'एल निनो'मुळे जुलै-ऑगस्टमध्ये पाऊस कमी पडण्याचा किंवा खंड पडण्याचा अंदाज आहे. ६ ते २० जूनपर्यंत पेरण्या चालतात आणि लावणी २५ जून ते जुलै अखेरीपर्यंत चालते. त्यामुळे जुलैमध्ये पावसाने ओढ दिली, तर शेती संकटात सापडेल. पावसाअभावी वेळेत लागवड झाली नाही, तर उत्पादनावर मोठा परिणाम होऊ शकतो.

# निवडक



## महिला काँग्रेसतर्फे आंदोलन

**उरण** : केंद्रातील मोदी सरकारने पेट्रोल, डिझेल, गॅस सिलिंडर यांच्या किमती वाढवल्या आहेत. त्यामुळे महागाई गगनाला भिडली आहे. त्यामुळे सामान्य जनता भरडली जात आहे. त्यामुळे महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा संध्या सव्वालाखे यांच्या आदेशानुसार रायगड जिल्हा काँग्रेस महिला अध्यक्षा रेखा घरत यांच्या अध्यक्षतेखाली उरण तालुक्यातील फुंडे पेट्रोल पंपावर आंदोलन करण्यात आले. यावेळी महिलांनी मोदी सरकारविरोधात तीव्र भावना व्यक्त केल्या. सध्याचे भाजप सरकार विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळत आहे. नीट पेपर लिक झाल्याने विद्यार्थ्यांच्या भवितव्यावरच टांगती तलवार आहे. त्यामुळे भाजप सरकारचा निषेध करावा तेव्हढा थोडा आहे. आता तरी मोदी सरकारने पेट्रोल, डिझेल, गॅस सिलिंडर यांच्या किमती तातडीने कमी कराव्यात आणि जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणीही रायगड जिल्हा महिला काँग्रेसतर्फे यावेळी करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष रेखा घरत, योगसाधना पाटील, अश्रया शिवकर, निर्मला पाटील, सोनाली पाटील, मनीषा पाटील, प्रमिला पाटील, पार्वती पंडित, माला पाटील, वर्षा पाटील आदी महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या.



## कर्जत आगारात वर्धापन दिन उत्साहात

**कर्जत** : कर्जत एसटी आगारात वर्धापन दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. केक कापून प्रवाशांना लाडू वाटून वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. एसटी आगारात वर्धापन सोहळ्यानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. रेश्मा खडे यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून समारंभाचे उदघाट केले. आगार व्यवस्थापक देवानंद मोरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. याप्रसंगी ज्येष्ठ प्रवासी कान्हू पवार, कोकण एसटी प्रेमी संघटनेचे फरहान होडेकर, महेश खडे, सहाय्यक वाहतुक निरीक्षक महादेव पालवे, दीपक देशमुख आदी उपस्थित होते. कान्हू पवार यांच्या हस्ते केक कापण्यात आला. त्यानंतर प्रवाशांना लाडू वाटण्यात आले. याप्रसंगी प्रा. खडे यांनी एसटी जरी निर्जीव असली तरी चालक व वाहक आणि कर्मचाऱ्यांमुळे एसटी सजीव होऊन प्रवाशांची सेवा करीत आली आहे. एसटीने अनेकांचे जीवन मार्गी लावली आहे. अजूनही ग्रामीण भागातील जनता एसटीवर अवलंबून आहे. एसटी म्हणजे सुरक्षित व वेळेवर प्रवास म्हणून तिच्यावर प्रेम करणारे अजूनही आहेत, असे सांगितले. आगार व्यवस्थापक मोरे यांनी, मया आगारात ६० कर्मचारी कमी आहेत. तरी सुद्धा आहेत त्या कर्मचाऱ्यांना बरोबर घेऊन आगार चांगल्या प्रकारे चालण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. असे सांगितले. सूत्रसंचालन दीपक देशमुख यांनी केले. याप्रसंगी वाहतूक नियंत्रक संजय कोंडार, विलास बागुल, अरुण थोराड, कृष्णा शिंदे, अनुजा सुरावकर, संगीता शिरगिरे आदी उपस्थित होते.

## यश नाक्तीची सैन्यदलात निवड

**कापोली** : गेल्या वर्षभरात श्रीवर्धन तालुक्यातील विशेषतः वडवली दिघी व बोर्लीपंचतन गावातील एका पाठोपाठ एक अशा मुला-मुलींची सैन्य दल व पोलीस भरतीत निवड होत असल्याने तालुक्यातील विविध समाजासह खास करुन आगरी समाजाचा मान उंचावत चालला आहे. वडवली येथील आगरी समाजाचा सुपुत्र यश सचिन नात्की याची नुकतीच सैन्य दलात निवड झाल्याचे वृत्त अत्यंत आनंददायी व अभिमानास्पद आहे. देशसेवा हे प्रत्येक भारतीयांचे सर्वोच्च कर्तव्य मानले जाते. मातृभूमीच्या रक्षणासाठी स्वतःला समर्पित करण्याचे स्वप्न अनेकजण पाहतात, मात्र ते पूर्ण करण्यासाठी अथक परिश्रम, जिद्द, शिस्त आणि समर्पणाची आवश्यकता असते. यशने आपल्या मेहनतीच्या जोरावर हे यश संपादन करून श्रीवर्धन तालुक्यासह स्वतःचे, आपल्या कुटुंबाचे आणि संपूर्ण आगरी समाजाचे नाव उज्ज्वल केले आहे. यशने ज्ञानदा करीअर अकॅडमी नाशिक येथील पोलीस व आर्मी भरतीपुर्व प्रशिक्षण केंद्रात ॲडमिशन घेऊन जिद्दीने एक एक पाऊल पुढे टाकत स्वतःला सिद्ध करत प्रचंड मेहनत घेत विश्वास नागरेपाटलांचे पुस्तक वाचन करुन सोशल मिडियावरुन देखील मार्गदर्शन घेऊन रात्रंदिवस कष्ट घेत गरुड झेप घेतली.यात ज्ञानदा करीअर अकॅडमीचे संस्थापक सुदाम शेळके यांचा देखील मोलाचा वाटा आहे असे समजते. त्याच्या यशाचा सर्वच भागातील मनापासून कौतुक होत आहे.




# उरण-पनवेल मुख्य रस्त्यावर मृत्यूचा सापळा

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण-पनवेल या मुख्य रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी तेलीपाडा आणि नवीन शेवा गावच्या हद्दीतील गतिरोधक गेल्या कित्येक महिन्यांपासून अत्यंत धोकादायक बनले आहेत. या मुख्य रस्त्यावरील गतिरोधकांना लागूनच मोठे खड्डे पडले असून, विशेषतः तेलीपाडा येथील एका गतिरोधकाच्या बाजूला पाईपलाईन टाकताना खोदलेले मोठे चर कंत्राटदाराने तसेच ठेवून दिले आहेत. हे खड्डे आणि चर चुकवण्याच्या नादात समोरून येणाऱ्या वाहनांशी थेट धडक होऊन मोठा अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. अवघ्या चार दिवसांवर पावसाळा येऊन ठेपला असून, त्यापूर्वी रस्ता दुरुस्त न झाल्यास येथे गंभीर दुर्घटना घडू शकते, अशी भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.



तेलीपाडा येथील एका गतिरोधकाच्या बाजूने उकरलेला रस्ता आणि तो चर योग्य रीतीने न बुजवल्यामुळे तो तशाच धोकादायक स्थितीत राहिला आहे, तर मुख्य रस्त्यावरील इतर गतिरोधकांच्या बाजूला मोठमोठाले खड्डे पडले आहेत. वेग मर्यादित करण्यासाठी असलेल्या गतिरोधकांवरच गाड्या आदळत असल्याने आणि ते वाचवताना अपघात होण्याची शक्यता असल्याने वाहनचालकांचा जीव धोक्यात आला आहे.

उरण रेल्वे स्टेशनच्या दोन्ही बाजू अजूनही प्रवाशांसाठी पूर्ण क्षमतेने खुल्या झालेल्या नाहीत. त्यामुळे तेलीपाडा, करंजा, चाणजे आणि नवीन शेवा परिसरातील शेकडो प्रवाशांना लोकल ट्रेन पकडण्यासाठी उरण बाजारपेठेतून जाण्याऐवजी द्रोणागिरी स्टेशन गाठावे लागते. सकाळी आणि संध्याकाळी ट्रेन पकडण्याच्या घाईत असणारे नोकरदार आणि वाहन चालक या मुख्य रस्त्यावरील खोदलेल्या चरांमुळे आणि खड्ड्यांमुळे त्रस्त झाले आहेत.

# म्हसळा नगराध्यक्ष सुनील शेडगे यांची बिनविरोध निवड



**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा नगर पंचायतीच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक सुनील शेडगे यांची अखेर बिनविरोध निवड झाली आहे. शिवसेना शिंदे गटाचे नगरसेवक सूफीयान हळदे यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने निवडणूक बिनविरोध होण्याचा मार्ग मोकळा झाला होता.सोमवारी झालेल्या विशेष सभेत निवडणूक पीठासन अधिकारी तथा तहसीलदार सचिन खाडे यांनी शेडगे यांच्या बिनविरोध निवडीची अधिकृत घोषणा केली.यावेळी मुख्याधिकारी विठ्ठल राठोड, गटनेते संजय कर्णिक तसेच महायुतीचे सर्व नगरसेवक उपस्थित होते.

नगराध्यक्ष निवडणुकीच्या सुरुवातीच्या टप्प्यात महायुतीतील अंतर्गत मतभेद उघड झाल्याने राजकीय वातावरण तापले होते. सुनील शेडगे यांच्या विरोधात शिवसेना शिंदे गट आणि काँग्रेसच्या पाठिंब्याने सूफीयान हळदे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यामुळे बिनविरोध निवडीची अपेक्षा असतानाच निवडणुकीत चुरस निर्माण झाली होती.मात्र २७ मे रोजी हळदे यांनी अर्ज मागे घेतल्याने शेडगे यांच्या निवडीचा मार्ग सुकर झाला. म्हसळा नगर पंचायतीत गेल्या चार महिन्यांत नगराध्यक्ष निवडीची प्रक्रिया चार वेळा पार पडल्याने स्थानिक राजकारण सातत्याने चर्चेत राहिले आहे.अशा परिस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक सुनिल शेडगे यांना अखेर नगराध्यक्षपदाची संधी मिळाली आहे. खासदार सुनील तटकरे यांचे खंदे समर्थक म्हणून ओळख असलेले शेडगे हे शहरातील चिराठी वाडी-वस्तीतील सामान्य कुटुंबातून पुढे आलेले लोकप्रतिनिधी आहेत. त्यांच्या कार्यकर्तृत्वामुळे यापूर्वी हुकलेली संधी अखेर त्यांना नशिबाने प्राप्त झाली आहे.नगराध्यक्षपदापूर्वी त्यांनी उपनगराध्यक्ष तसेच बांधकाम व पाणीपुरवठा विषय समितीचे सभापती म्हणूनही यशस्वीपणे काम पाहिले आहे.त्यांच्या निवडीमुळे समर्थक, मित्रपरिवार आणि महायुतीतील कार्यकर्त्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून शहराच्या विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# शिवराज्याभिषेकासाठी वाहतुकीवर अंकुश

**। रायगड । प्रतिनिधी ।**

श्री शिवराज्याभिषेक सोहळा सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टिकोनातून शुक्रवारी (दि.५) सायं.४.०० ते शनिवारी (दि.६) रात्रौ १०.०० वाजेपर्यतच्या कालावधीमध्ये मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील वाकणफाटा नागोठणे ते कशेडी पर्यत तसेच माणगांव-निजामपुर मार्गे पाचाड ते रायगड किल्ला, माणगांव ढालघरफाटा मार्गे पाचाड ते रायगड किल्ला, महाड नातेखिंड मार्गे पाचाड ते रायगड किल्ला या मार्गावरील होणारी सर्व प्रकारच्या जड-अवजड वाहनांकरिता जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी वाहतुकबंदी अधिसूचना जारी केली आहे.




या कार्यक्रमासाठी रायगड, पुणे, सातारा, कोल्हापुर, मुंबई वैगेरे ठिकाणाहून लाखोंच्या संख्येने श्री शिवभक्त हे आपआपली वाहने घेवून येत असतात. या कार्यकमाच्या वेळी कोठे ही वाहतुक कोंडी निर्माण होवू नये व श्री शिवराज्याभिषेक सोहळ्याकरीता येणारे शिवभक्त यांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी वाहतूक बंदी जाहीर केली आहे. वाहतूक बंदी अधिसूचना ही दुध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचे गॅस, औषधे, ऑक्सीजन, भाजीपाला इत्यादी जीवनावश्यक वस्तू वाहून नेणारी वाहने, पोलीस वाहने, फायर ब्रिगेड वाहने, रुग्णवाहिका या वाहनांना लागू राहणार नाही.

## गणेश म्हात्रे सेवानिवृत्त

**। खरोशी । वार्ताहर ।**

पेण तालुक्यातील खारसापोली येथील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथील आदर्श शिक्षक गणेश भास्कर म्हात्रे यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित करण्यात आलेला निरोप समारंभ मोठ्या उत्साहात व भावनिक वातावरणात पार पडला. १ जून १९६८ रोजी बळवली येथील गरीब कुटुंबात जन्मलेल्या गणेश म्हात्रे यांनी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत शिक्षण पूर्ण करून डीएड शिक्षण घेऊन २७ जुलै १९९२ ते ३१ मे २०२६ या ३४ वर्षाच्या प्रदीर्घ अनुभव घेऊन शिक्षण क्षेत्रात अनेक वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावत असताना विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मोलाचे योगदान दिले.

## कार्यकर्ता प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन

**। उरण । प्रतिनिधी ।**

माहिती अधिकार कार्यकर्ता संघ उरण तालुकाच्या वतीने विशेष विचारविनिमय बैठक व प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आले आहे. या कार्यशाळेमध्ये विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.माहिती अधिकार कायद्याचा प्रभावी वापर, कार्यकर्त्यांना येणाऱ्या अडचणी व त्यांचे निराकरण, अर्ज, अपील व तक्रार प्रक्रियेबाबत मार्गदर्शन, संघटनात्मक कामकाज व पुढील नियोजन, नवीन कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण व मार्गदर्शन अशा विविध विषयावर मार्गदर्शन करण्यात येणार आहे .

# १९६२ हेल्पलाइन बनतेय पशुपालकांचा आधार

**। रायगड । प्रतिनिधी ।**

गेल्या पाच वर्षांत, भारत फायनान्शियल इंक्लुजन लिमिटेड, इंडसइंड बँक व पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या १९६२ या टोल-फ्री हेल्पलाइनने राज्यातील पशुवैद्यकीय सेवांचे जाळे बळकट केले आहे. 'मोबाईल व्हेटर्नरी युनिट्स' म्हणजेच फिरत्या पशुवैद्यकीय वाहनांच्या माध्यमातून या उपक्रमाने विशेषतः ग्रामीण व दुर्गम भागातील शेतकऱ्यांना त्यांच्या दारात पशुवैद्यकीय आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली आहे. आतापर्यंत ८ लाखांहून अधिक जनावरांवर उपचार करण्यात आले असून, यामुळे पशुधनाची वेळेवर, सुलभ व विश्वासार्ह काळजी घेणे शक्य झाले आहे.

या उपक्रमाच्या यशानंतर, भारत फायनान्शियल इंक्लुजन लिमिटेड व पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सेवा अधिक गतिमान करण्यासाठी 'व्हॉट्सॲप-आधारित चॅटबॉट सेवा' सुरू केली आहे. या डिजिटल उपक्रमाचा उद्देश संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांना सेवा मिळवणे सोपे करणे, संवाद सुलभ करणे व रिअल-टाइम पशुवैद्यकीय साहाय्य प्रदान करणे हा आहे.

# पर्यटन उद्योजक घडविण्यासाठी 'अमृत'चा पुढाकार

**। रायगड । प्रतिनिधी ।**

अमृत या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेमार्फत राबविण्यात येत असलेल्या ''अमृत पर्यटन'' उपक्रमांतर्गत पर्यटन क्षेत्राशी संबंधित उद्योजक, व्यावसायिक व नवउद्योजकांसाठी उद्योजकता कौशल्य विकास कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

अमृत पर्यटन हा महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्राला चालना देण्यासाठी, स्थानिक रोजगार निर्मिती वाढविण्यासाठी तसेच पर्यटनाशी संबंधित उद्योजकांना सक्षम करण्यासाठी राबविण्यात येणारा महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. या उपक्रमाद्वारे राज्यातील पर्यटन स्थळे, पर्यटन सेवा, स्थानिक उत्पादने व पर्यटन व्यवसायांना नवीन संधी उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे.

या कार्यक्रमात Tour & Travels व्यवसायिक, Tourist Guides, Cook & Caterers, होमस्टे व रिसॉर्ट संचालक, पर्यटन सेवा पुरवठादार, धार्मिक व सांस्कृतिक पर्यटनाशी संबंधित उद्योजक तसेच पर्यटन क्षेत्रात नवीन व्यवसाय सुरू करू इच्छिणारे युवक-युवती सहभागी होऊ शकतात. कार्यक्रमादरम्यान सहभागी उद्योजकांना व्यवसाय उभारणी व विस्तारासाठी आवश्यक मार्गदर्शन, प्रभावी व्यवसाय नियोजन, आधुनिक विपणन तंत्रज्ञान, डिजिटल मार्केटिंग, ग्राहक व्यवस्थापन, आर्थिक नियोजन, ब्रँडिंग, पर्यटन क्षेत्रातील नवीन व्यावसायिक संधी तसेच शासनाच्या विविध योजना व सहाय्याबाबत सविस्तर माहिती देण्यात येणार आहे.

तसेच अनुभवी तज्ज्ञ व क्षेत्रातील यशस्वी उद्योजकांकडून प्रत्यक्ष अनुभवाधारित मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार असून, सहभागी उद्योजकांना पर्यटन व्यवसाय अधिक प्रभावीपणे विकसित करण्यासाठी आवश्यक दिशा व मार्गदर्शन मिळणार आहे. अमृत पर्यटन अंतर्गत पर्यटन क्षेत्रात स्वयंरोजगाराला प्रोत्साहन व प्रशिक्षण देण्यासाठी सुरू करण्यात आलेला आहे.

## पोर्टलच्या तांत्रिक विश्लेषणाचा प्रभावी वापर | माणगाव पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी

# गहाळ मोबाईल दिले मालकांच्या ताब्यात

**सलीम शेख**

**। माणगाव ।**

सर्वसामान्य नागरिकांचे गहाळ अथवा चोरीस गेलेले मोबाईल फोन शोधून देण्यासाठी केंद्र शासनाने सुरू केलेल्या पोर्टलचा प्रभावी वापर करत माणगाव पोलीस ठाण्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव पोलीस ठाण्यात कार्यरत पोलीस अंमलदार सुग्रीव उद्धवराव मुंडे यांनी मागील एक महिन्याच्या कालावधीत पोर्टलच्या माध्यमातून गहाळ झालेल्या तब्बल १५ मोबाईल फोनचा शोध लावला. या मोबाईल फोनची एकूण अंदाजित किंमत सुमारे ४ लाख रुपये इतकी आहे.



गहाळ मोबाईल बाबत प्राप्त झालेल्या तक्रारींची सखोल पडताळणी करून तसेच पोर्टलवर तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे संबंधित मोबाईलचा मागोवा घेण्यात आला. अथक प्रयत्नांनंतर विविध ठिकाणांहून हे मोबाईल हस्तगत करण्यात आले. त्यानंतर आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून आज रोजी संबंधित तक्रारदारांना त्यांचे मोबाईल सुस्थितीत परत करण्यात आले.आपले हरवलेले मोबाईल पुन्हा मिळाल्याने तक्रारदारांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून त्यांनी माणगाव पोलीस ठाण्याचे तसेच पोलीस निरीक्षक संजय बांगर आणि पोलीस अंमलदार सुग्रीव मुंडे यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. यावेळी नागरिकांनी देखील माणगाव पोलिसांच्या या कार्याचे कौतुक केले. आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून नागरिकांना दिलासा देण्याचे काम माणगाव पोलीस ठाण्याकडून सातत्याने सुरू असून भविष्यातही अशाच प्रकारे जनसेवेसाठी कटिबद्ध राहणार असल्याचा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला.

हरवलेला मोबाईल शोधून देणे ही केवळ मालमत्ता परत मिळवून देण्याची बाब नसून नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ करण्याचे काम आहे, अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

# महाडच्या विवेक म्हामुणकरची सैन्यदलात झेप!

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड तालुक्यातील वलंग गावच्या विवेक बळीराम म्हामुणकर याने सलग दोन पराभवांनी खचून न जाता, तिसऱ्या प्रयत्नात भारतीय सैन्य दलात यशस्वी झेप घेतली आहे. पहिल्या प्रयत्नात मैदानी तर दुसऱ्या प्रयत्नात लेखी परीक्षेत अपयश आले होते. मात्र, आर्थिक टंचाई आणि अपयशाचे चटके अशा दुहेरी संघर्षावर मात करत विवेकने आपले देशसेवेचे स्वप्न अखेर साकार केले आहे.




विवेकचे हे यश त्याच्या कुटुंबाच्या मोठ्या त्यागाचे प्रतीक आहे. त्याची आई उज्वला म्हामुणकर यांनी स्वतः वडापावची गाडी चालवून, उन्हातान्हात कष्ट करत मुलाच्या स्वप्नांना बळ दिले. कठीण काळात काका किशोर विचारे आणि कुटुंबीयांनी त्याचा आत्मविश्वास तुटू दिला नाही. वडापाव विकून मुलाला मफौजीफ बनवणाऱ्या आईच्या कष्टांना आणि विवेकच्या चिकाटीला आज संपूर्ण रायगड जिल्हा सलाम करत आहे.

# या बोक्याचे का फावते?

देवेंद्र फडणवीसांचे सरकार आयाबहिणींचा फार कळवळा असल्याचे दाखवते. पण तो मतलबी व कावेबाज पवित्रा आहे. एकीकडे अपात्र लाडक्या बहिणींवर २१ हजार कोटी रुपये खर्ची पडले, मात्र आता त्यांच्यावर काहीही कारवाई होणार नाही अशी निर्ल्लज्ज कबुली देणारे हे सरकार गेले दोन दिवस आझाद मैदानात बसलेल्या आशा व अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मागण्या मात्र ऐकायला तयार नाही. ज्यावेळी लाडकी बहीण योजना सुरु झाली त्याचवेळी म्हणजे ५ जुलै २०२४ च्या मंत्रिमंडळ बैठकीत शालेय पोषण आहार कामगारांच्या मानधनात एक हजार रुपयांची वाढ करण्याचा निर्णय झाला होता. गावोगावच्या अंगणवाड्या, बालवाड्या किंवा शाळांमध्ये मुलांसाठी खिचडी करणाऱ्या या महिलांना जेमतेम मेहनताना मिळतो. वास्तविक या खिचडीमुळेच शाळांमधील उपस्थिती वाढते व महाराष्ट्राचे अधिकाधिक शिक्षण प्रसाराचे स्वप्न पूर्ण होत असते. पण त्याची या सरकारला पर्वा नाही. सरकारने दोन वर्षांपूर्वी घेतलेल्या आपल्याच निर्णयाची अजूनही पूर्णांशाने अंमलबजावणी केलेली नाही. त्याऐवजी सरसकट सगळ्या महिलांना दीड हजारांचा रमणा वाटणे सरकारला अधिक सोईस्कर वाटले. अंगणवाडी सेविकांच्या मागण्याही गेल्या अनेक वर्षांपासून कायम आहेत. अंगणवाडी कर्मचारी या खेड्यापाड्यातील जनतेपर्यंत पोचणाऱ्या सरकारच्या सर्वात भरवशाच्या प्रतिनिधी असल्याचे वारंवार सिद्ध झाले आहे. कोविडच्या काळात स्वतः जिवावरची जोखीम घेऊनही या कर्मचाऱ्यांनी लस घेण्याचा प्रचार केला. गर्भवती महिलांनी त्यांचा आहार वेळेत घ्यावा म्हणून काळजी घेतली. त्याचे रेकॉर्ड ठेवले. एरवीही त्या हे काम करत असतात. कहर म्हणजे लाडकी बहीण योजनेचे अर्जही त्यांच्यामार्फत वाटले व भरले गेले. पण त्यांना याचा काही फायदा झाला नाही. आपल्याला सरकारी सेवेत कायम करावे, इएसआय, भविष्य निर्वाह निधी, ग्रॅच्युईटी, पेन्शन योजना लागू करावी, त्यांचे मानधन, प्रवासभत्ता नियमित मिळावे, प्रोत्साहनभत्ता वाढवावा, नवीन मोबाईल द्यावा अशा त्यांच्या अत्यंत साध्या मागण्या आहेत व त्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. आंदोलने झाली की सरकार तात्पुरते त्यांना आश्वासने देते. या महिला मुंबईतून माघारी परत जातात. पण त्यांना नंतर त्यांच्या तोंडाला कायम पाने पुसली जातात.

### महायुतीवर खटले भरायला हवेत

आता दुसरे चित्र पाहा. गेल्या विधानसभा निवडणुकीपूर्वी लाडकी बहीण योजना आणण्यात आली. आता तिचे धिंडवडे निघत आहेत. या योजनेतील ८१ लाख महिलांना अपात्र ठरवून आता वगळण्यात आले आहे. त्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सध्या वारंवार देत आहेत. पण महिलांना वगळणे हा राज्य सरकारसाठी गौरवाचा भाग नाही. तर मुळात या अपात्र लोकांना बिनदिक्कत योजेनेत सामील करून घेतले त्याबद्दल तेव्हाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंडळी तसेच सगळे सचिव आणि सरकारी कर्मचारी यांच्यावर किमान प्रतिकात्मक खटले भरायला हवेत. या अपात्र लोकांवर सरकारी तिजोरीतला, म्हणजेच जनतेचा, तब्बल २१ हजार कोटी रुपये इतका निधी उधळला गेला आहे. त्यावळी महायुतीला काय वाट्टेल ते करून निवडणुका जिंकायच्या होत्या. त्यासाठी भ्रष्टाचाराच्या पापात जनतेला सामील करून घेतले गेले. ८१ लाख महिला अपात्र ठरल्या म्हणजे किमान त्यांच्या घरातील प्रत्येक दोन मते धरली तरी दोन कोटी मते या महायुतीच्या बाजूने दिली गेली असण्याची शक्यता आहे. हा प्रचंड महाघोटाळा आहे. पण याबाबत देवेंद्र सांगताहेत काय तर कॅगने याबाबत ताशेरे मारले म्हणून आम्ही कारवाई केली. म्हणजे तोवर या योजनेत भानगडी चालू आहेत हे जणू यांना ठाऊकच नव्हते. ते जर खरे असेल तर यांना पदावर राहण्याचा हक्क नाही. इतकी बेदिली यांच्या हाताखाली प्रशासनात चालत असेल तर यांची तथाकथित कार्यक्षमता फुकट आहे. आणि समजा हे जाणूनबुजून झाले असेल तर देवेंद्र आणि मंडळी या भ्रष्टाचारात सहभागी होते असा निष्कर्ष निघेल. आता अपात्र ठरलेल्यांवर कोणतीही कारवाई केली जाणार नाही असे फडणवीस पुन्हा पुन्हा स्पष्ट करीत आहेत, हेही आक्षेपार्ह आहे. खरे तर, या अपात्रांकडून हे हजारो कोटी रुपये वसूल केले जायला हवेत. कारण या योजनेत अर्ज करणारे कोणी निरक्षर वा खेडूत लोक नव्हते. यात पाच लाख सरकारी कर्मचारी होते. दहा लाख महिला प्राप्तिकर भरणाऱ्या होत्या. चार ते पाच लाख तर अशा होत्या की त्यांच्याकडे चार चाकी गाड्या होत्या. त्यामुळे योजना नक्की कोणासाठी आहे व आपण त्यात पात्र नाही हे या सर्वांना बरोबर ठाऊक होते. पण शक्यता ही आहे की, महायुतीच्या कार्यकर्त्यांनीच त्यांना बहुदा आश्वासन दिले असावे की त्यांचे अर्ज मंजूर होतील.

### तुम्ही आम्ही मिळून खाऊ

त्यामुळे हा सर्व तुम्ही आम्ही मिळून खाऊ असा व्यवहार होता. या प्रकरणी या लोकांकडून तर पैसे वसूल केले जायला हवेतच. पण त्यांचे अर्ज दाखल करून घेणारी सरकारी यंत्रणा आणि त्यांचे राजकीय बॉसेस यांच्यावरही खटले भरले जायला हवेत. दुर्दैवाने, असे करण्याची इच्छाशक्ती आज विरोधकांमध्ये उरलेली नाही. उलट या योजनेतून नावे कापली गेल्याबद्दल ते सरकारला बोल लावत आहेत. आज या योजनेत सुमारे १ कोटी ६६ लाख महिला पात्र आहेत. शक्यता ही आहे की या संख्येमध्येही गडबडी असू शकतात. या महिलांची कसून छाननी केली तर आणखी असंख्य नावे वगळली जाऊ शकतील. पण सरकार याविषयी बोलतही नाही. आपल्या अर्थसंकल्पात यंदा दर्शवलेली महसूली तूट सुमारे ४० हजार कोटी रुपये आहे. त्याच्या निम्मी म्हणजे सुमारे २१ हजार कोटी रुपये रक्कम अपात्र लाडक्या बहिणींवर उधळण्यात आली आहे. एकीकडे निवडणूक जिंकण्यासाठी हा हजारो कोटींचा चुराडा घडवून आणला गेला. तर दुसरीकडे सामान्य गरीब कर्मचाऱ्यांच्या हक्काचे पैसेही हे सरकार डावलत आहे. अंगणवाडी सेविका दिवसरात्र मेहनत करतात. त्यांना कित्येक तास पायी वा वाहनाने हिंडावे लागते. मंत्रालयातील बाबू मंडळी घड्याळावर लक्ष ठेवून आठ तासानंतर लगेच बाहेर पडतात. अंगणवाडी सेविकांना कामाच्या तासांचे काही बंधनच नाही. पण त्यांना त्यांचे वाजवी पैसे देतानाही सरकारचा हात मागे जातो. त्यासाठी पुन्हा या कर्मचाऱ्यांनाच मुंबईत येऊन धरणे आंदोलन करावे लागते. पुन्हा ते करूनही सरकार त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करते. नजीकच्या काळातत कोणतीही मोठी निवडणूक नाही. शिवाय या महिलांची संख्या इतकी नाही की यांच्या मतदानात खूप फरक पडेल. त्यामुळे या कर्मचाऱ्यांकडे बिनदिक्कत दुर्लक्ष केले तरी चालते असा सरकारचा समज झाला आहे. त्यातच या सरकारने आता सतत हिंदू विरुध्द मुस्लिम असा वाद उभा करून सामान्य कष्टकरी जनतेतही फूट पाडली आहे. त्यांना आपले खरे प्रश्न कोणते यांचा विसर पडू लागला आहे. त्यामुळे या सरकाररुपी बोक्याचे फावते आहे. त्याच्या पाठीत दांडके हाणायची वेळ आली आहे.

---

विचार

# आणखी एक राजनैतिक फुगा

**जनार्दन पाटील**

***अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रिबेओ यांच्या भारत दौऱ्यात पाचशे अब्ज डॉलरच्या खरेदीचा आकडा हा सध्या तरी 'राजनैतिक फुगा' वाटत आहे. अमेरिकेच्या बदललेल्या अंतर्गत टॅरिफ कायद्यांमुळे भारताने कोणत्याही दबावाखाली न येता देशांतर्गत उद्योग आणि परकीय चलनाच्या स्थिरतेचे रक्षण करणे गरजेचे आहे. दोन्ही देशांना एकमेकांची गरज असली तरी हा संबंध समान पातळीवर आणि आर्थिक हिताचा आदर करणारा असावा.***



अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबिओ यांच्या भारत दौऱ्यात पाचशे अब्ज डॉलरच्या खरेदीचा आकडा हा सध्या तरी केवळ एक 'राजनैतिक फुगा' वाटत आहे. त्याला ठोस आर्थिक आणि कायदेशीर आधार नाही. अमेरिकेच्या बदललेल्या अंतर्गत टॅरिफ कायद्यांमुळे भारताने अशा कोणत्याही दबावाखाली न येता, आपल्या देशांतर्गत उद्योगांचे आणि परकीय चलनाच्या स्थिरतेचे रक्षण करणे गरजेचे आहे. दोन्ही देशांना एकमेकांची गरज आहे हे खरे असले, तरी हे संबंध समान पातळीवर आणि परस्परांच्या आर्थिक हिताचा आदर करणारे असावेत. आगामी काळात या तथाकथित व्यापार कराराचे तपशील समोर येतील, तेव्हाच या दौऱ्याचे खरे मूल्यमापन होऊ शकेल. तोपर्यंत भारताने अमेरिकेच्या 'भव्य घोषणां'कडे व्यावहारिक दृष्टिकोनातूनच पाहणे शहाणपणाचे ठरेल.

अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मार्को रुबिओ (मार्कियो) यांचा चार दिवसांचा भारत दौरा अशा वेळी पार पडला, जेव्हा दोन्ही देशांमधील संबंध गेल्या वर्षभरापासून अभूतपूर्व तणावातून आणि एका संथ दुराव्यातून जात होते. ट्रम्प प्रशासनाचे कठोर आयात शुल्क (टॅरिफ) धोरण आणि रशियाकडून भारताची तेल खरेदी यावरून निर्माण झालेली कटुता कमी करण्यासाठी रुबिओ भारतात आले होते. नवी दिल्लीमध्ये त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्याशी दीर्घ चर्चा केली तसेच क्वाड परिषदेच्या निमित्ताने हिंद-प्रशांत (इंडो-पॅसिफिक) क्षेत्रातील सुरक्षेचा आढावा घेतला. या दौऱ्याने दोन्ही देशांमधील सामरिक भागीदारीला नवी गती दिली असली, तरी व्यापारी आघाडीवर रुबिओ यांनी केलेला पाचशे अब्ज डॉलरच्या खरेदीचा दावा आणि भारत-अमेरिका व्यापार कराराची (बीटीए) सद्यस्थिती यामुळे एका मोठ्या धोरणात्मक संभ्रमाला जन्म दिला आहे. या दौऱ्याचे यशापयश आणि त्यातील अंतर्विरोध समजून घेणे गरजेचे आहे. या दौऱ्यातील सर्वात मोठा आणि लक्षवेधी ठरलेला मुद्दा म्हणजे रुबिओ यांनी 'सोशल मीडिया'वर केलेली घोषणा. भारताने पुढील पाच वर्षांमध्ये अमेरिकेकडून पाचशे अब्ज डॉलर (सुमारे ४१ लाख कोटी रुपये) किमतीच्या वस्तू खरेदी करण्याचे मान्य केले असल्याचा दावा त्यांनी केला. यामध्ये प्रामुख्याने ऊर्जा (तेल आणि गॅस), प्रगत तंत्रज्ञान (जीपीयू आणि डेटा सेंटर्स) आणि कृषी उत्पादनांचा समावेश असल्याचे सांगितले गेले.

वरकरणी हा आकडा दोन्ही देशांमधील व्यापाराला एका नव्या उंचीवर नेणारा वाटत असला, तरी आर्थिक तज्ज्ञ आणि जागतिक व्यापार विश्लेषकांनी या आकड्याच्या व्यवहार्यतेवर तीव्र साशंकता व्यक्त केली आहे. भारताचा सध्याचा अमेरिकेशी असलेला व्यापार, त्यातील अमेरिकेकडून होणाऱ्या आयातीशी असलेले प्रमाण पाहता हा आकडा अतिरंजित वाटतो. सध्याच्या आर्थिक वास्तवाचा विचार केला असता भारत दर वर्षी अमेरिकेकडून साधारणपणे ५३ अब्ज डॉलरची आयात करतो. रुबिओ यांचा पाचशे अब्ज डॉलरचा दावा खरा मानायचा झाल्यास भारताला आपली वार्षिक आयात दुप्पट करून दर वर्षी शंभर अब्ज डॉलरवर न्यावी लागेल. गेल्या वर्षभरात अमेरिकन डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपयाचे मूल्य सुमारे १२ टक्क्यांनी घसरले आहे. अशा स्थितीत अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणावर आयात वाढवणे भारताच्या परकीय चलन साठ्यावर प्रचंड ताण आणू शकते. भारताची व्यापारी तूट आधीच चिंताजनक असताना केवळ अमेरिकेला खूश करण्यासाठी एवढी मोठी आयात करणे भारताच्या देशांतर्गत अर्थव्यवस्थेसाठी आणि स्थानिक उद्योगांसाठी आत्मघातकी ठरू शकते.

रुबिओ यांच्या दौऱ्यातून भारत-अमेरिका द्विपक्षीय व्यापार कराराच्या (बीटीए) दिशेने प्रगती झाली का, या प्रश्नाचे होकारार्थी उत्तर देण्यापूर्वी या कराराच्या बदललेल्या कायदेशीर चौकटीकडे पहावे लागेल. रुबिओ यांनी दावा केला, की दोन्ही देश व्यापार कराराच्या अगदी अंतिम टप्प्यात असून काही आठवड्यांमध्येच त्यावर स्वाक्षरी होईल; परंतु वस्तुस्थिती वेगळी आहे.

फेब्रुवारी २०२६ मध्ये दोन्ही देशांनी एका अंतरिम कराराचा आराखडा तयार केला होता. त्यानुसार अमेरिकेने भारतीय उत्पादनावरील प्रस्तावित २५ टक्के आयात शुल्क कमी करून १८ टक्के करण्याचे मान्य केले होते आणि बदल्यात भारताने अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणावर ऊर्जा आणि विमानांची खरेदी करण्याचे आश्वासन दिले होते; मात्र २० फेब्रुवारी रोजी अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने ट्रम्प प्रशासनाचे ते आयात शुल्क कायदे अंशतः रद्द ठरवले. यामुळे कराराचा पायाच कोसळला. न्यायालयाच्या निर्णयानंतर ट्रम्प प्रशासनाने सरसकट सर्वच देशांवर दहा टक्के 'फ्लॅट टॅरिफ' लादले. याचा अर्थ असा, की भारताने अमेरिकेशी विशेष करार केला, तरी भारताला कोणतीही विशेष सवलत मिळणार नाही, कारण सर्वांसाठी एकच नियम लागू झाला आहे. अमेरिकेकडून भारताला कोणतीही विशेष व्यापारी सवलत मिळणार नसल्यास भारताने पाचशे अब्ज डॉलरच्या खरेदीचे बंधन का पाळावे, हा मूळ प्रश्न आहे. नुकतेच मलेशियानेही याच कारणास्तव अमेरिकेसोबतचा आपला व्यापार करार 'शून्य आणि बाद' घोषित केला. त्यामुळे रुबिओ गाजावाजा करत असलेल्या व्यापार कराराचा व्यापारी तर्क अत्यंत कमकुवत झाला आहे. व्यापारी आघाड्यांवर संभ्रम असला, तरी भूराजकीय आणि सामरिक पातळीवर या दौऱ्याने मोठे यश मिळवले आहे. नवी दिल्लीमध्ये पार पडलेल्या 'क्वाड' (भारत, अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलिया) देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीने या गटाला पुन्हा एकदा सक्रिय केले. गेल्या काही काळापासून अमेरिका युरोप आणि मध्य पूर्वेतील युद्धांमध्ये व्यस्त असल्याने 'क्वॉड'कडे काहीसे दुर्लक्ष झाले होते, अशी टीका होत होती; मात्र रुबिओ यांनी ही कसर भरून काढली. दक्षिण चीन समुद्र आणि हिंद महासागरातील चीनच्या वाढत्या विस्तारवादाला रोखण्यासाठी 'क्वाड'ने सागरी सुरक्षा अधिक कडक करण्याचा निर्णय घेतला आहे. सागरी क्षेत्रातील संशयास्पद जहाजांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी माहितीची देवाणघेवाण वाढवण्यावर एकमत झाले. सेमीकंडक्टर, इलेक्ट्रिक वाहने आणि प्रगत संरक्षण उपकरणांसाठी आवश्यक असणाऱ्या 'क्रिटिकल मिनरल्स'वर सध्या चीनची मक्तेदारी आहे. ही मक्तेदारी मोडून काढण्यासाठी 'क्वाड' देशांनी एकत्रित पुरवठा साखळी निर्माण करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. रुबिओ यांनी स्पष्ट केले, की आम्हाला केवळ वर्षातून दोनदा भेटणाऱ्या देशांचा गट बनायचे नाही, तर जमिनीवर ठोस काम करणारा मंच बनायचे आहे. वर्षाच्या शेवटी होणाऱ्या 'क्वाड' शिखर परिषदेसाठी काही विशेष आणि ठोस प्रकल्प तयार ठेवण्याचे आदेश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत.

या संपूर्ण दौऱ्याचे विश्लेषण केले असता, ट्रम्प प्रशासनाच्या परराष्ट्र धोरणातील एक मोठा अंतर्विरोध समोर येतो. एकीकडे अमेरिका भारताला आपला सर्वात महत्त्वाचा सामरिक भागीदार म्हणते, आशियामध्ये चीनला शह देण्यासाठी भारताच्या लष्करी ताकदीची गरज ओळखते; परंतु दुसरीकडे, व्यापाराचा विषय येतो तेव्हा त्यांचे धोरण अत्यंत 'ट्रांझॅक्शनल' (केवळ देवाणघेवाणीचे) आणि व्यापारी नफा-तोटा पाहणारे बनते. रुबिओ यांनी पत्रकार परिषदेत सांगितले, की ट्रम्प प्रशासनाचे व्यापारी धोरण भारताला त्रास देण्यासाठी नाही, तर अमेरिकेची जागतिक व्यापारी तूट भरून काढण्यासाठी आहे; परंतु भारतासारख्या विकसनशील देशाला अमेरिकेच्या अंतर्गत आर्थिक समस्यांचे ओझे वाहण्यास भाग पाडणे कितपत न्याय्य आहे, हा प्रश्न अनुत्तरित राहतो. संरक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रात सहकार्य वाढवण्याचे आश्वासन दिले गेले असले, तरी आयात शुल्काचा तिढा सुटत नाही, तोपर्यंत व्यापारी संबंधांमधील पूर्ण क्षमता प्रत्यक्षात येऊ शकत नाही. थोडक्यात सांगायचे तर, रुबिओ यांचा भारत दौरा एकाच वेळी 'राजकीय सुसंवाद' आणि 'व्यापारी संभ्रम' यांचे मिश्रण ठरला आहे. या दौऱ्याने गेल्या वर्षभरातील राजनैतिक दुरावा निश्चितच कमी केला आहे. पंतप्रधान मोदींना मिळालेले अमेरिका भेटीचे विशेष आमंत्रण आणि क्वाड परिषदेतील महत्त्वाचे निर्णय हे दोन्ही देशांमधील सामरिक संबंधांची खोली दर्शवतात.

---

चर्चा आजची

# सोयीच्या राजकारणात निष्ठेचा बळी!

**राकेश लोहार**

राजकारणात कायमचे मित्र किंवा शत्रू नसतात, असे म्हटले जाते. पण याचा अर्थ असा होतो का, की कालपर्यंत जनतेसमोर ज्यांना भ्रष्ट, अयोग्य आणि समाजाचे शत्रू म्हणून रंगवायचे, त्यांच्यासोबत आज कोणतेही स्पष्टीकरण न देता खांद्याला खांदा लावून उभे राहायचे? मग कार्यकर्त्यांनी विश्वास ठेवायचा तरी कोणावर? नेत्यांच्या भाषणांवर, आरोपांवर की त्यांच्या सोयीच्या राजकीय व्यवहारांवर? एक मात्र खरंय, की नेत्यांच्या सोयीच्या राजकारणात कार्यकर्त्यांच्या निष्ठेचा बळी गेलाय. रायगडातील जनतेला आता तरी जाग येणार का?

कारण, आजचे राजकारण विचारांचे राहिलेले नाही; ते सत्ता, खुर्ची आणि स्वतःचे राजकीय अस्तित्व टिकवण्याचा खेळ बनले आहे. या घाणेरड्या सत्तासंघर्षात रायगडच्या विकासाचा बळी गेला, कार्यकर्त्यांची निष्ठा पायदळी तुडवली गेली आणि मतदारांना उल्लू बनवले गेले. विधानपरिषद निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे उमेदवार अनिकेत तटकरे यांच्या उमेदवारी अर्जावेळी कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे, खासदार सुनील तटकरे आणि इतर नेते एकत्र दिसलेले छायाचित्र हे याच कटू वास्तवावर बोट ठेवणारे आहे. कारण, एकमेकांविरोधात आरोपांची राळ उठवून याच नेत्यांनी सोयीचे राजकारण केल्याचे साऱ्या रायगडवासियांनी पाहिले आहे. राजकारणात मतभेद संपणे, आघाड्या बदलणे किंवा नेते एकत्र येणे ही नवी गोष्ट नाही. पण प्रत्येक वेळी एक प्रश्न मात्र अनुत्तरित राहतो; तो म्हणजे, कार्यकर्त्यांनी नेमकं कोणावर आणि कसा विश्वास ठेवायचा?

कालपर्यंत ज्यांच्याविरोधात सभांमधून आग ओकली गेली, ज्यांच्यावर गंभीर आरोप झाले, एकमेकांचा डीएनए काढण्यात आला, ज्यांना जनतेसमोर खलनायक म्हणून उभं केलं गेलं, त्यांच्यासोबत आज त्याच नेत्यांचे गळ्यात गळे घालून फोटो झळकत आहेत. मग कार्यकर्त्यांनी काल ऐकलेलं खरं मानायचं की आज दिसतंय ते?



खरं म्हणजे, संघर्ष नेत्यांचा नसतो; तो कार्यकर्त्यांचा असतो. नेते व्यासपीठावर भाषण करतात, पण त्यासाठी रस्त्यावर उतरून लढणारा कार्यकर्ता असतो. नेते आरोप करतात, पण त्या आरोपांचं समर्थन गावागावात जाऊन करणारा कार्यकर्ता असतो. नेते विरोधकांवर टीका करतात, पण त्या टीकेची सामाजिक आणि वैयक्तिक किंमत मोजणारा कार्यकर्ता असतो. आणि मग अचानक असा काय चमत्कार झाला, की एका रात्रीत सारेच बदलले? आणि, कालचे विरोधक आज मित्र म्हणून एका मंचावर दिसले. आजवर केलेले आरोप हवेत विरून गेले, कालची भाषा बदलली, कालचा संघर्ष विस्मरणात गेला? मग कार्यकर्त्याने काय करायचं?

ज्याच्याविरोधात वर्षानुवर्षे लढलो, तो अचानक चांगला झाला असं मानायचं? की काल आपल्याला सांगितलेलं सगळंच खोटं होतं असं समजायचं? जर कालची भूमिका खरी होती, तर आजची जवळीक संशयास्पद आहे. आणि जर आजची जवळीक योग्य असेल, तर काल कार्यकर्त्यांना रस्त्यावर उतरवून संघर्ष करायला का लावलं गेलं? आज कार्यकर्त्यांच्या मनात प्रश्न अनेक आहेत, परंतु एकाचेही खरे उत्तर देण्याचे धाडस एका नेत्यामध्ये तरी आहे का? मुळीच नाही! कारण, सध्याचं सुरु असलेले राजकारण सोयीचं आणि स्वार्थाचं आहे, हे समजायला जनता दूधखुळी नाही.

आज वास्तव इतकंच आहे की अनेक नेत्यांची राजकीय भूमिका ही विचारांवर नाही, तर सत्ता, खुर्ची आणि स्वतःचं राजकीय अस्तित्व टिकवण्यावर उभी आहे. कालचा विरोध आणि आजची जवळीक यामागे जनतेचे प्रश्न, विकासाचा अजेंडा किंवा विचारसरणी दिसत नाही; दिसतं ते फक्त राजकीय गणित.

दुर्दैवाने या सत्तेच्या खेळात सर्वात मोठं नुकसान होत आहे ते रायगड जिल्ह्याचं. गेल्या अनेक वर्षांपासून जिल्ह्याच्या विकासापेक्षा कोण कुणासोबत जाणार, कोण कुणाला रोखणार आणि कोणाची राजकीय ताकद वाढणार याच चर्चांना महत्त्व मिळालं. उद्योग, रोजगार, पर्यटन, मत्स्यव्यवसाय, पायाभूत सुविधा, शिक्षण आणि आरोग्य यांसारखे मूलभूत प्रश्न मागे पडले. सत्तेच्या राजकारणाने संपूर्ण विकास प्रक्रियेलाच वेठीस धरलं.

जिल्ह्याला दिशा देणाऱ्या नेतृत्वाची गरज असताना राजकीय कुरघोड्यांचं सावट अधिक गडद होत गेलं. प्रत्येक निवडणुकीत विकासाची आश्वासने दिली गेली; पण निवडणूक संपताच पुन्हा सुरू झाली ती पदांची, शक्तीची आणि वर्चस्वाची लढाई. त्यामुळे आज अनेक नागरिकांच्या मनात प्रश्न निर्माण झाला आहे की, राजकारण जिल्ह्याच्या विकासासाठी सुरू आहे की काही मोजक्या नेत्यांच्या राजकीय अस्तित्वासाठी?

खरं तर, राजकारणातील सर्वात मोठा बळी विरोधक नसतात; सर्वात मोठा बळी कार्यकर्ता असतो. कारण तो विश्वास ठेवतो. तो निष्ठा ठेवतो. तो आपल्या नेत्याच्या शब्दाला अंतिम सत्य मानतो. पण जेव्हा तेच नेते राजकीय सोयीसाठी एका क्षणात भूमिका बदलतात, तेव्हा सर्वप्रथम तुटतो तो कार्यकर्त्याचा विश्वास. आज अनेक कार्यकर्त्यांच्या मनात एक वेदनादायी प्रश्न उभा राहिला आहे; तो म्हणजे, आम्ही लढतो कोणासाठी? विचारांसाठी, की नेत्यांच्या भविष्यातील राजकीय व्यवहारांसाठी?

नेते बदलतात, भूमिका बदलतात, समीकरणे बदलतात; पण कार्यकर्त्यांनी कोणावर विश्वास ठेवायचा याचं उत्तर मात्र कोणी देत नाही. आणि जोपर्यंत या प्रश्नाचं प्रामाणिक उत्तर मिळत नाही, तोपर्यंत कार्यकर्त्यांच्या मनात एकच संशय कायम राहणार, तो म्हणजे, ''आम्ही पक्षासाठी झटतोय की कुणाच्या तरी उद्याच्या राजकीय सौद्यांसाठी?''

---

लोकसंसद

## होर्मुझ सामुद्रधुनीतील सागरी जीव धोक्यात

तीन महिन्यांपूर्वी इराण आणि अमेरिका-इस्राएल दरम्यान युद्ध सुरु झाल्यानंतर जगातील एकूण सागरी तेलाच्या वाहतुकीपैकी सुमारे २० टक्के ज्या सागरी जलमार्गातून होते तो जलमार्ग म्हणजे 'होर्मुझची सामुद्रधुनी' जगभरात मोठ्या चर्चेचा विषय बनला होता. जागतिक तेल अर्थकारणासाठी प्रसिद्ध असलेली होर्मुझची ही सामुद्रधुनी आता पुन्हा एकदा एका वेगळ्या कारणासाठी चर्चेचा विषय बनली आहे. सध्या होर्मुझच्या खाडीत आणि ओमानच्या आखातात मोठ्या संख्येने व्हेल शार्क माशांनी (अंदाजे ४०० व्हेल शार्क) स्थलांतर केले आहे. उन्हाळ्यात ट्यूना माशांची अंडी, लहान मासे, क्रिल आणि 'प्लँक्टन' (पोषक तत्वांनी समृद्ध सूक्ष्म सागरी वनस्पती व जीव) असे खाद्य मोठ्या प्रमाणात उपलब्ध असल्याने हे महाकाय व्हेल शार्क मासे दरवर्षी उन्हाळ्याच्या महिन्यात आखाती प्रदेशातून ओमानच्या आखातात जाण्यासाठी होर्मुझच्या खाडीचा वापर करतात. होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या आणि सभोवतालच्या आखाताच्या पृष्ठभागाखाली एक नाजूक जैविक परिसंस्था अस्तित्वात असून येथे सुमारे सात हजार डुगोंग (समुद्री गाय) आणि शंभरच्या आसपास अरबी हंपबॅक व्हेल हे स्थलांतर न करणारे महाकाय मासे राहतात. सद्या युद्धग्रस्त परिस्थितीमुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीत होणाऱ्या लष्करी कारवाया तसेच अवजड मालवाहतूक आणि तेल गळती यांसारख्या धोक्यांमुळे स्थलांतरित व्हेल शार्क सोबतच डुगोंग मासा आणि दुर्मिळ स्थानिक व्हेल माशांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. एकूणच युद्धामुळे होर्मुझ सामुद्रधुनीतील सागरी जीव धोक्यात आले आहेत.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

---

दिनविशेष

# 'गोपीनाथ मुंडे' सर्वसामान्य जनतेच्या मनातील लोकनेते

काहींना जन्मतःच वारसा मिळतो समृद्ध जीवनाचा. तर काही आपलं जीवन स्वतः घडवतात. गोपीनाथ मुंडे म्हणजे स्वकर्तुत्वाने घडलेला माणूस. राजकारणाचा कुठलाही वारसा नसताना राजकारणात शिखर गाठणारा अद्वितीय नेता. गोपीनाथ पांडुरंग मुंडे यांचा जन्म बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील नाथरा या गावी एक सामान्य शेतकरी कुटूंबात १२ डिसेंबर १९४९ रोजी झाला. वडील पांडुरंग मुंडे आणि आई लिंबाबाई मुंडे हे वारकरी होते. आई वडिलांसोबत मुंडे साहेबांनी वयाच्या १४व्या वर्षी पंढरपूरची पाई वारी केली. त्यानंतर सलग सात वर्षे पंढरीची पाई वारी केली. त्यामुळे मुंडे साहेबांवर बालपणापासूनच अध्यात्मिक प्रभाव राहिला. त्यांची घरची परिस्थिती बेताची होती. १९६९ मध्ये त्यांचे पितृछत्र हरपले; त्यानंतर त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी आई आणि मोठे बंधू पंडितआण्णा यांनी उचलली. भाऊ पंडित अण्णा यांनी स्वतः चे शिक्षण सोडून गोपीनाथ मुंडे यांचे शिक्षण पूर्ण केले. शालेय शिक्षणानंतर उच्च शिक्षणासाठी त्यांनी अंबाजोगाई जवळ केली. गोपीनाथ मुंडे यांच्या राजकीय प्रवासाला सुरवात झाली ती महाविद्यालयीन जीवनात, महाविद्यालयात होणाऱ्या अंतर्गत निवडणुकांमद्ये मुंडे साहेब नेहमीच किंग मेकर ठरायचे,प्रत्येक निवडणूक ते सहजपणे जिंकायचे. अंबाजोगाईत शिक्षण घेत असताना त्यांची भेट झाली ती प्रमोद महाजन यांच्याशी प्रमोद महाजन यांनी मुंडे साहेबांच्या विद्यार्थी दिशेतील नेतृत्व करण्याचे गन ओळखले आणि त्यांच्याशी मैत्री झाली. प्रमोद महाजन यांनी मुंडे साहेबांवर अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेत काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली. साहेबांच्या व्यक्तिमत्वातील गुणवैशिष्ट्ये अत्यंत वाखण्यासरखी होती. ते सत्तेत असले के अन नसले काय साहेब येणार म्हटल्यावर सर्वसामान्य जनतेच्या मनावर किती उत्साह होता. लोक आकाशाकडे डोळे करून बसायचे आता आमच्या साहेबांचे हेलिकॉप्टर येईल. स्वतःभोवती लोकांचा घोळका कायम ठेवण्याची टाकत असणारे मुंडे साहेब हे एकमेव नेते होते. त्या लोकसंपर्काच्या बळावर त्यांनी गेलेली सत्ता पुन्हा परत संपादन केली. या त्यांच्या क्षमतेमुळे त्यांच्या हातात हातात सत्ता नाही म्हणून त्यांची उपेक्षा करण्याची किंवा दखल न घेण्याची हिंमत कुणी करू शकले नाही. राजकारणात जनतेच्या समस्यांची जाणीव अचूक असावी लागते. सामाजिक मानसशास्त्र आणि जनतेच्या प्रश्नांची अचूक जाण होती. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत मुंडे साहेबांनी महाराष्ट्र पिंजून काढलं,देशात भाजपची सत्ता आली पाहिजे हा एकच ध्यास डोळ्यासमोर ठेवून त्यांनी दांडगा प्रचार केला, शेवटी साहेबांच्या प्रयत्नाला यश आले व २०१४च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी मोठा विजय मिळवला व राज्यात महायुतीचे ४२ खासदार निवडून आले, व देशात केंद्रीय ग्रामविकास मंत्री असे महत्त्वाच खात मिळाले. इतकी वर्षे सत्तेत येण्यासाठी साहेबांनी संघर्ष केला परंतु सत्तेत आल्यावर मुंडे साहेबांना सत्तेची फळे मात्र चाखता आली नाहीत. २९ जून २०१४ रोजी साहेबांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारमध्ये ग्रामविकासमंत्री म्हणून शपथ घेतली होती. या विजयानंतर मुंडेसाहेबांच्या स्वागताची भव्यदिव्य तयारी बीड जिल्ह्यातील जनतेने केली होती, जिल्ह्यातील एका सर्वसामान्य कुटुंबातील तरुणाला केंद्रात मंत्रिपद मिळाल्याचा आनंद गगनात मावत नव्हता,साहेब३ जून२०१४ रोजी दिल्ली वरून जिल्ह्यात येणार होते, भगवान बाबांच्या समाधीवर मस्तक टेकवणार होते, परंतु काळाने घाला घातला आणि मुंडे साहेब ३ जून २०१४ च्या पाहटे दिल्ली विमानतळाकडे जात असतानात्यांच्या गाडीला एका टॅक्सीने जोरात धडक दिली. तेव्हा साहेबांना तातडीने रुग्णालयात भरती करण्यात आलं पणत्याच वेळी त्यांना आलेल्या हृदयविकाराच्या झटक्यांन त्यांचं निधन झालं, आणि एका झुंजार नेत्याचा शेवट झाला. भाजपच्या संघर्षच्या काळात उभा राहणाऱ्या गोपीनाथराव मुंडे साहेबांना काळान सत्ता उपभोगू दिली नाही.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

३ जून
१)श्रीम.विजया जयवंत पाटील, मु.पेढांबे, अलिबाग, ३-६-१९४३
२) श्री.रामराया शेशप्पा नायक अलिबाग, ३-६-१९४९
३)श्री.अशोक रामचंद्र गुरव मु.वेश्वी अलिबाग ३-६-१९५६
४)श्री.शैलेश नारायण घोसाळकर गोंधळपाडा, अलिबाग, ३-६-१९५८

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क-** ८०५५३२५६७८
**(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

# महागाईविरोधात नवी मुंबईत आंदोलन

## • सिडको प्रदर्शन केंद्रात आयोजन • खासदार सुप्रिया सुळे करणार नेतृत्व

**| मुंबई | प्रतिनिधी |**

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षातर्फे वाढती महागाई, इंधन दरवाढ, बेरोजगारी आणि महाराष्ट्रातील ढासळती कायदा-सुव्यवस्था याविरोधात बुधवारी (दि.३)सकाळी १०.०० वाजता नवी मुंबई येथील सिडको प्रदर्शन केंद्र येथे आंदोलन-मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या आंदोलनाचे नेतृत्व राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या कार्याध्यक्षा व खासदार सुप्रिया सुळे या करणार आहेत. यावेळी त्यांच्यासोबत प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, ज्येष्ठ नेते जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, रोहित पवार तसेच पक्षाचे अनेक वरिष्ठ पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होणार आहेत.




पेट्रोल, डिझेल, सीएनजी आणि एलपीजीच्या दरांमध्ये झालेल्या वाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांच्या आर्थिक अडचणी अधिकच वाढल्या आहेत. आधीच महागाईच्या झळा सोसणाऱ्या कुटुंबांवर या दरवाढीचा मोठा परिणाम झाला असून, केंद्र सरकार व राज्य सरकारचा निषेध व्यक्त करण्याकरिता व या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी हा आंदोलन-मोर्चा आयोजित करण्यात आला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रवक्ते महेश तपासे यांनी सांगितले की, इंधन दरवाढीमुळे जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती गगनाला भिडल्या आहेत. मध्यमवर्गीय कुटुंबे, शेतकरी, कामगार, छोटे व्यावसायिक आणि युवक यांचे जगणे अधिक कठीण झाले आहे. त्याचवेळी बेरोजगारीची समस्या गंभीर बनत चालली असून, महाराष्ट्रात वाढत्या गुन्हेगारीमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. याबाबत अधिक बोलताना महेश तपासे पुढे म्हणाले की, देशातील सर्वसामान्य नागरिकांना चारही बाजूंनी पिळवणूक सहन करावी लागत आहे. पेट्रोल, डिझेल, सीएनजी आणि एलपीजीच्या दरातील प्रत्येक वाढ थेट नागरिकांच्या घरगुती अर्थसंकल्पावर घाव घालते आणि जीवनावश्यक खर्च आणखी वाढवते. एकीकडे नागरिक आर्थिक संकटाशी झुंज देत असताना केंद्र आणि राज्य सरकार मात्र जनतेच्या वास्तव समस्यांपासून दूर असल्याचे दिसून येत आहे. वाढती बेरोजगारी आणि वाढता गुन्हेगारीचा आलेख यामुळे जनतेतील असंतोष अधिक तीव्र झाला आहे. हा मोर्चा म्हणजे दुर्लक्षित, आर्थिक ओझ्याखाली दबलेल्या आणि सरकारच्या जनविरोधी धोरणांमुळे त्रस्त झालेल्या प्रत्येक नागरिकाचा आवाज आहे, असेही ते म्हणाले.

या आंदोलनात पक्षाचे हजारो कार्यकर्ते, युवक, महिला, शेतकरी, कामगार, वाहतूक व्यवसायिक, छोटे उद्योजक तसेच सर्व जागरूक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होऊन या लोकशाही आंदोलनाला बळ देणार आहेत. पेट्रोल, डिझेल, सीएनजी आणि एलपीजीच्या वाढत्या किमतींवर नियंत्रण आणणे, महागाई रोखणे, रोजगारनिर्मितीला चालना देणे आणि महाराष्ट्रातील कायदा-सुव्यवस्थेबाबत जनतेचा विश्वास पुन्हा प्रस्थापित करणे या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन आयोजित करण्यात आल्याचे पक्षाने स्पष्ट केले आहे.

# माथेरानच्या कपारीत पाण्याचा स्त्रोत

## • सरपंचांच्या संकल्पनेतून पाणीप्रश्न सुटणार

**| पनवेल | प्रतिनिधी |**

सरकारच्या जलजीवन मिशन अंतर्गत कोट्यवधी रुपये खर्च करूनही दुर्गम भागातील पाणीटंचाई दूर झालेली नाही. मात्र, गावाची तहान भागवण्यासाठी सरपंच सिताराम चौधरी यांनी विशेष पुढाकार घेत सर्व ग्रामस्थांना एकत्र करत चर्चेतून आणि पाहणीतून एक नवीन सकारात्मक संकल्पना समोर आणली आहे.

पनवेल तालुक्यातील चिंचवाडी येथील आदिवासी पाड्यावर अद्यापही पाण्याचा तीव्र तुटवडा जाणवत असून, ही सरकारी योजना गावात पूर्णपणे फेल ठरली आहे. येथील स्थानिक पातळीवर पाण्यासाठी कोणताही ठोस स्त्रोत निघत नसल्याने प्रशासकीय पातळीवर पाणी पुरवठ्याचे नियोजन कोलमडले होते. मात्र, गावाची तहान भागवण्यासाठी सरपंच



सिताराम चौधरी यांनी विशेष पुढाकार घेत सर्व ग्रामस्थांना एकत्र केले आणि पाणी पुरवठ्याचे नवीन नियोजन काय करता येईल, यावर सविस्तर चर्चा केली. या चर्चेतून आणि पाहणीतून सरपंचांची एक नवीन सकारात्मक संकल्पना समोर आली आहे.

माथेरानच्या कपारीत एक बारमाही वाहणारा नैसर्गिक झरा असून, या झऱ्यावरून चिंचवाडी पाड्याला अगदी सहज आणि कायमस्वरूपी पाणी पुरवठा केला जाऊ शकतो, अशी संकल्पना सरपंच सिताराम चौधरी यांनी मांडली. या संकल्पनेला प्रत्यक्षात आणण्यासाठी आणि पाणी योजनेचे नवीन नियोजन करण्यासाठी सिताराम चौधरी यांच्यासह पंचायत समितीच्या सदस्या वर्षा केवारी, सचिन केवारी, पाणीपुरवठा अभियंता पूजा शेळके आणि चिंचवाडी मधील बाळू उघडे, अनंता कांबडी, विष्णू कांबडी आदी ग्रामस्थांनी थेट माथेरानच्या डोंगर कपारीत जाऊन त्या झऱ्याची प्रत्यक्ष पाहणी केली. ''जलजीवन मिशन फेल ठरल्यामुळे आमचे आदिवासी बांधव पाण्यासाठी वणवण करत आहेत, आता आमच्या संकल्पनेतून माथेरानच्या डोंगर कपारीत सनसेट पॉईंटजवळ पाण्याचा उत्तम स्त्रोत निश्चित झाला आहे. येथून पाड्यावर पाणी आणण्यासाठी आम्ही स्थानिक आमदार, सभापती, उपसभापती आणि गटविकास अधिकारी यांच्याकडे तातडीने पाठपुरावा करणार आहोत आणि हे नियोजन पूर्ण करूनच थांबणार,'' असा विश्वास सरपंच सिताराम चौधरी यांनी यावेळी व्यक्त केला.


## लालपरीचा वर्धापन दिन साजरा

**खांब** : रोहा एसटी बस स्थानकात लालपरीचा ७८वा वर्धापन दिन सोमवारी (दि.१) साजरा करण्यात आला. रोहा आगार व्यवस्थापक प्रकाश शेलार, स्थानक प्रमुख भूमिका रोडगे, कार्यशाळा अधिक्षक देवेंद्र खातू यांच्या प्रमुख मार्गदर्शनाने लालपरीची पूजा करण्यात आली. यावेळी एसटी कर्मचारी हेमंत कदम, नेथू गावित, संदीप गायकवाड, प्रवीण कोटकर, अमोल अंभोरे, अरुण केंद्रे, रणजीत जांभेकर, राजेश सोलंकी, प्रियंका चव्हाण, छाया घोरपडे, अनिता शिद, चालक/वाहक सूर्यकांत कळवले, गणेश लगड, नितीन पालवे तसेच एसटी प्रेमी, प्रवासी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विठ्ठल शेळके यांचे निधन

**| खांब | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यातील मुठवली खु. गावचे रहिवासी विठ्ठल सटू शेळके यांचे दि.३० मे रोजी निधन झाले. निधनासमयी त्यांचे वय ८५ वर्षाचे होते. विठ्ठल शेळके यांनी आपल्या हयातीत आपला शेती व्यवसाय सांभाळून एमएसईबीमध्ये सेवानिवृत्तीपर्यंत अतिशय प्रामाणिकपणे व निष्ठेने आपला सेवाकाळ पुर्ण केला. वारकरी सांप्रदायाचे निस्सीम भक्त असल्याने त्यांना भजन, किर्तन व प्रवचनाची मोठी आवड होती. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुलगे, सुना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. त्यांचे दशक्रियाविधी सोमवारी (दि.८), तर अंतिम धार्मिकविधी बुधवारी (दि.१०) राहत्या निवासस्थानी होणार असल्याची माहिति त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.



# 'लाभले आम्हास भाग्य' कार्यक्रमाचे आयोजन

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेलमधील ओरायन मॉलला यंदा १० वर्षे पूर्ण होत आहेत. या वर्धापन दिनाचे औचित्य साधून शुक्रवारी (दि.५) सायंकाळी ६.०० वाजता पनवेलच्या क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आनंद सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात ''लाभले आम्हास भाग्य'' हा कार्यक्रम सादर होणार आहे. हा १० वर्षांचा प्रवास परीक्षांचा आणि शिकवणीचा होता, अशी भावना एम.पी. ग्रुपचे मंगेश परुळेकर यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमात अभिनेते सुनील बर्वे, पुष्कर श्रोत्री, आनंद इंगळे, अभिनेत्री मृण्मयी देशपांडे, गौतमी देशपांडे आणि संगीतकार अजित परब हे कलाकार सहभागी होणार आहेत. या आनंद सोहळ्यात निमंत्रितांना उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे अवाहन ओरायन मॉलचे मालक मंगेश परुळेकर आणि दिलीप करेलिया यांनी केली आहे.

# खांदेश्वरमध्ये तंबाखूमुक्त दिनानिमित्त जनजागृती




**| पनवेल | प्रतिनिधी |**

जागतिक तंबाखूमुक्त दिनानिमित्त एमजीएम डेंटल कॉलेज अँड हॉस्पिटल, नवी मुंबईच्या सार्वजनिक आरोग्य दंतचिकित्सा विभागातर्फे कॉलेज वर्किंग कमिटी, टोबॅको सेसेशन सेंटर आणि राष्ट्रीय सेवा योजना युनिट यांच्या संयुक्त विद्यमाने खांदेश्वर रेल्वे स्थानक परिसरात जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचा उद्देश तंबाखू व निकोटीन व्यसनाच्या दुष्परिणामांविषयी जनतेमध्ये जागरूकता निर्माण करणे हा होता.

एमजीएम डेंटल कॉलेजच्या अधिष्ठाता डॉ. श्रीवल्ली नटराजन आणि सार्वजनिक आरोग्य दंतचिकित्सा विभागाचे विभागप्रमुख डॉ. वैभव ठक्कर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. इंटर्न्स, प्राध्यापक व कर्मचारी यांनी उत्साहाने रॅलीमध्ये सहभाग घेतला. जनजागृती फलकांच्या माध्यमातून तंबाखू सेवन बंद करण्याचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला.

# वीज समस्यांवर सकारात्मक बैठक

**| पनवेल | प्रतिनिधी |**

करंजाडे परिसरातील वाढत्या वीज समस्यांबाबत महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत नुकतीच सकारात्मक बैठक पार पडली. या बैठकीत परिसरातील नागरिकांनी वीजपुरवठ्याशी संबंधित विविध प्रश्न मांडले.




महावितरणचे कार्यकारी अभियंता जितेंद्र जनार्दन माने यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीला करंजाडे विभागाचे अभियंता पालवे, पनवेल महावितरणचे अधिकारी सातपुते, माजी सरपंच रामेश्वर बबन आंग्रे, पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक गणेश कडू तसेच विविध सेक्टरमधील नागरिक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. बैठकीदरम्यान रामेश्वर आंग्रे यांनी करंजाडे नोडमधील वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, अपुऱ्या क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर, जुन्या व धोकादायक केबल्स तसेच उघड्या फिडर पिलरमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांकडे अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले. गरज असलेल्या भागांत नवीन ट्रान्सफॉर्मर आणि डीटीसी उभारण्याची मागणी करण्यात आली. यावेळी नागरिकांनी वीज यंत्रणेच्या दुरुस्तीबाबत तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली. तसेच, परिसरातील जर्जर आणि उघड्या केबल्स बदलून सुरक्षित वीज व्यवस्था उभारण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी सर्व समस्या गांभीर्याने ऐकून घेत लवकरात लवकर आवश्यक उपाययोजना राबविण्यात येतील, असे आश्वासन दिले.

## सोनू जाधव यांचे निधन

**खांब** : रोहा तालुक्यातील बाहे गावातील सोनू जाधव यांचे बुधवारी (दि.२८) निधन झाले. निधनासमीयी ते ९२ वर्षांचे होते.



तसेच, ते वारकरी संप्रदायाचे निस्सीम भक्त होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सून, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. त्यांचे दशक्रियाविधी शनिवारी (दि.६), तर अंतिम धार्मिकविधी मंगळवारी (दि.९) राहत्या निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

# महापौर रितू तावडे यांचा पाहणी दौरा

**| मुंबई | प्रतिनिधी |**

मुंबईत पावसाळ्यादरम्यान पाणी साचण्याच्या समस्येवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने सर्वंकष आणि प्रभावी उपाययोजना राबवाव्यात. विशेषतः परिमंडळ ५ मधील विविध नाले, कल्व्हर्ट मधील गाळ उपशाची कामे तसेच जलनिसारण व्यवस्थेची कामे अधिक वेगाने पूर्ण करण्यासाठी आवश्यक असेल, तर विशेष बाब म्हणून अतिरिक्त मनुष्यबळ आणि यंत्रसामग्री तैनात करावी, असे निर्देश मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी दिले आहेत. पावसाचे पाणी साचण्याची शक्यता असलेल्या सखल भागांचा आढावा घेऊन तेथील उदंचन पंप पूर्ण क्षमतेने कार्यान्वित ठेवावेत, जेणेकरून पावसाळ्यात नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश देखील महापौर तावडे यांनी दिले. तसेच, सोमवारी (दि.१) घाटकोपर (पूर्व) येथील जय अंबे नगर येथे सोमय्या नाला, गोवंडी येथील घाटकोपर-मानखुर्द जोड मार्गावरील सुभाष नगर नाला, चेंबूरच्या पूर्व मुक्त मार्गाजवळील वाशी नाका नाला, जिजामाता नगर कल्व्हर्ट, चेंबूर येथील आर.सी. मार्गाजवळील नाला, अयोध्या नगर येथील मानसिंह विजय सोसायटीजवळील नाला या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन गाळ उपसा कामांची पाहणी केली.

## पोलीस लेकींच्या स्वागतासाठी महाडकर सरसावले खाकीची भरारी अन् गोडांबे गुरुजींचा सन्मान

# भेलोशीच्या एकजुटीचा त्रिवेणी संगम

**| महाड | प्रतिनिधी |**

भेलोशी ग्रामस्थांच्या एकीचे, सुसंस्कृतपणाचे आणि कृतज्ञतेचे दर्शन घडवणारा एक अभूतपूर्व संयुक्त सोहळा नुकताच भेलोशी गावात संपन्न झाला. महाराष्ट्र राज्यातील कानाकोपऱ्यातून पोलीस भरतीसाठी उतरलेल्या हजारो उमेदवारांमधून, आपल्या भेलोशी या अत्यंत दुर्गम भागातून मुंबई पोलीस दलात भरती होण्याची ऐतिहासिक कामगिरी करणाऱ्या गावच्या रणरागिणींचा गावकऱ्यांच्यावतीने सत्कार करण्यात आला.

या ऐतिहासिक यशाबद्दल बोलताना नवनियुक्त महिला पोलीस सेजल यादव हिने, मोबाईल




आणि सोशल मीडियाचा मोह टाळून, आई-वडिलांचे कष्ट आणि कुटुंबाच्या पाठींब्यामुळेच आज मी माझ्या स्वप्नाला गवसणी घालू शकले, अशी भावना व्यक्त केली. तर, अस्मिता रेवाळे (बैकर) हिने, प्रतिकूल परिस्थिती आणि लोकांच्या टीकेवर मात करत, पतीच्या खंबीर साथीने मी वडिलांचे स्वप्न पूर्ण केले; भेलोशी गावाने ज्या जिव्हाळ्याने माझ्या यशाचे कौतुक केले, त्याने माझे मन भारावून गेले असून, मला या गावाची कन्या असल्याचा अभिमान वाटतो, असे मत व्यक्त केले.

याच सोहळ्याचे दुहेरी औचित्य साधत, जवळपास ५०हून अधिक वर्षांचा काळ गावच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि शैक्षणिक प्रगतीसाठी समर्पित करणारे नारायण गोडांबे (गुरुजी) यांचा अमृतमहोत्सवी सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कृतज्ञता व्यक्त करताना गोडांबे म्हणाले की, माझा अमृतमहोत्सव साजरा करण्यापेक्षा, गावातील दोन लेकींचा पोलीस दलात भरती झाल्याबद्दल होणारा सत्कार माझ्यासाठी लाख मोलाचा आहे. प्राथमिक शिक्षणानंतर मुले मुंबईला हॉटेलात कामाला जाण्याचे चित्र बदलण्यासाठी आम्ही १९८३ मध्ये गावात हायस्कूल सुरू केले. आज तीच मुले वेगवेगळ्या क्षेत्रात प्रगती करत आहेत, याचा मला सार्थ अभिमान आहे, असे ते म्हणाले.

तसेच, प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले पोलादपूरचे पोलीस हवालदार सारंगे यांनी, पोलीस भरतीचा प्रवास खडतर असून, वाचनात सातत्य ठेवा; जिथे आपण दमतो तिथूनच खरा स्टॅमिना दाखवायचा असतो, असा कानमंत्र देत गावात वाचनालय सुरू करण्याचे व प्रशासकीय मार्गदर्शन शिबीर घेण्याचे आवाहन केले.

## निवडक

### ज्येष्ठांचा सामुहिक वाढदिवस साजरा



**वाघ्रण :** अलिबाग तालुक्यातील ज्येष्ठ नागरीक संघ वाघ्रण-खारपेढांबेच्यावतीने सोमवारी (दि.१) येथील ज्येष्ठांचा सामुहीक वाढदिवस आणि विद्यार्थी गुणगौरव समारंभ पार पडला. संघाचे अध्यक्ष विनायक म्हात्रे यांच्या निवासस्थानी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी संस्थापक हेमंत पाटील यांनी संकल्पना मांडली, तर वाघ्रण जेष्ठ नागरीक संघाचे संस्थापक सल्लागार दिपक पाटील यांनी सत्कार मुर्तीचा परीचय आणि कारकीर्दी सांगितली. त्यानंतर ज्येष्ठ नागरिकांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमानंतर दहावीत उत्तीर्ण झालेल्या आर्या पाटील (९२.६० टक्के) व श्रावणी पाटील (७४ टक्के) आणि आयटी इंजिनीअर परीक्षा उत्तीर्ण झालेली तन्वी पाटील यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात प्रामुख्याने विद्यार्थ्यांचे पालक, नातेवाईकांसह आत्माराम पाटील, शशिकांत धोदरे, एच.एन. पाटील, अभिमन्यु पाटील, रविकीरण पाटील आदी उपस्थित होते.

### विद्युत पुरवठ्याबाबत ठाकेर गट आक्रमक



**पनवेल :** कामोठे वसाहतीमधील सतत खंडित होत असलेल्या विद्युत पुरवठ्याबाबत शिवसेना ठाकरे गटाने संबधीत अधिकाऱ्यांना जाब विचारला आहे. शिवसेना (ठाकरे गट) पक्षाचे सहसंपर्कप्रमुख अनिल चव्हाण व जिल्हाप्रमुख दीपक निकम यांच्या मार्गदर्शनाखाली महानगर प्रमुख ॲड. समाधान काशीद, उपमहानगर प्रमुख प्रभाकर गोवारी, कामोठे शहर प्रमुख रामदास गोवारी, कामोठे उपशहर प्रमुख गणेश खांडगे व राहुल यादव, पदाधिकारी आणि महावितरण अधिकारी यांच्या उपस्थितीत कामोठे मधील सतत खंडित होत असलेल्या विद्युत पुरवठा संदर्भात बैठक पार पडली. यावेळी महावितरनाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता वेंकटेश कासल, बकुल मानवटकर, संतोष पालवे, संजय मुंडे, सुजीत पाटील, अभिजित साळवी हे उपस्थितीत होते. या बैठकीत महावितरणच्या चुकीच्या धोरणामुळे व कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे नागरिकांना होत असलेल्या त्रासाबाबत तसेच सतत कामोठेमध्ये खंडित होत असलेल्या वीज पुरवठ्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी कासल यांनी कामोठ्याच्या लोड शेडिंगची समस्या एका आठवड्याच्या आत संपणार असल्याचे व पर्याय व्यवस्था उपलब्ध करत असल्याचे सांगण्यात आले व यापुढे नैसर्गिक कारणा व्यतिरिक्त कामोठे येथील लाईट बंद करणार नसल्याचे आश्वासन देण्यात आले. जरी लाईट बंद करणार असल्यास किंवा अचानक लाईट बंद केल्यास त्वरित ग्राहकांना सूचना देण्यात येईल, असे सुद्धा आश्वासन देण्यात आले.

### आरोग्य तपासणीला उत्फुर्त प्रतिसाद



**उरण :** हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त तसेच माजी आमदार व मनोहर भोईर यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवारी (दि.१) आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. जेएनपीए मल्टीपर्पज हॉल येथे आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराचा अनेक नागरिकांनी लाभ घेतला. या शिबिरामध्ये रक्तदाब, मधुमेह (शुगर), ईसीजी, फुफ्फुसांची तपासणी, सीबीसी, थायरॉईड तपासणी इत्यादी विविध आरोग्य चाचण्या मोफत करण्यात आल्या. तसेच, स्त्रीरोग तज्ज्ञांकडून महिलांना मोफत मार्गदर्शन व वैद्यकीय सल्ला देण्यात आला. नेत्र तपासणीची विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. गरजू नागरिकांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. तसेच, तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आवश्यक औषधांचेही मोफत वितरण करण्यात आले. यावेळी 'मेडपास' ॲपची माहिती देण्यात आली. ॲपची नोंदणी करणाऱ्या नागरिकांना प्रथमोपचार पेटी (फर्स्ट एड किट) मोफत देण्यात आली. या उपक्रमासाठी यूएमसी रुग्णालय नवी मुंबई, नेत्रोदय ऑप्टिकल्स, 'आई उल्वे तिची काळजी', मेडपास आणि तेरणा ब्लड बँक यांचे विशेष सहकार्य लाभले.

### मेहनतीच्या जोरावर शंकर माळी यांचा यशस्वी जीवन प्रवासः भूषण पाटील



**चिरनेर :** यशस्वी जीवन प्रवास घडविणाऱ्या शंकर माळी यांचा समाजात विशेष सहभाग आहे. त्यांच्या समाजभिमुख विचारांमुळे त्यांनी समाजात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांचा कर्तुत्वान प्रवास कुटुंबासाठी नव्हे तर समाजासाठीही प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन जेएनपीएचे माजी विश्वस्त भूषण पाटील यांनी केले. जेएनपीएचे कामगार शंकरमाळी हे ३६ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेतून सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्तीच्या निमित्ताने चिर्ले येथील मंगलमूर्ती प्रतिष्ठानतर्फे त्यांचा सेवापुर्तीचा सत्कार सोहळा रविवारी (दि.३१) आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी भूषण पाटील हे अध्यक्षीय भाषणात बोलत होते. व्यासपीठावर इतिहासचार्य के.एम. मढवी, सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार, माजी मुख्याध्यापक जांभळे, ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकांत पाटील, रामचंद्र म्हात्रे, अरुण म्हात्रे, कृष्णा पाटील, दत्तात्रेय म्हात्रे, मिलिंद खार पाटील, प्रकाश ठाकूर, हसूराम पाटील यांच्यासह अनेक मान्यवर नातेवाईक उपस्थित होते. शंकर माळी यांनी दि. २३ मे, १९९० साली जेएनपीएमध्ये सागरी अग्निशमन विभागात प्रवेश केला. सात वर्षानंतर त्यांची चेकर पदावर नियुक्ती करण्यात आली होती. सध्या ते मरीन डिपार्टमेंट व सेफ्टी सेक्शन मध्ये कार्यरत होते. ३६ वर्षांच्या सेवाकाळात त्यांनी जेएनपीएच्या या विभागात विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या आहेत.

# निवडक



## रस्त्यांची कामे युद्धपातळीवर सुरू

**माथेरान :** पायी चालत जाणाऱ्या प्रवाशांची संख्या माथेरामध्ये मोठ्या प्रमाणावर असल्याने पावसाळ्यात तसेच सततच्या रहदारीमुळे अनेक भागातील रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे. माथेरानमधील अनेक पॉईंट्स कडे जाणाऱ्या रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. मॅलेट स्प्रिंग, पेमास्टर गार्डन पासून पुढे भाऊसाहेब राऊत मार्ग,भेकर रोड, आर्टिस्ट पॉईंट रोड, हॉटेल वे साईड ते सेसिल हॉटेल रोड अशा अनेक भागांतील रस्ते आजही विकासाच्या प्रतीक्षेत आहेत. या रस्त्यावर मोठं मोठे दगडगोटे असल्याने पादचाऱ्यांना चालणे जिकिरीचे बनलेले आहे. पावसाळ्यापर्वी या रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे पूर्ण केल्यास पर्यटकांसह नागरिकांना सोयीचे ठरणार आहे. त्यामुळे हे रस्ते पूर्ववत करण्यासाठी विद्यमान नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी स्वतः हजर राहून रस्त्यांची कामे उत्तम प्रकारे करून घेत आहेत. हरमिटेज बंगला ते एको पॉईंटकडे जाणाऱ्या दगड मातीच्या रस्त्याचे काम अंतिम टप्प्यात आले असून, पर्यटकांना चालण्यासाठी तसेच अन्य वाहतुकीसाठी सोयीचे ठरणार आहे.

## आदिवासी समाजाच्या नशिबी दृष्टचक्र



**कोलाड :** भारत देश स्वतंत्र्य होऊन ७५ वर्षे पूर्ण झाल्यावर शासनाच्यावतीने मोठ्या थाटात अमृतमहोत्सव साजरा करण्यात आला. मात्र, देशातील आदिवासी समाजापर्यंत विकासाची गंगा पोहोचवून त्यांचे जिवनमान उंचविण्याच्या घोषणा कागदावरच राहिल्याचे वास्तव समोर येत आहे.कारण आदिवासी बांधव आजही रानमेव्याचे ओझे घेऊन ते विकल्यानंतर त्यांच्या पोटाची खलगी भरत आहे. त्यामुळे आदिवासी बांधवांच्या नशिबी आजही दृष्टचक्र असल्याचे दिसत आहे. आदिवासी कुटुंब आपल्या महिलांसह त्यांचे कुटुंब दिवसभर रानावनात भटकंती करून करवंदे, आंबे, काजु, काजूच्या बिया, फणस, कोकम व इतर गावरान रानमेवा गोळा करून बाजारपेठेच्या ठिकाणी येतात. परंतु, या रानमेव्यातून जेमतेम उदरनिर्वाह होत आहे. आदिवासी समाजाला शासनाच्या रास्त भाव दुकानातुन तांदूळ, गहु, कणी मिळते. परंतु तेल, डाळ व इतर जीवनावशक वस्तू त्यांना आर्थिक चणचणीमुळे विकत घेता येत नाही. त्यामुळे आजही त्यांना रोजगाराच्या शोधात वणवण करावी लागत आहे. आदिवासी विकास मंत्रालयाने या समाजाच्या राहणीमानात बदल व्हावा त्यांना दोन वेळेचे जेवण मिळावे यासाठी आजवर असंख्य योजना राबविल्या आहेत. मात्र, शासकीय यंत्रनेच्या खाबुगिरीमुळे जंगल, डोंगर, दऱ्यामध्ये राहणारा आदिवासी समाज अद्यापही अंधारात चाचपडत आहे. त्यामुळे दुर्गम भागातील बहुसंखीय आदिवासी समाज उपेक्षित जिवन जगत आहे.

## महिलांसाठी कॅन्सर जनजागृती




**नवीन पनवेल :** लोकनेते दि.बा. पाटील यांचे जन्मशताब्दी वर्ष व उर्मिला पाटील यांच्या जयंतीनिमित्त पनवेलमधील आगरी समाज हॉलमध्ये महिलांसाठी कॅन्सर जनजागृती व मोफत कॅन्सर तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. महिलांमध्ये गर्भाशय मुखाचा कर्करोग व स्तनाचा कर्करोग याविषयी जनजागृती निर्माण करणे, वेळेवर निदानाचे महत्त्व पटवून देणे आणि प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणीची सवय वाढविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या शिबिरात एकूण ६६ महिलांनी सहभाग नोंदवून लाभ घेतला. सहभागी महिलांची ईसीजी तपासणी, स्तन कर्करोग तपासणी तसेच सर्वसाधारण आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी कर्करोग तज्ज्ञ डॉ. विवेक सुकुमार आणि डॉ. कस्तुरी बरुआ यांनी महिलांना कर्करोगाची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, वेळेवर निदानाचे महत्त्व तसेच निरोगी जीवनशैली याबाबत मार्गदर्शन केले. तसेच, महिलांना सेल्फ ब्रेस्ट चेक विषयी प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले.

## बस स्थानकाला परिवहन मंत्र्यांची भेट

**पोलादपूर :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या पोलादपूर बस स्थानकाला परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी नवीन स्थानकाच्या बांधकामाची पाहणी केली. तसेच, त्यांनी नजिकच्या काळात पोलादपूर बस स्थानकाचे लवकरच लोकार्पण केले जाईल, असा विश्वास व्यक्त केला. या एसटी स्थानकाच्या बांधकामाचे ठेकेदार संजय चव्हाण यांनी उत्तम केले असल्याची चर्चा प्रवासी वर्गाकडून होत आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या पाहणी दौऱ्यात रा.जि.प. अर्थ व शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे, निलेश अहिरे, जि.प सदस्य डॉ. निलेश कुंभार, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक लक्ष्मण मोरे, नगरसेवक प्रसाद इंगावले, सुरेश पवार तसेच महामंडळ प्रशासकीय अधिकारी सहभागी झाले होते.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **तातडीची भरती, अलिबाग** रेस्टॉरंट/प्रॉपर्टी/एरिया मॅनेजर हेड शेफ, हाऊसकीपिंग, किचन हेल्पर मोफत राहण्याची व जेवणाची सोय TMS पेरोल अंतर्गत नोकरी. संपर्क : 8976709218 / 8691087302
- **घरकामासाठी कायमस्वरूपी** राहून काम करणारी बाई हवी आहे. कामामध्ये जेवण बनवणे व घराची साफसफाई यांचा समावेश असेल. पगार : रु १४,०००/- राहण्यासाठी केयरटेकर रूम, तसेच जेवणाची व्यवस्था करण्यात येईल. इच्छुकांनी संपर्क साधावा. ७८७५८६६५५५
- **अलिबाग एस.टी.स्टॅन्डजवळ** दूकान गाळा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९.
- **ऑफीस वर्कसाठी मुलगा/मुलगी** पाहिजे. वेळ १० ते ६ कॉम्प्युटर नॉलेज व मराठी टायपिंग आवश्यक. पत्ता : धुमाळ हॉस्पिटलजवळ, चेंढरे-अलिबाग. अधिक माहितीकरीता संपर्क - ९३७३५८१३३५.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# पाच कोटी खर्चूनही रस्ता अपूर्ण

**➤संतप्त ग्रामस्थांचे चणेरामध्ये तीव्र आंदोलन ➤ काम पूर्ण करण्याचे प्रशासनाचे आश्वासन**

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

**अलिबाग तालुक्यातील ऊसर-चणेरा या महत्त्वाच्या रस्त्यासाठी शासनाकडून तब्बल पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. परंतु, एवढा निधी खर्चूनही गेल्या पाच वर्षांपासून या रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत आहेत. त्यामुळे परिसरातील ग्रामस्थांच्या संतापाचा अखेर उद्रेक झाला आहे. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे नागरिकांना होत असलेल्या प्रचंड हालअपेष्टांविरोधात अश्वत्थामा ज्येष्ठ नागरिक संघ नवीन पनवेलचे अध्यक्ष प्रकाश विचारे यांच्या नेतृत्वाखाली, चणेरा परिसरातील शेकडो ग्रामस्थांच्या सहभागातून चणेरा नाक्यावर तीव्र रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.**



या आंदोलनाची पूर्वसूचना आंदोलनकर्त्यांनी प्रांताधिकारी रोहा, तहसीलदार रोहा, रोहा पोलीस ठाणे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता प्रकाश बागुल आणि संबंधित ठेकेदार यांना लेखी निवेदनाद्वारे दिली होती. नियोजित वेळेनुसार शेकडो नागरिक चणेरा येथे रस्त्यावर उतरले आणि रोहा-मुरुड मार्ग पूर्णपणे ठप्प केला. संभाव्य तणाव लक्षात घेऊन घटनास्थळी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

आंदोलनादरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता प्रकाश बागुल घटनास्थळी पोहोचले. यावेळी संतप्त ग्रामस्थांनी त्यांना प्रश्नांच्या भडिमाराने घेरले. ''शासनाचा ५ कोटी रुपयांचा निधी खर्चूनही पाच वर्षे काम का रखडले? जनतेला आणखी किती काळ खड्ड्यांतून प्रवास करावा लागणार?'', अशा तीव्र शब्दांत नागरिकांनी आपला रोष व्यक्त केला. उपअभियंता बागुल यांनी दिलेली उत्तरे आणि मांडलेली भूमिका आंदोलनकर्त्यांना समाधानकारक न वाटल्याने वातावरण आणखी तापले. परिस्थिती चिघळण्याची शक्यता लक्षात घेऊन रोह्याच्या पोलीस निरीक्षक समीर पाटील यांनी मध्यस्थी करत आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली. त्यांनी येत्या दोन दिवसांत संबंधित ठेकेदार आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेण्याचे आश्वासन दिले. तसेच, २० जूनपर्यंत उर्वरित रस्त्याचे काम पूर्णत्वास नेण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील आणि बैठकीत झालेल्या निर्णयांची माहिती नागरिकांना दिली जाईल, असेही स्पष्ट केले.

पोलीस प्रशासनाच्या या आश्वासनानंतर आंदोलनकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत रस्ता रोको आंदोलन तात्पुरते स्थगित केले. मात्र, दिलेल्या मुदतीत कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली नाही किंवा काम पूर्ण झाले नाही, तर यापेक्षाही तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा स्पष्ट इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

या आंदोलनात प्रकाश विचारे यांच्यासह सुरेश मोरे, अनिल सालावकर, शंकर दिवकर, सरपंच खांबेरे अतिश मोरे, आत्माराम कासार, गंभे गुरुजी, सखाराम गिजे, आनंद देसाई, भरत पाटील, मनोज भायतांडेल, अशोक सानप, बाबू विचारे, साईनाथ धुळे यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संखेने सहभागी झाले होते.

### जेल भरो आंदोलनाचा इशारा

यावेळी ग्रामस्थांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त करत, ''पाच वर्षे जनतेला खड्ड्यात ठेवणाऱ्या ठेकेदार आणि अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई का होत नाही? हक्काचा रस्ता मिळवण्यासाठी आम्हालाच रस्त्यावर उतरावे का लागते?'' असा सवाल उपस्थित केला. तसेच, प्रशासनाने दिलेले आश्वासन पूर्ण न झाल्यास 'जेल भरो' आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे. आता संपूर्ण परिसराचे लक्ष २० जूनकडे लागले असून, प्रशासन आणि ठेकेदार दिलेला शब्द पाळतात की पुन्हा एकदा ग्रामस्थांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागतो, याकडे लागले आहे.

## जासई-जेएनपीए सर्व्हिस रोड पाण्याखाली

**। उरण । प्रतिनिधी ।**

पावसाळा सुरू होण्यास काही दिवस बाकी असताना उरण तालुक्यात मात्र आपत्ती व्यवस्थापन किती सक्षम आहे, याची पोलखोल करणारे वास्तव समोर आले आहे. उरण-नवीमुंबई शहराला जोडणाऱ्या जासई-जेएनपीए बंदराच्या मुख्य रस्त्यावरील सर्व्हिस रोडवर आज ही मोठ्या प्रमाणात पाणी साचून राहिले आहे. एकंदरीत संबंधित प्रशासनाच्या दुर्लक्षित कामांमुळे या रस्त्यावर अपघाताचा धोका निर्माण झाला आहे.



दरवर्षी सिडको, स्थानिक ग्रामपंचायत, प्रकल्प व्यवस्थापन, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि इतर संबंधित प्रशासन विभाग हे पावसाळ्यापूर्वी नैसर्गिक स्रोत, नाले, गटारे, रस्त्यांवरील गटारांची दुरुस्ती तसेच सफाई करण्याची कामे लाखो रुपये खर्च करून करत आहेत. मात्र, भ्रष्ट कारभारामुळे पावसाळ्यात या कामाची पोलखोल रस्त्यांवर साचणाऱ्या पाण्यातून होतच असते. यावर्षी ही परिस्थिती ओढावणार नाही याची खबरदारी म्हणून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्येक ठिकाणच्या आपत्ती व्यवस्थापनाला चक्क आदेश दिले आहेत. मात्र, या आदेशाची अंमलबजावणी उरण तालुक्यात होताना दिसत नाही. त्याचे ताजेतवाने उदाहरण म्हणजे उरण-नवीमुंबई शहराला जोडणाऱ्या जासई-जेएनपीए बंदराचा मुख्य रस्त्यावरील सर्व्हिस रोडवर आज ही मोठ्या प्रमाणात पाणी साचून राहिले आहे. एकंदरीत संबंधित प्रशासनाच्या दुर्लक्षित कामांमुळे या रस्त्यावर अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. तरी गाव परिसरातील व रस्त्यांवरील गटाराची कामे पूर्ण करून पूर्ण झालेल्या गटारांची खरोखरच सफाई झाली आहे की नाही याची पाहणी करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

## छत्री वाटपातून समाज बांधवांशी संवाद

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

कुणबी समाजोन्नती संघ, ठाकरोली विभाग मुंबई संलग्न युवक मंडळ व क्रीडा मंडळ यांच्यावतीने समाजासाठी सामाजिक बांधिलकी जपत ''एक घर एक छत्री'' हा अभिनव उपक्रम कोलवट या ठिकाणी पार पडला. यावेळी वाडी वस्ती वर प्रत्यक्ष जाऊन लोकांजवळ सामाजिक संवाद साधण्यात आला. या कार्यक्रमाला ठाकरोली विभाग अध्यक्ष नथुराम भुवड, कुणबी संघाचे उपाध्यक्ष बबन उंडरे, माजी अध्यक्ष दिलीप मांडवकर आदींसह अनेक मान्यवर, प्रत्येक गावचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव उपस्थित होते. यावेळी १४०० छत्र्या वाटप करण्यात आल्या.

## हृदय तपासणी शिबिराला प्रतिसाद



**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील शिहू येथील डॉ. पुरुषोत्तम भोईर व सुश्रूषा हार्ट केअर सेंटर आणि स्पेशालिटी हॉस्पिटल नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने दामोदर भोईर यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत हृदय तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. मोफत हृदय तपासणीसाठी नेरुळ येथून शुश्रूषा हार्ट केअर सेंटर व स्पेशालिटी मधील डॉक्टरांच्या टिमचे सहकार्य व योगदान लाभले. या शिबिरात विभागातील नागरीकांची ब्लडटेस्ट, इसीजी, ब्लडशुगर, ब्लड प्रेशर अशी तपासणी करण्यात आली. यावेळी एकूण ६७ नागरिकांची तपासणी करण्यात आली.

## किशोर बावदानेची मुंबई पोलीस दलात भरती

**। सुकेळी । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील एका छोट्याशा खेडेगावातील सुकेळी-धनगरवाडा येथील किशोर बावदाने या युवकाने मुंबई पोलीसमध्ये भरती होऊन आपल्या आई - वडीलांचे स्वप्न साकार केले आहे. त्यामुळे संपूर्ण सुकेळी विभागासह रोहा तालुक्याचे नाव रोशन झाले आहे. त्याच्या या निवडीबद्दल त्याच्यावर सर्वच ठिकाणाहुन कौतुकांचा वर्षाव होत आहे. किशोर याचे आई-वडील हे सुकेळी येथिल जिंदल कंपनीच्या गेटवर एक छोटासा हॉटेलचा व्यवसाय करीत आहेत. अंत्यंत गरीब परिस्थिती असलेल्या किशोर याने हॉटेलच्या व्यवसायामध्ये हातभार



लावत अनेक वेळा त्याने पोलीस भरतीसाठी प्रवेश घेतला होता; परंतु, त्याला अनेक वेळा अपयशाला सामोरे जावे लागले. मात्र, किशोर याने कोणत्याही प्रकारची हार न मानता यावेळी मात्र यश प्राप्त केले.

## विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची नवी दिशा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांना एआय, डिजिटल कौशल्ये आणि रोजगाराभिमुख शिक्षणाची जोड मिळावी या उद्देशाने पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी एआय पॉवर्ड एमएस-सीआयटी, केएलआयसी आणि आयलाईक कोर्सेस या महत्त्वपूर्ण शैक्षणिक उपक्रमांची सविस्तर माहिती देण्यात आली. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना भविष्यातील स्पर्धात्मक जगासाठी सक्षम बनविण्याचा या उपक्रमांचा मुख्य उद्देश असल्याचेही सांगण्यात आले.




यावेळी एमएस-सीआयटी सर्वाधिक लोकप्रिय संगणक साक्षरता अभ्यासक्रमाच्या एआय पॉवर्ड नव्या स्वरूपाचे सादरीकरण करण्यात आले. पारंपरिक संगणक शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना आधुनिक एआय आधारित शिक्षण अनुभव देण्यासाठी एआय एक्सपेरीयन्स मॅप विकसित करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिकण्याची पद्धत, गती, आवड आणि प्रगती लक्षात घेऊन वैयक्तिक अध्ययन सहाय्य दिले जाणार असल्याची माहिती देण्यात आली. तसेच, 'क्रांती' या एआय आधारित शैक्षणिक सुलभक चे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शंका निरसनापासून परीक्षा तयारीपर्यंत 'क्रांती' प्रभावी डिजिटल सहाय्यक म्हणून कार्य करणार आहे. यावेळी एमकेसीएल पुणेचे महाव्यवस्थापक नटराज कटकधोंड, कोकण विभागाचे मेंटोर जयंत भगत, विभागीय समन्वयक विभागाचे मंगेश जाधव आणि जिल्हा समन्वयक सिद्धेश गोसावी उपस्थित होते.

## आरोग्य शिबिराचे आयोजन

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक शंकर म्हात्रे यांच्या जन्मदिनानिमित्त मंगळवारी (दि.२) कामोठे सेक्टर ९ येथील विठ्ठल रखुमाई मंदिरात आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याचे उद्घाटन माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या मोफत आरोग्य शिबिरासाठी एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथील डॉक्टरांनी विशेष मेहनत घेऊन मूत्रपिंड व मूत्रमार्ग विकार, मेंदू मज्जा संस्था विकास, जठर व अत्रे शस्त्रक्रिया, त्वचारोग, कान नाक घसा तपासणी आणि इसीजी इत्यादी सुविधा दिल्या गेल्या. त्याचा लाभ कामोठे मधील रहिवाशांनी घेतला. यावेळी माजी नगरसेवक प्रमोद भगत, पनवेल तालुका चिटणीस राजेश केनी, माजी जिल्हा परिषद सदस्य विलास फडके, चंद्रकांत नवले, दत्ता आवटी, अनिल पवार, लक्ष्मण सकपाळ, तुकाराम कदम, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष हरिश्चंद्र पाटील, नाना भगत आदी मान्यवर उपस्थित होते.

## मोहमाळवाडी जिल्हा परिषद शाळेचा कायापालट

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेच्या मोहमाळवाडी येथील शाळेचा कायापालट झाला आहे. टोरंट पॉवर स्टोरेज सोल्युशन लिमिटेड कंपनीच्या सामाजिक दायित्व मधून अनेक पायाभूत आणि भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्याचवेळी येथील आदिवासी लोकांच्या आरोग्याच्या समस्या सोडवण्यासाठी मेडिकल कॅम्प देखील आयोजित करण्यात आले आहे.

दरम्यान, मोहमाळवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत काही पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी शाळेचे मुख्याध्यापक यांच्याकडून करण्यात आली होती.




त्यानुसार संबंधित कंपनीने आपली सीएसआर फंडातून मोहमाळ वाडी येथील शाळेसाठी सिमेंट प्लेटचे कुंपण घालण्याचे काम पूर्ण करून दिले आहे. तर, शाळेच्या आवारात शौचालय, सोलर पॅनल, वर्गामध्ये साउंड सिस्टीम तसेच डिजिटल बोर्ड आणि शाळेला रंगरंगोटी करून दिलेली आहे.

**पर्यावरण संतुलनासाठी महत्व अबाधित | मानवी प्रदूषणामुळे प्रजननावर गंभीर परिणाम**

# पाणमांजरांचा अस्तित्वासाठी संघर्ष

**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

मानवाने नद्यांमध्ये केलेले प्रदूषण, वाढते नागरीकरण आणि नैसर्गिक अधिवासावर झालेली अतिक्रमणे या सर्व प्रतिकूल परिस्थितीशी जुळवून घेत रायगड जिल्ह्यातील नद्यांमध्ये पाणमांजरांनी आपले अस्तित्व टिकवून ठेवले आहे. अतिशय लाजाळू स्वभावाच्या असलेल्या या जलचरांचे रायगड जिल्ह्यातील काळ, सावित्री, कुंडलिका, अंबा आणि उल्हास इत्यादी सर्वच प्रमुख नद्यांमध्ये आजही अस्तित्व टिकून आहे. त्यामुळे ही निसर्गप्रेमींसाठी अत्यंत दिलासादायक बाब आहे. अनेकदा मच्छिमार तसेच स्थानिकांना या प्राण्याचे अचानक दर्शन घडते. त्याला पाहून काहीजण अचंबित देखील होतात. बऱ्याचदा पाणमांजर मच्छीमारांच्या जाळ्यामधून मच्छी नेतात. तर, कधी जाळी देखील तोडतात.

माणगाव येथील काळ नदीमध्ये पाणमांजरांच्या काही विलोभनीय हालचाली प्रसिद्ध पर्यावरण अभ्यासक व छायाचित्रकार शंतनू कुवेसकर यांनी आपल्या कॅमेऱ्यात टिपल्या आहेत. तसेच, या पाणमांजरांवर शंतनू कुवेसकर यांचा गेली १२ वर्षे अभ्यास सुरू आहे. या प्रदीर्घ अभ्यासामुळेच पाणमांजरांच्या सवयी, त्यांचे अन्न शोधण्याचे तंत्र आणि त्यांच्या अनेक अज्ञात हालचालींचा उलगडा करण्यात त्यांना यश आले आहे. पाणमांजरांचे जीवन आणि त्यांचे महत्त्व सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावे,



या उद्देशाने त्यांनी २०१९ साली एक माहितीपूर्ण लघुपट देखील तयार केला आहे. हा लघुपट त्यांच्या अधिकृत यूट्यूब चॅनेलवर उपलब्ध असून, त्या माध्यमातून पाणमांजरांच्या संवर्धनासाठी मोठी जनजागृती होत आहे. नद्यांमधील अन्नसाखळी संतुलित ठेवण्यात या प्राण्याचा किती मोठा वाटा आहे, हे या लघुपटातून प्रकर्षाने समोर आले आहे.

रायगड जिल्ह्यातील नद्यांमध्ये वाढणारे रासायनिक सांडपाणी आणि प्लास्टिक कचरा यांमुळे पाणमांजरांच्या प्रजननावर गंभीर परिणाम होत आहे. नदीकाठची जंगले नष्ट झाल्यामुळे या प्राण्यांना लपण्यासाठी आणि विणीसाठी सुरक्षित जागा मिळेनाशी झाली आहे. तसेच, नदीतील माशांचे प्रमाण घटल्यामुळे त्यांच्या खाद्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

> **केवळ चर्चा न करता, रायगडच्या या जीवनवाहिन्या असलेल्या नद्या प्रदूषणमुक्त करणे गरजेचे आहे. पाणमांजरांचा अधिवास संरक्षित झाला पाहिजे. याबरोबरच स्थानिक नागरिक, मच्छिमार आणि प्रशासनाने एकत्र येऊन या दुर्मिळ प्राण्याला अभय दिले, तरच रायगडच्या नद्यांचे हे वैभव पुढील पिढ्यांना पाहायला मिळेल.**
>
> **- शंतनू कुवेसकर, वन्यजीव अभ्यासक**

### नदीच्या शुद्धतेचा दर्शक!

पर्यावरण शास्त्रात पाणमांजर हा नदीच्या आरोग्याचा दर्शक मानला जातो. जर नद्यांमध्ये पाणमांजरे सुदृढ अवस्थेत असतील, तर ती नदी आणि तिची परिसंस्था जिवंत व शुद्ध आहे असे समजतात. त्यामुळे या लाजाळू जलचराचे रक्षण करणे ही केवळ पर्यावरणवाद्यांचीच नाही, तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे.

# चौल-२ शाखेची राज्यात नोंद

## • रायगडातील पहिले १०० टक्के स्मार्ट मीटरयुक्त कार्यालय



**। चौल । प्रतिनिधी ।**

महावितरणच्या स्मार्ट मीटर अभियानात अलिबाग विभागातील चौल-२ शाखा कार्यालयाने उल्लेखनीय कामगिरी करत रायगड जिल्ह्यातील पहिले १०० टक्के स्मार्ट मीटर बसविलेले शाखा कार्यालय होण्याचा मान मिळविला आहे. शाखेअंतर्गत असलेल्या सर्व १,५७० वीज ग्राहकांचे मीटर स्मार्ट मीटरमध्ये रूपांतर करण्यात आले आहे.

महावितरणकडून राज्यभर स्मार्ट मीटर बसविण्याची मोहीम वेगाने सुरू असून, कोंकण प्रादेशिक विभागाने आतापर्यंत सर्वाधिक ४३ लाखांहून अधिक स्मार्ट मीटर बसविले आहेत. रायगड जिल्ह्यातील पेण मंडळ कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात १०५ शाखा कार्यालये असून, त्यामध्ये चौल-२ शाखेने ही कामगिरी सर्वप्रथम पूर्ण केली आहे.

स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांना अचूक व पारदर्शक वीजबिल मिळत असून, मोबाईल ॲपद्वारे वीज वापरावर थेट लक्ष ठेवणे शक्य झाले आहे. वेळेनुसार वीज वापराचे नियोजन करून ग्राहकांना बिलात बचतही करता येत आहे. रायगड जिल्ह्यात आतापर्यंत सुमारे ३.४० लाख ग्राहकांना स्मार्ट मीटरमुळे एकूण २.८३ कोटी रुपयांची वीजबिल सवलत मिळाल्याची माहिती महावितरणने दिली.

स्मार्ट मीटरमुळे वीज वापराची माहिती तात्काळ उपलब्ध होत असल्याने बिलिंगमधील त्रुटी, वीज चोरी आणि मीटरमधील छेडछाड रोखण्यास मदत होत आहे. तसेच वीजपुरवठ्याचे नियोजन अधिक परिणामकारकपणे करता येत असल्याने सेवा अधिक कार्यक्षम आणि विश्वासार्ह बनत आहे.

ही यशस्वी मोहीम राबविण्यासाठी चौल-२ शाखेचे अभियंता देव्रत पवार व कर्मचाऱ्यांनी ग्राहकांमध्ये व्यापक जनजागृती व प्रबोधन केले. अधीक्षक अभियंता धनराज बिक्कड आणि उपविभागीय अधिकारी तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली हे उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले. या कामगिरीबद्दल भांडुप परिमंडलाचे मुख्य अभियंता संजय पाटील यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली बिनशेती मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक रमेश भवन चौधरी यांचेसोबत झालेली आहे. सदर बिनशेती मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या बिनशेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार |
|---|---|---|---|
| वरसोली ता.अलिबाग | ५५/१/१ | एकुण क्षेत्र २.४६.०० | २४.६० |

वर वर्णन केलेली बिनशेती मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील बिनशेती मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील बिनशेती मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ (सात) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधन कारक राहणार नाही, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु.पेझारी (पळी आंबेघर), पो.पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा.नं.९२७३२७३८४३/९६३७२७००१९

### जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटिसाने कळविण्यात येते की, मिळकतीचे मालक यांनी त्यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील खालील मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे पक्षकार यांच्याबरोबर मिळकतीच्या मालकांनी विक्री व्यवहार केलेला आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालिल प्रमाणे :

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | सर्व्हे नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार |
|---|---|---|---|
| उमटे ता.अलिबाग. | ९३ | क्षेत्र १-२१-४० | ११.५६ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज् अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवासांचे आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्या संबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत असे गृहीत धरुन त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०२/०६/२०२६

सही/-
**ॲड कौस्तुभ पुनकर**
पत्ता: जिल्हा न्यायालय
रायगड-अलिबाग
९७६५०७०००९

### जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटिसाने कळविण्यात येते की, मिळकतीचे मालक यांनी त्यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील खालील मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे पक्षकार यांच्याबरोबर मिळकतीच्या मालकांनी विक्री व्यवहार केलेला आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालिल प्रमाणे :

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | सर्व्हे नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार |
|---|---|---|---|
| उमटे ता.अलिबाग. | ४८/२ | क्षेत्र १-१२-२० | २३.५६ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज् अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवासांचे आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्या संबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत असे गृहीत धरुन त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०२/०६/२०२६

सही/-
**ॲड कौस्तुभ पुनकर**
पत्ता: जिल्हा न्यायालय
रायगड-अलिबाग
९७६५०७०००९

### जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्याप्रमाणे आमचे अशिल व मिळकतीचे विद्यमान मालक १. श्री. चंद्रकांत दत्तात्रेय ठाकुर, २. योजना राम काठे, ३. संध्या कामळाकर नाईक, ४. श्रीशा उर्फ निलम गणेश पाटील, ५. मिनल मोहन ठाकूर, ६.मानसी श्रेयस पाटील, ७ महती मोहन ठाकूर, ८.श्रीमती ज्योती चंद्रकांत म्हात्रे, ९.श्रीमती स्वाती विजय म्हात्रे, १०. श्रीमती भारती दिपक म्हात्रे, ११. श्री. निशिकांत मधुकर नाईक, १२ श्री.रश्मिकांत मधुकर नाईक, १३. श्री.शशिकांत मधुकर नाईक, यांच्यामध्ये साठेकरार करण्यात आलेला आहे मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| म्हात्रोळी, ता.अलिबाग. | ३२७ | ०-३४-२०<br>पो.ख.०-०३-३०<br>एकुण ०-३७-५० | १०.११ |

संदर्भित मिळकत पुर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सुचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासुन १४ दिवसांचे कालावधीत माझेकडे लेखी पुराव्यानिशी हरकत देऊन माझी खात्री पटवुन द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : ०३/०६/२०२६

**ॲड. किशोर म. हजारे**
बी.कॉम.एल.एल.बी.
००१, वैद्यबाग को.ऑप
हौ.सो.कामत आळी,
ता.अलिबाग, जि.रायगड.

### JANATA SHIKSHAN MANDAL'S
### ADV DATTA PATIL COLLEGE OF LAW ALIBAG,
DIST.-RAIGAD, PIN: 402201.

**WALK-IN-INTERVIEW**

The walk-in-interview is arranged at ADV DATTA PATIL COLLEGE OF LAW ALIBAG on 10/06/2026 at 11:00 a.m. to fill up the following Posts on Purely temporary and contract basis.

| Sr. No. | Cadre | Subject | Total No. of Posts |
|---|---|---|---|
| 1. | Principal | ------ | 01 |
| 2. | Assistant Professor | Law | 06 |
| 3. | Librarian | ------ | 01 |

Educational Qualification as per the norms of University of Mumbai. Post Graduate in concern subject with NET/SET or Ph.D. for Law College and as per Department of Education, Gov. of Maharashtra.

- No. T.A./D.A. will be paid for attending the Interview.
- Bring the attested Xerox copies of all the academic documents and original documents along with the application.
- Final recruitment will be based on available workload of the respective Subject.
- Appointment will be at sole discretion of the management, no explanation shall be given for the rejection.
- Pay scales will be as per the Management rule.

Place :- Adv. Datta Patil College of Law, Alibag (J.S.M. College Campus-Alibag-Raigad)
Date of Interview :- 10th June 2026
Reporting Time :- 10:00 a.m.

**Dr. Neelam K. Hajare**
**I/c Principal,**
**Adv. Datta Patil College of Law**
**Alibag Raigad**

**Adv. Gautam P. Patil**
**President,**
**Janata Shikshan Mandal**
**Alibag Raigad**

### कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**ई-निविदा सूचना**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे, विभागीय विद्युत अभियंता, केआरसीएल, रत्नागिरी यांनी पुढील कामासाठी ई-ओपन टेंडरची आमंत्रणे दिलेली आहेत.

**अ.क्र. 1, कामाचे नाव** – कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील विविध स्थानक यार्डांमध्ये विद्यमान इन्सुलेटेड ओव्हरलॅप (आयओएल) मध्ये सुधारणा करण्यासाठी विद्युत कामे, ज्यामध्ये डिझाइन, पुरवठा, उभारणी, चाचणी व कार्यान्वयन यांचा समावेश आहे. **टेंडर क्रमांक : केआर/आरएन/ईएल/टी/7ए/2026 दिनांक 03/06/2026, अंदाजित खर्च** – ₹ 66,62,556/- (जीएसटी वगळून), **टेंडर फॉर्म शुल्क** – नाही, **ईएमडी** – ₹ 1,33,300/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे) **टेंडर ऑनलाइन सादर करण्याची शेवटची तारीख व वेळ :** 24/06/2026 दुपारी 15:00 वाजेपर्यंत.

**अ.क्र. 2, कामाचे नाव** – केआरसीएलच्या रत्नागिरी विभागातील ट्रॅक्शन सबस्टेशनमध्ये स्थापित न्यूमेरिकल रिले यांची दोन वर्षांसाठी वार्षिक चाचणी व कॅलिब्रेशन करणे. **टेंडर क्रमांक : केआर/आरएन/ईएल/टी/14/2026 दिनांक 03/06/2026, अंदाजित खर्च** – ₹ 30,43,600/- (जीएसटी वगळून), **टेंडर फॉर्म शुल्क** – नाही, **ईएमडी** – ₹ 60,900/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे) **टेंडर ऑनलाइन सादर करण्याची शेवटची तारीख व वेळ :** 24/06/2026 दुपारी 15:00 वाजेपर्यंत.

अधिक माहितीसाठी विभागीय विद्युत अभियंता, एमआयडीसी परिसर, मिरजोळे, रत्नागिरी यांच्या कार्यालयाशी अथवा रेल्वे संकेतस्थळावर (www.ireps.gov.in) संपर्क साधावा.

### जाहीर सुचना

सर्व संबधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे खारखर्डी, ता. रोहा, जि. रायगड, येथील खाली नमुद वर्णनाची शेतजमिन मिळकत, श्रीमती कुसूम धर्मा घाग, वगैरे, राहणार वसई, ठाणे, यांच्या मालकीची असून सदरील शेतजमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायम स्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहे. सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून चौदा (१४) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेख पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| खारखर्डी, ता. रोहा. | २९३ | ०-४१-५०<br>०-०६-४० पो.ख.<br>०-४७-९० एकूण | ७-४५ |

अलिबाग,
दिनांक : ०२/०६/२०२६

सही/-
**(ॲड. संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड. खरेदीदाराचे वकील

### जाहीर सूचना

याद्वारे जनतेला सूचना देण्यात येत आहे की, आम्ही आमच्या अशिलांच्या निर्देशानुसार याखाली दिलेल्या अनुसूचीमध्ये अधिक विशेषतः वर्णन केलेल्या जिल्हा रायगड, तालुका खालापूर, गाव भिलावले येथे स्थित आणि वसलेले सर्व्हे क्र. ३८/३ असलेला मोजमापीत ०-०८-०० एच-आर-पी (म्हणजेच ८०० चौरस मिटर्स) जमिनीसंबंधात ६०१, चेरिश, सिटी ऑफ जॉय, निर्मल लाइफस्टाइल, जेएसडी रोड, मुंलुंड पश्चिम, मुंबई ४०००८० येथे राहणारे भारतीय, वय ४७ वर्षे, शेतकरी, नितीन विजय परुळेकर (पॅन: एजेजेपीपी६१६३बी) (''मालक'') यांच्या मालकी अधिकाराची, मालकी हक्काची आणि हितसंबंधाची चौकशी करीत आहोत, कारण आमचे अशील मालमत्ता मालकाकडून स्पष्ट आणि विक्रीयोग्य मालकी हक्कासह तसेच कोणत्याही स्वरुपाच्या सर्व बोज्यापासून व दायित्वांपासून मुक्त स्थितीत खरेदी करण्याबाबत वाटाघाटी करत आहेत.

कोणत्याही किंवा सर्व व्यक्तींचे/एन्टीटींचे/संस्थेचे/प्राधिकरणाचे मालमत्ता किंवा मालमत्तेच्या कोणत्याही भागावर विक्री, विक्रीसाठी करार, सामंजस्य करार, हस्तांतरण, नियुक्ती, विनिमय, भागीदारी, वितरण, भार, ऋणभार, कुळ, उपकुळ, भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, परवाना, गहाणवट (न्याय्ययोग्य किंवा अन्यथा), वारसा, वहिवाट, काळजीवाहू तत्वावर, ताबा, विभाजन, हिस्सा, भेट, योजना, धारणाधिकार, शुल्क, नियमित खर्च, विकास हक्काचे अनुदान, देखभाल, सुविधाधिकार, मार्गाचा अधिकार, विश्वस्त, करारनामा किंवा अट, मुक्तता, त्याग, संपादन, मागणी, कोणत्याही ट्रस्टअंतर्गत फायदेशीर हक्क/हित, कोणत्याही करार, संविदा, डीड, दस्तऐवज, लेखन, अभिहस्तांतरणद्वारे प्रिस्क्रीप्शन किंवा प्रीएम्शनचा अधिकार किंवा इतर कोणत्याही पद्धतीने, योजना, मृत्यूपत्र, उत्तराधिकार, आरक्षण, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, एफएसआय, टीडीआर, विल्हेवाट, खटला, कोणत्याही न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने किंवा महसूल किंवा वैधानिक प्राधिकरणाने किंवा लवादाने पारित केलेली डिक्री किंवा आदेश किंवा निवाडा किंवा अन्यथा कोणत्याही प्रकारे कोणत्याही स्वरुपाचा कोणताही हिस्सा, अधिकार, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, आक्षेप आणि/ किंवा मागणी (प्रत्येक्ष किंवा अप्रत्येक्ष), लाभ आणि/किंवा हक्क आहे आणि असल्याचा दावा करीत असल्यास (''दावे'') त्यांनी याद्वारे अधोस्वाक्षरीकरींना खैतान ॲण्ड कंपनी, वकिल, वन वर्ल्ड सेन्टर, टॉवर-१सी, १३वा मजला, ८४१ सेनापति बापट मार्ग, मुंबई ४०००१३ येथे तसेच mumbai@khaitanco.com (श्री.अभिराज गांधी यांना लक्षवेधासाठी चिन्हांकित करुन) या ईमेल वर सदर सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत संपूर्ण आणि प्रमाणित सत्य प्रतींसहीत लिखीत स्वरुपात कळविणे आवश्यक आहे, अन्यथा, असे मानले जाईल की दावेदारांनी असे दावे सोडुन दिले आहेत किंवा असे दावे, जर असतील तर, सर्व हेतू आणि उद्देशासाठी जाणीवपूर्वक माफ केले आहेत, दुर्लक्ष केले आहेत, सोडले दिले आहेत आणि स्विकार केले आहेत आणि यापुढे ते मालक आणि/किंवा आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

गाव भिलावले, तालुका खालापूर, जिल्हा रायगड येथे स्थित सर्व्हे क्रमांक ३८/३ असलेला मोजमापीत ०-०८-०० एच-आर-पी (म्हणजेच ८०० चौरस मिटर्स) जमिनीचा सर्व तो तुकडा आणि खंड. जमिनीच्या चर्तु:सीमा खालिलप्रमाणे आहेत:

उत्तरेकडे वा त्या दिशेला : सर्व्हे क्रमांक ३८/२बी
दक्षिणेकडे वा त्या दिशेला : सर्व्हे क्रमांक ३८/१/ए
पूर्वेकडे वा त्या दिशेला : सर्व्हे क्रमांक ३९
पश्चिमेकडे वा त्या दिशेला : सर्व्हे क्रमांक ३८/१/डी

आज दिनांक ३ जुन २०२६

**खैतान ॲन्ड कंपनी करीता**
सही /-
अभिराज गांधी
भागीदार

### Janata Shikshan Mandal's
Smt. Indirabai G. Kulkarni Arts College, J.B.Sawant Science College & Sau. Janakibai Dhondo Kunte Commerce College Alibag, Dist. Raigad, Pin: 402 201.

**WALK-IN-INTERVIEW**

The walk-in interview is arranged at J.S.M. College, Alibag on 10/06/2026 at 11.00 a.m. to fill up the following posts of Teaching and Non-teaching staff on purely temporary and contract basis.

| Sr. No. | Name of the subject | No. of Posts Sr. College |
|---|---|---|
| 1 | Marathi | 02 |
| 2 | Hindi | 02 |
| 3 | Political Science | 01 |
| 4 | History | 01 |
| 5 | Economics | 01 |
| 6 | Chemistry | 01 |
| 7 | Botany | 02 |
| 8 | Mathematics | 01 |
| 9 | Commerce | 01 |
| 10 | Information Technology | 06 |
| 11 | Computer Science | 06 |
| 12 | B.Com MS | 04 |
| 13 | Jr. Clerk | 04 |
| 14 | Peon | 05 |

Educational Qualifications as per the norms of University of Mumbai, Post graduate in concern subject with NET/SET or Ph.D. for teaching staff, for Clerk Educational Qualification-Graduation (B.A, B.Sc, or B.Com,) & for Peon Educational Qualification - 10th Pass

- No T.A./D.A. will be paid for attending the interview.
- Bring the attested Xerox copies of all the academic documents and original documents along with the application.
- Final recruitment will be based on available workload of the respective subject.
- Appointments will be at sole discretion of the Management; no explanation shall be given for the rejection.
- Pay scale will be as per the Management rule.

Place : J.S.M. College Alibag-Raigad
Date of Interview: 10th June 2026.
Reporting Time : 10:00 a.m.

**Dr. Sonali S. Patil**
Principal
J.S.M.College, Alibag

**Adv. Gautam Patil**
President
Janata Shikshan Mandal, Alibag.

### Janata Shikshan Mandal's
**Arts, Science & Commerce Junior College Alibag - Raigad**

**WALK-IN-INTERVIEW**

The walk-in interview is arranged at J.S.M. College, Alibag on 10/06/2026 at 11.00 a.m. to fill up the following posts of teaching staff on purely temporary and contract basis.

| Sr. No. | Name of the subject | No. of Posts Jr. College |
|---|---|---|
| 1 | English | 02 |
| 2 | Geography | 01 |
| 3 | Physics | 05 |
| 4 | Chemistry | 07 |
| 5 | Biology | 05 |
| 6 | Mathematics | 04 |
| 7 | Information Technology | 04 |
| 8 | Computer Science | 02 |
| 9 | Electronics | 01 |

- Educational Qualifications for teaching staff - Post graduate in concern subject with B.Ed. as per the Department of Education, Govt. of Maharashtra.
- No T.A./D.A. will be paid for attending the interview.
- Bring the attested Xerox copies of all the academic documents and original documents along with the application.
- Final recruitment will be based on available workload of the respective subject.
- Appointment will be at sole discretion of the Management, no explanation shall be given for the rejection.
- Pay scale will be as per the Management rule.

Place : J.S.M. College Alibag-Raigad
Date of Interview: 10th June 2026.
Reporting Time : 10:00 a.m.

**Dr. Sonali S. Patil**
Principal
J.S.M.College, Alibag

**Adv. Gautam Patil**
President
Janata Shikshan Mandal, Alibag.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-वरसोली, ता.अलिबाग, जि. रायगड, येथील सर्व्हे नंबर ८/३, क्षेत्र ०-२५-१० हे. आर, पो. ख. ०-०३-०० हे. आर. एकूण क्षेत्र ०-२८-१० हे. आर., आकार ५.२५ रू. पैसे, पैकी क्षेत्र ०-०२-०० हे.आर., ०.४२ रू. पैसे ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. मनोहर भालचंद्र चवरकर २) सौ. मिनोती मनोहर चवरकर दोघेही रा. फ्लॅट नं.५०३, प्लॉट नं.१७, सेक्टर २०, पनवेल, रायगड ४१०२०६ यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०२/०६/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

### नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १) अनुजा अनंत पुराणिक, २) प्रसाद प्रभाकर विरकर, ३) पराग प्रभाकर विरकर, ४) विनीत अनिल सोबळकर यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| नागाव ता.अलिबाग | १५८४ | ०-२४-००<br>पो.ख. ०-०३-३०<br>एकुण ०-२७-३० | १०.८७ |

वर नमुद बागायत मिळकत व त्यामधील ग्रुप ग्रामपंचायत नागाव घर मिळकत क्र. ९५६ ह्या जमिन व घर मिळकतीबाबत.

दिनांक : ०३/०६/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे. एस. एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्या येते की, आमचे अशिलांनी मौजे वनवली, ता.अलिबाग जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत संबंधीत मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| वनवली | ८४ | जिरायत ०-४६-००<br>वरकस ०-०९-००<br>पो.ख.०-००-००<br>एकूण ०-५५-०० | ११.३१ | श्री.रमेश गणपत पाटील |

सदरची मिळकत ही विद्यमान मालक यांच्या निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क व अधिकार असल्याबाबत निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा त्याचे कोणत्याही भागावर कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, रस्त्याच्या वहिवाटीचे हक्क, वारसा हक्क, व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहीत लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कोणाचेही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांच्यावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हितसंबंध व हक्क नाही. अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभात सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कोणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.०३/०६/२०२६

सही/-
**ॲड.अमित विष्णु राऊळ**
सातिर्जे, अलिबाग-रायगड
मो.नं. ८६९८०००२३८

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग

दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# आंतरराष्ट्रीय क्रिकेट धोक्यात?

## || क्रिकेट जगताला टी-२० लीगचा विळखा! | आयसीसीची विशेष समिती स्थापन

| मुंबई | प्रतिनिधी |

क्रिकेट जगतात फ्रँचायझी टी-२० लीगमुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेटचं भवितव्य धोक्यात आले आहे. दिवसांगणिक जगभरातील वेगवेगळ्या देशात खेळवण्यात येणाऱ्या टी-२० लीग स्पर्धेची संख्या वाढत असून अनेक स्टार क्रिकेटर राष्ट्रीय ड्युटीपेक्षा फ्रँचायझी लीगच्या ब्युटीला भुलत आहेत. या आकर्षणाचा आंतरराष्ट्रीय क्रिकेटला फटका बसू नये, यासाठी आता आयसीसीने मोठे पाऊल उचलत एक विशेष समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. ही समिती फ्रँचायझी क्रिकेट आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट यांच्यात समतोल कसा राखता येईल? याचा अभ्यास करणार आहे.

जगभर झपाट्याने वाढणाऱ्या २० फ्रँचायझी लीग्सच्या पार्श्वभूमीवर बोर्डाने विशेष समिती स्थापन करण्यास मंजुरी दिली. या समितीचे मुख्य काम फ्रँचायझी लीग आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट वेळापत्रक यांच्यात समतोल राखण्यासाठी आराखडा तयार करणे हा असेल. सध्याच्या क्रिकेट संरचनेवर कोणताही नकारात्मक परिणाम होणार नाही, याची खात्री देखील ही समिती करेल.

आयसीसीच्या मते, सदस्य देशांच्या क्रिकेट बोर्डांमध्ये अशी चिंता वाढत आहे की, देशांतर्गत टी २० लीग्सच्या विस्तारामुळे द्विपक्षीय मालिका आणि आयसीसीच्या फ्यूचर टूर प्रोग्रामवर सतत दबाव वाढत आहे. आयसीसीने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, फ्रँचायझी क्रिकेटच्या झपाट्याने वाढणाऱ्या विस्ताराबाबत बोर्डाने चिंता व्यक्त केली असून आंतरराष्ट्रीय क्रिकेट कॅलेंडर आणि फ्रँचायझी क्रिकेट यांच्यातील सुसंगतीचा अभ्यास करण्यासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

आयसीसी बराच काळ खेळाडूंची उपलब्धता, राष्ट्रीय संघांप्रती असलेली बांधिलकी आणि फ्रँचायझी क्रिकेटच्या व्यावसायिक यशामधील संतुलन राखण्याचा प्रयत्न करत आहे. यापूर्वीही आयसीसीच्या विविध समित्यांमध्ये अशी सूचना मांडण्यात आली होती की, एका खेळाडूला एका हंगामात मर्यादित संख्येनेच फ्रँचायझी लीग्स खेळण्याची परवानगी द्यावी, जेणेकरून आंतरराष्ट्रीय क्रिकेटलाच सर्वोच्च प्राधान्य राहील. विशेषतः लहान क्रिकेट राष्ट्रांसाठी ही बाब अधिक गंभीर मानली जात आहे. कारण तेथील अनेक खेळाडू आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटपेक्षा फ्रँचायझी क्रिकेटला अधिक फायदेशीर आणि स्थिर करिअरचा पर्याय मानू लागले आहेत.

अलीकडच्या काळात अनेक मोठ्या खेळाडूंनी फ्रँचायझी क्रिकेटवर लक्ष केंद्रित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. यामध्ये निकोलस पूरन आणि हेन्रिक क्लासेन यांसारख्या मोठ्या नावांचा समावेश आहे. पूरनने वयाच्या ३० वर्षांपूर्वीच आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अलविदा केला. त्याचप्रमाणे सुनील नरेननेही बऱ्याच वर्षांपूर्वी आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळणे बंद केले होते, मात्र तो अजूनही विविध फ्रँचायझी लीग्समध्ये सक्रिय आहे.



### फ्रँचायझी लीगचा धमाका

गेल्या काही वर्षांत फ्रँचायझी क्रिकेटचा विस्तार प्रचंड वेगाने झाला आहे. इंडियन प्रीमियर लीग व्यतिरिक्त एसए२०, इंटरनॅशनल लीग टी २०, बिग बॅश लीग, बांगलादेश प्रीमियर लीग, लंका प्रीमियर लीग, द हंड्रेड आणि कॅरेबियन प्रीमियर लीग यांसारख्या स्पर्धांनी क्रिकेट कॅलेंडरमध्ये मोठी जागा व्यापली आहे. याशिवाय यंदापासून युरोपियन टी २० प्रीमियर लीगचीही सुरुवात होत असून त्यामुळे क्रिकेटचे वेळापत्रक आणखी व्यस्त होणार आहे.

# प्रज्ञानानंदा-गुकेश जिंकले

## देशमुख विजेतेपदाच्या शर्यतीत कायम




| ओस्लो | वृत्तसंस्था |

भारतीय खेळाडूंनी नॉर्वे चेस स्पर्धेच्या ७व्या फेरीत पुनरागमन केले. सोमवारी रात्री आर. प्रज्ञानानंदाने फ्रान्सच्या अलीरेझा फिरोजाला हरवून तीन गुण मिळवले. तर, विश्वविजेता डी. गुकेशने वेस्ली सो विरुद्ध टायब्रेक जिंकून १.५ गुण मिळवले.एक दिवसापूर्वी सहाव्या फेरीत भारतीय ग्रँडमास्टर्सना पराभवाला सामोरे जावे लागले होते. सध्या, आर. प्रज्ञानंदा आणि दिव्या देशमुख विजेतेपदाच्या शर्यतीत कायम आहेत. गुकेश ओपन गटात सर्वात खालच्या स्थानावर आहे.

प्रज्ञानानंदाने पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळताना २६व्या चालीवर आघाडी घेतली आणि फिरोजाला सलग दुसरा क्लासिकल पराभव दिला. या विजयानंतर त्याचे ९ गुण झाले आहेत.

गुकेश अमेरिकन ग्रँडमास्टर वेस्ली सो विरुद्धच्या क्लासिकल सामन्यात विजयाच्या जवळ पोहोचूनही ड्रॉवर थांबले. मात्र, टायब्रेक जिंकून त्यांनी १.५ गुण मिळवले. त्यांचे एकूण ८ गुण आहेत.

महिला गटात दिव्या देशमुखने स्वदेशातील कोनेरू हम्पीला आर्मागेडन टायब्रेकमध्ये हरवून १० गुण मिळवले. मात्र, कझाकिस्तानची बिबिसारा असाउबायेवा १२.५ गुणांसह आघाडीवर आहे. पुढील फेरीत दिव्या आणि बिबिसारा यांच्यातील सामना विजेतेपदाच्या शर्यतीची दिशा ठरवू शकतो.

ओपन गटात वेस्ली सो १२.५ गुणांसह अव्वल स्थानी आहे. अलीरेझा फिरोजा १० गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. प्रज्ञानानंदा, मॅग्नस कार्लसन आणि विन्सेंट कीमर ९-९ गुणांसह संयुक्त तिसऱ्या स्थानावर आहेत.

महिला गटात कझाकिस्तानच्या बिबिसारा असाउबायेवा हिने चीनच्या झू जिनरला क्लासिकलमध्ये हरवून १२.५ गुण मिळवले. ती महिला गटात अव्वल स्थानी आहे. दिव्या १० गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. पुढील फेरीत बिबिसाराविरुद्ध तिची लढत किताबच्या शर्यतीसाठी महत्त्वाची ठरेल.

## निवडक

### आयसीसीने क्रिकेट कॅनडाचे सदस्यत्व केले निलंबित




**नवी दिल्ली** :आयसीसीने क्रिकेट कॅनडाचे सदस्यत्व निलंबित केले आहे. कॅनडा बोर्डाने सदस्यत्वाचे नियम आणि जबाबदाऱ्यांचे उल्लंघन केल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.मात्र, आयसीसीने स्पष्ट केले आहे की, बोर्डाच्या त्रुटींचा फटका तेथील खेळाडूंना बसणार नाही. आयसीसीने पुष्टी केली आहे की, निलंबनाच्या कालावधीतही कॅनडाचे राष्ट्रीय संघ आयसीसी स्पर्धांमध्ये खेळण्यास पात्र असतील. खेळाडूंचे ज्या मुद्द्यांवर नियंत्रण नाही, त्यासाठी त्यांना शिक्षा मिळायला नको, असे परिषदेचे मत आहे. खेळाडूंच्या खेळात कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी क्रिकेट कॅनडाला आयसीसीकडून निधी मिळत राहील. मात्र, यावेळी निधी देण्याची पद्धत पूर्णपणे आयसीसी व्यवस्थापनाच्या नियंत्रणात असेल.हा निधी केवळ मंजूर केलेल्या राष्ट्रीय संघ कार्यक्रमांसाठीच वापरला जाईल, जेणेकरून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये संघाची तयारी आणि सहभाग कोणत्याही अडथळ्याशिवाय सुरू राहील.क्रिकेट कॅनडा गेल्या काही काळापासून शासन आणि सचोटीशी संबंधित अनेक वादांना सामोरे जात आहे. हे निलंबन कायमस्वरूपी म्हणजे कायमचे नाही. आयसीसी क्रिकेट कॅनडाला काही अटी देईल, ज्या त्यांना सदस्यत्व परत मिळवण्यासाठी पूर्ण कराव्या लागतील. बोर्डातील सुधारणा आणि बदलांवर आयसीसीची नॉर्मलायझेशन कमिटी आणि आयसीसी व्यवस्थापन एकत्रितपणे लक्ष ठेवतील. या अटी आणि आवश्यक गव्हर्नन्स सुधारणांवरून पूर्णपणे समाधानी झाल्यानंतरच आयसीसी सदस्यत्व पूर्ववत करेल.

### जून महिन्यात आता विश्वकरंडक स्पर्धांची मेजवानी

**मुंबई** : तब्बल दोन महिने चाललेला आपीएलचा थरार रविवारी रॉयल चॅलेंजर्स बंगळूर संघाच्या विजेतेपदाने पूर्ण झाला, पण आता पुढे काय, असा प्रश्न क्रीडा चाहत्यांना पडणे स्वाभाविक आहे, पण त्यांना याहूनही अधिक मोठ्या स्पर्धांची मेजवानी मिळणार आहे. या जून महिन्यात भूतलावरील सर्वाधिक लोकप्रिय असलेल्या फुटबॉल खेळाची विश्वकरंडक स्पर्धा होत आहे. त्याच वेळी महिलांची टी-२० विश्वकरंडक स्पर्धाही रंगणार आहे.दोन दिवसांपूर्वी पीएसजी संघाने चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली आणि यंदाची व्यावसायिक फुटबॉल स्पर्धा संपली. त्यामुळे आता देशाची प्रतिष्ठा उंचावण्यासाठी विश्वकरंडक फुटबॉल सर्धेस पात्र ठरलेले देश स्पर्धेच्या तयारीस लागले आहेत. आता महान फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी आणि ख्रिस्तियानो रोनाल्डो यांचाही समावेश आहे. ११ जून ते १९ जुलै असा कालावधी असलेली ही विश्वकरंडक स्पर्धा अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको या तीन देशांत होत आहे. पात्र ठरणाऱ्या देशांची संख्या यंदा प्रथमच वाढवण्यात आली आहे. एकूण ४८ संघांच्या स्पर्धेतील सामन्यांची संख्या १०४ अशी आहे. एकीकडे अमेरिका खंडात विश्वकरंडक स्पर्धा रंगत असताना जवळपास त्याच कालावधीत इंग्लंडमध्ये महिलांची टी-२० स्पर्धा रंगणार आहे. १२ जून ते ५ जुलै असा स्पर्धेचा कालावधी आहे. महिलांच्या या स्पर्धेतही पात्र ठरलेल्या देशांची संख्या वाढून १२ झाली आहे. एकूण ३३ सामने होणार आहेत. भारताचे सामने सायंकाळी सात वाजता सुरू होतील. काही महिन्यांपूर्वी हरमनप्रीत कौरच्या भारतीय संघाने महिला एकदिवसीय विश्वकरंडक जिंकलेला असल्यामुळे त्यांच्याकडून आता अपेक्षा वाढल्या आहेत.



## राज्य पॉवरलिफ्टिंग इक्विपड स्पर्धा

# गायत्री अन् रौनक रोशन विजेते

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनच्या वतीने सिनियर, ज्युनिअर व सब ज्युनिअर , मास्टर्स पुरुष व महिला आणि अंध व गतिमंद दिव्यांग गटाची ईक्यूप्ड राज्य पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धा मुंबईत दिनांक २९ ते ३१ मे या कालावधीत ज्ञानेश्वर विद्यालय वडाळा मुंबई या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती.



स्पर्धेमध्ये रायगडच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. सब ज्युनिअर महिला गटामध्ये गायत्री महेश बडेकर हिने सुवर्ण पदकासह स्ट्राँग वुमन ऑफ महाराष्ट्र सब ज्युनिअर आणि रौनक रोशन जितेकर याने सब ज्युनिअर स्ट्राँग मॅन ऑफ महाराष्ट्र हा किताब पटकावला आहे. पारितोषिक वितरण समारंभ रितू राजेश तावडे यांच्या हस्ते झाला. रायगडची गायत्री बडेकर हिला राष्ट्रीय खेळाडू हनुमंत खरात आणि रौनक रोशन जितेकर याला विशाल मुळये यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या स्पर्धेत गायत्री बडेकर सुवर्णपदक, जान्हवी बडेकर सुवर्णपदक, रौनक जितेकर सुवर्णपदक, महेश पाटील सुवर्णपदक, अंजली येवले रौप्य पदक, रामचंद्र गावडे रौप्य पदक, यश गायकवाड कांस्य पदक विजेते खेळाडू ठरले.

या राज्य स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंनी ४ सुवर्ण, २ रौप्य आणि १ कांस्य अशी एकूण ७ पदके आणि दोन किताब प्राप्त केले. रायगडच्या खेळाडूंच्या यशाबाबत संघ व्यवस्थापक संदीप कृष्णा पाटकर, सहाय्यक सुभाष टेंबे आणि प्रशिक्षक रामचंद्र सखाराम गावडे यांनी आनंद व्यक्त केला आहे. तसेच पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश वेदक, सचिव अरुण पाटकर, सहसचिव सचिन भालेराव, सदस्य मानस कुंटे, कार्याध्यक्ष यशवंत मोगल, खजिनदार राहुल गजरमल यांनी सुद्धा खेळाडूंचे आणि त्यांच्या प्रशिक्षकांचे, स्पर्धेसाठी प्रोत्साहन देणाऱ्या पालकांचे अभिनंदन केले.

## सेरेना पुन्हा कोर्टवर परतणार

लंडन : सेरेना विल्यम्स सुमारे चार वर्षांनंतर व्यावसायिक टेनिसमध्ये पुनरागमन करत आहे. २३ ग्रँड स्लॅम एकेरी विजेतेपदे जिंकलेल्या सेरेनाने लंडनमध्ये होणाऱ्या क्वीन्स क्लब ग्रास-कोर्ट स्पर्धेत दुहेरी खेळण्यासाठी वाईल्ड कार्ड स्वीकारले आहे. विमेन्स टेनिस असोसिएशन टूरने सोमवारी याची घोषणा केली. क्वीन्स क्लब स्पर्धा ८ जूनपासून सुरू होईल. ने सांगितले आहे की, सेरेना विल्यम्सच्या दुहेरीतील जोडीदाराच्या नावाची घोषणा नंतर केली जाईल. सेरेनाच्या कोर्टवरील पुनरागमनामुळे ती विम्बल्डनमध्येही खेळू शकते, अशा अटकळींना वेग आला आहे. विम्बल्डन २८ जूनपासून सुरू होईल. सेरेनाने ऑल इंग्लंड क्लबमध्ये ७ एकेरी विजेतेपदे जिंकली आहेत.सेरेना शेवटची २०२२ च्या यूएस ओपनमध्ये खेळली होती. त्यावेळी तिने टेनिसला निरोप देताना सांगितले होते की, तिला रिटायरिंग या शब्दाचा वापर करायचा नाही.

# भारतात टीम इंडिया पाहुणी



| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

तुम्ही कधी एखाद्या देशाला आपल्याच भूमीवर पाहुणा म्हणून खेळताना पाहिले आहे का? टीम इंडिया या बाबतीत एक वेगळाच इतिहास रचणार आहे. या सप्टेंबरमध्ये दिल्लीत तीन सामन्यांची टी२० मालिका होणार आहे, ज्यात टीम इंडिया यजमान म्हणून नव्हे, तर पाहुणा संघ म्हणून खेळेल. अफगाणिस्तान या तीन सामन्यांच्या टी २० मालिकेचे यजमानपद भूषवणार आहे.

सप्टेंबरमध्ये अफगाणिस्तान आणि भारत यांच्यातील टी-२० मालिकेचे तिन्ही सामने दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर खेळले जातील. अफगाणिस्तानने भारताच्या भूमीवर भारताविरुद्ध द्विपक्षीय मालिकेचे आयोजन करण्याची ही पहिलीच वेळ असेल. असे मानले जाते की हे सामने १३, १६ आणि १९ सप्टेंबर रोजी होतील.

अफगाणिस्तानचा संघ जूनमध्ये भारतात एक कसोटी सामना खेळणार आहे. कसोटी सामन्यानंतर ते तीन एकदिवसीय सामनेही खेळतील. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील एकमेव कसोटी सामना ६ जून रोजी न्यू चंदीगड येथे सुरू होईल. कसोटी सामन्यानंतर, एकदिवसीय मालिका १३ जून रोजी सुरू होईल. मालिकेच्या आयोजनाबाबतची अधिकृत घोषणा प्रलंबित आहे.

## सबालेंका फ्रेंच ओपनच्या क्वार्टर फायनलमध्ये

| पॅरिस| वृत्तसंस्था |

वर्ल्ड नंबर-१ आर्यना सबालेंकाने फ्रेंच ओपनच्या चौथ्या फेरीत नाओमी ओसाकाला सरळ सेटमध्ये हरवले.पॅरिसमध्ये टॉप सीड सबालेंकाने जपानच्या ओसाकाला ७-५, ६-३ ने पराभूत केले. या विजयासह सबालेंकाने क्वार्टर फायनलमध्ये स्थान मिळवले. ती विजेतेपदाची प्रबळ दावेदार बनली आहे.



पहिल्या सेटमध्ये चार वेळा ग्रँड स्लॅम चॅम्पियन नाओमी ओसाकाने सबालेंकाच्या सर्व्हिसला चांगला प्रतिसाद दिला. दोघी ५-५ च्या बरोबरीत होत्या, पण सबालेंकाने ओसाकाची सर्व्हिस ब्रेक करून पहिला सेट ७-५ ने जिंकला.पहिल्या सेटमधील मानसिक आघाडीचा फायदा सबालेंकाला दुसऱ्या सेटमध्ये मिळाला. तिने सुरुवातीपासूनच ओसाकावर दबाव कायम ठेवला. ओसाकाने पुनरागमनाचा प्रयत्न केला, पण बेलारूसच्या सबालेंकाने दमदार ग्राउंड स्ट्रोक्सच्या जोरावर दुसरा सेट ६-३ ने जिंकून सामना आपल्या नावावर केला.

# वैभव सूर्यवंशीवर आयआयएम इंदूर करणार स्टडी

■ माइंडसेट-मॅनेजमेंटचे करणार स्कॅन

■ सिक्सर किंग कसा बनला हे शोधणार

| जयपूर| वृत्तसंस्था |

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट इंदूर क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशीला केस स्टडीमध्ये समाविष्ट करणार आहे. वैभव मॉडेलवर देशातील पहिली मल्टी-डिसिप्लिनरी स्टडी होईल. यात क्रीडा-मानसशास्त्र-व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ज्ञ एकत्र येऊन लहान वयात मोठ्या यशाचे सूत्र शोधतील.

राजस्थान रॉयल्सचा सलामीवीर वैभवने एका हंगामात सर्वाधिक (७२) षटकार मारून ख्रिस गेलचा (५९) १४ वर्षांचा जुना विक्रम मोडला आहे. त्याच्या आश्चर्यकारक फलंदाजीचे जगभरात कौतुक होत आहे. अशा परिस्थितीत, इंदूर आता त्याच्या यशस्वी सूत्राचे गूढ उकलण्याचे काम सुरू करत आहे.



प्रो. रॉय म्हणाले की, वैभवचा क्रिकेट प्रवास अद्भुत आहे. यामागे वैयक्तिक क्षमतेव्यतिरिक्त कठोर परिश्रम, कुटुंबाचा त्याग, समर्पण आणि मार्गदर्शकाचे योगदानही महत्त्वाचे आहे. ते म्हणाले की, प्रतिभा ही एक देणगी असू शकते, परंतु तिला कायमस्वरूपी उत्कृष्टतेत बदलण्यासाठी योग्य मूल्ये, विचार, मजबूत समर्थन प्रणाली आणि दूरदृष्टीचे नेतृत्व आवश्यक आहे.

व्यवस्थापन विभागाच्या प्राध्यापिका डॉ. आरती चोप्रा म्हणतात की, वैभववरील अभ्यास भविष्यातील व्यवस्थापक आणि धोरणकर्त्यांसाठी अत्यंत मौल्यवान आहे. ५ फूट ७ इंच उंची आणि ५५ किलो वजनाचा वैभव आपल्या जबरदस्त बॅट स्पीड आणि टाइमिंगच्या जोरावर चेंडूला सीमारेषेबाहेर पाठवतो.

प्रशिक्षक मनीष ओझा यांनी घडवलेल्या वैभवच्या तंत्रावर आणि बॅटच्या वेगावर आता राजस्थान रॉयल्सचे जुबिन भरुचा काम करत आहेत. विक्रम राठौर देखील त्याच्या संतुलनाचे चाहते आहेत. फक्त ०.३ सेकंदांच्या निर्णय वेळेमुळे गोलंदाजांना सेट होण्याची संधी मिळत नाही. द्रविडने त्याला सावधपणे खेळायला सांगितले, तेव्हा त्याचे स्पष्ट उत्तर होते. सर, गोलंदाजाने मला पाहावे. बाद होण्याच्या भीतीपासून मुक्त असल्यामुळे त्याचा आकार दबावाखाली बिघडत नाही.

## थायलंडच्या खेळाडूला हरवले | आज श्रीकांत-लक्ष्य सेनचे सामने

# पीव्ही सिंधू इंडोनेशिया ओपन बॅडमिंटनच्या दुसऱ्या फेरीत

| सिंगापूर | वृत्तसंस्था|

भारताची बॅडमिंटन स्टार पीव्ही सिंधू इंडोनेशिया ओपन बॅडमिंटन सुपर १००० स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत पोहोचली आहे. जागतिक क्रमवारीत १२व्या स्थानावर असलेल्या सिंधूने मंगळवारी राउंड ऑफ ३२ च्या सामन्यात थायलंडच्या बुसानन ओन्ग्बाम्रुंगफानला सरळ गेममध्ये २५-२३, २१-१६ असे हरवले. हा सामना ५१ मिनिटे चालला. ३० वर्षीय सिंधू राउंड ऑफ १६ मध्ये तुर्कस्तानच्या नेस्लिहान आरिन आणि दक्षिण कोरियाच्या जागतिक क्रमवारीत नंबर-१ शटलर आन से-यौंग यांच्यातील विजेत्याशी खेळेल.




या सामन्यात सिंधूला पहिल्या गेममध्ये संघर्ष करावा लागला. ओन्ग्बाम्रुंगफानने तिला कडवी झुंज दिली. मात्र, भारतीय स्टारने हा गेम २५-२३ ने आपल्या नावावर केला.पहिला गेम जिंकल्यानंतर सिंधूने दुसऱ्या गेममध्ये लय पकडली. तिने सुरुवातीपासूनच आघाडी घेतली. सिंधूने दुसरा गेम २१-१६ ने जिंकून सामना आपल्या नावावर केला. महिला एकेरीत थोड्याच वेळात भारताची मालविका बनसोड थायलंडच्या पोर्नपावी चोचुवोंगशी खेळेल. आज पुरुष एकेरीत श्रीकांत किदाम्बी आणि लक्ष्य सेन यांचे सामनेही होतील. दुहेरी गटातही भारतीय जोड्या मैदानात उतरतील.

ही बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशनची लेव्हल-१ बॅडमिंटन स्पर्धा आहे, जी वर्षातून एकदा होते. ही स्पर्धा पहिल्यांदा १९८२ मध्ये खेळली गेली होती आणि तेव्हापासून यात जगातील सर्वोत्तम बॅडमिंटन खेळाडू भाग घेतात.

## जम्मूच्या स्पीडस्टारची टीम इंडियात एन्ट्री

**काश्मीर** : जम्मू-काश्मीर क्रिकेट संघाला पहिल्यांदा रणजी ट्रॉफी जिंकून देण्यात मोलाचा वाटा उचलणारा आकिब नबी याला भारतीय संघाचे बोलावणे आले आहे. अफगाणिस्तान विरुद्धच्या एकमेव कसोटी सामन्यासाठी संघ निवडताना अजित आगरकर यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने या वेगवान गोलंदाजाला भारतीय कसोटी संघात स्थान दिले नव्हते. रणजी स्पर्धेतील १० सामन्यात ६० विकेट्स घेत मोठा पराक्रम करूनही त्याला कसोटी संघात न घेतल्यामुळे काही दिग्गज भारतीय क्रिकेटर्सनी नाराजीही व्यक्त केली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)